द्रष्टा असतो. १९६९ च्या मिनी जनरल इलेक्शन्समध्ये पराभूत झाल्यानंतर हाच विचार इंदिराजींनी केला. दलित जनता नेहमी डावीकडे असते. जगातील दलितांचा समाजवाद हा आता

# माणूस

शनिवार । १५ एप्रिल १९७२
पन्नास पैसे

मूलमंत्र ठरत आहे. समाजवादाचा घोष करून बाईंनी अतिशय हातचलाखीने नव्या पक्षाला जन्म घातला आणि त्या जनतेच्या मनातील बोलू लागल्या, त्याचवेळी त्या mass leader बनल्या. गूंगी गुडिया रहाण्याचे दिवस आता संपले होते.



| माणूस | शनिवार | १५ एप्रिल १९७२ | पन्नास पैसे |
|---|---|---|---|
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सेहेचाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार....**

□ 'माणूस'च्या स्पर्शाने भानगडबाज काँग्रेसवाल्यांच्या परंपरागत गाद्या हालल्या आहेत. लक्षभोजन फेम मोहितेपाटलांचे विधानसभा तिकीट मुंबई रस्त्याला हरवले, तसे 'जाऊ तिथे खाऊ' फेम भाऊसाहेबांचे हाती आलेले तिकीट दिल्ली रस्त्याला हिसकवले गेले. बार्शीकरांना 'माणूस'चा स्पर्श परिसाप्रमाणे वाटायला लागला. २२ जानेवारीच्या अंकाला अजूनही मागणी येतेच आहे. मोठ्या अजीजीने नकार दिला तरी 'एक तरी द्याच हो. आमच्या गाववाल्यांनी सगळ्यांनी सांगितलाय' हा लकडा बंद होत नाही. पण २४ जानेवारीपासूनच अंक शिल्लक नाही तर देणार कुठून ?

गेल्या महिन्यातच बार्शी नगरपालिका सस्पेण्ड का करू नये ही नोटीस आली. उत्तरासाठी मुदतवाढ (संपण्यापूर्वी एक दिवस) नेहमीच्या खाक्या नुसार मागितली. गंमत अशी, की नगरपालिकेकडून मुदतवाढीचा अर्ज बार्शीतून मुंबईकडे ज्यादिवशी गेला त्याचदिवशी मुंबईहून बार्शीला मुदत मंजुरी पाठविली गेली. या दोन अर्ज-उत्तर पत्रांची तारीख एकच आहे ! बार्शी कॉलेजला सीमेंट उसने दिल्याचा गावात फारच गवगवा झाल्याने त्या शिक्षणमंडळीचे चिटणीसांनी, खाजगी रीत्या एक-दोन मित्रांजवळ खुलासा केला, की 'आम्ही तुमचे सीमेंट परत केले हो... तुमचे जुने होते तरी आम्ही नवे परत केले बरं का' नगरपालिकेत हे सीमेंट परत

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

केले गेले, त्याचदिवशी खर्ची पडलेले दाखविले आहे. शहरात कुठें बांधकाम झाले हे एक भाऊसाहेबच जाणे.

# पुन्हा भाऊसाहेब....

दि. २८ मार्चला नगराध्यक्षांवर अविश्वास ठराव आला होता. हे गेल्या वर्षीतले दहावे मिसकॅरेज ! न. पा. च्या एकूण तीस सदस्यांपैकी पाच कोऱ्या कागदावरील सह्यामुळे रद्द झालेत. उरलेल्यापैकी आपल्यासह वीस नगरपित्यांना घेऊन भाऊसाहेब प्रत्येकवेळी कुठे गडप होतात, कुणास ठाऊक ? ही एकोणीस मडळी वेगवेगळ्या प्रकरणांनी त्यांच्या संपूर्ण हाती आहेत, तरी अविश्वासाचा ठराव फेटाळून दाखविण्याची मर्दुमकी ते का करत नाहीत हे बार्शीकरांना उघडे सत्य आहे. जेवा-खायला-प्यायला देऊन दिवसभर बंगल्यात डांबले तरच अविश्वास ठरावाचा दिवस पार पडतो.

महाराष्ट्र टाइम्स, मराठवाडा या दैनिकांनी व अनेक साप्ताहिकांनी भाऊसाहेबांच्या चौकशीची मागणी केली. पण निवडणुकीमुळे ती धूसर झाली. सोलापूर जिल्हा समाजवादी पक्ष शाखेने प्रकरण धसाला लावण्याचे ठरविले. तक्षक इंद्रामागे दडला आहे असे अनुभव आले. मुंबई सचिवालयातले काही वरिष्ठ अधिकारी व संबंधित मंत्री 'प्रकरण काही फारसे मोठे नाही, फारसे बेकायदेशीर नाही' अशी मखलाशी करून सारवासारवी करत आहेत. म्हणून समाजवाद्यांनी प्रकरणाच्या जाहीर चौकशीबरोबर या सर्व संबंधितांनाही कडक शासन व्हावे अशी मागणी केली आहे. महाराष्ट्र सरकारला या मागणीची नोटीस त्यांनी दि. ४–४–७२ रोजी बार्शी न. पालिकेसमोर बारा तासांचे धरणे सत्याग्रह करून दिली आहे. बार्शी, शिराळे, भोयरे, कारी गोरमळे (ता. बार्शी) दारफळ, बुद्रुकवाडी (ता. माढा) रोपळे (ता. पंढरपूर), सोलापूर इत्यादी ठिकाणांच्या ३० ते ३५ साथींनी ४ एप्रिलला सकाळी ८॥ ला सत्याग्रहाला सुरुवात केली. या वेळी गावातल्या विविध थरातल्या नागरिकांनी मुख्यमंत्र्यांना तारा करून कारवाईची मागणी केली व सत्याग्रहाला पाठिंबा दिला. वकील, कापडदुकानदार, सराफ, नगरपिते, हॉटेल मालक, किराणा दुकानदार वगैरे थरांतले हे लोक आहेत. दोन महिन्यांत चौकशी सुरू न झाल्यास यासाठी आंदोलन करण्याचा निश्चय जिल्हाचिटणीस साथी दत्ता भोसले यांनी सांगितला आहे.

६ एप्रिल, १९७२ — रोहिदास कांबळे, बार्शी

# राजारामबापूंचा नवा अवतार

महाराष्ट्र विधानसभेच्या नव्या अधिवेशनात माजी उद्योगमंत्री श्री. राजारामबापू पाटील यांनी जो नवा अवतार धारण केला आहे. त्यामुळे सगळीच मंडळी गडबडून गेलेली दिसतात. माजी मंत्री म्हणजे साधारणत: मागच्या बाकावर बसणारे, क्वचित सभागृहात दिसणारे आणि विधानसभेच्या कामकाजात क्वचित रस घेणारे अशी साधारण समजूत असते. बरेचसे माजी मंत्री या समजुतीप्रमाणेच वागतात.

पण राजारामबापू मात्र सभागृहाच्या कामकाजात अगदी जागरूकपणे लक्ष घालताना दिसतात. एवढेच नव्हे, तर प्रत्येक बाबतीत सरकारला ठायी ठायी अड-विताना दिसतात. प्रश्न विचारण्याची एकही संधी सोडीत नाहीत आणि आडवे तिडवे प्रश्न विचारून मंत्र्यांना बेजार करून टाकतात. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, अशासकीय ठराव, अर्धातास चर्चेची सूचना आदी नानाविध मार्गांनी जनतेचे प्रश्न विधानसभेत मांडण्याचा त्यांनी सपाटाच लावला आणि सगळ्यांना चकित करून सोडले. त्यामुळे कॉंग्रेस बाकावरील क्रियाशील सभासदांमध्ये त्यांचे नाव अग्रभागी राहील. एवढेच नव्हे, तर विधानसभेतील परिणामकारक विरोधी सदस्यां-मध्येदेखील त्यांची गणना होण्यास हरकत नसावी.

शेतकऱ्यांना पंपांसाठी दिलेल्या कर्जाची वसुली करताना त्यांची होणारी छळणूक आणि त्यामुळे जनतेत पसरलेली घबराट याबद्दल बापूंनी एक लक्षवेधी सूचना दिली होती. त्यासूचनेवरून बापू आणि सहकारमंत्री श्री. यशवंतराव मोहिते यांच्यात प्रश्नोत्तरांची जी जुगलबंदी झाली ती बरीच गाजली. विहिरी आटल्या आहेत, आटत आहेत. दोन पिके काढण्याएवढेही पाणी शेतकऱ्यांना विहिरीतून मिळत नाही. अशा परिस्थितीत सक्तीने कर्जवसुली करणे कितपत योग्य आहे असे श्री. पाटील यांचे म्हणणे होते; तर एकदम सरसकट कर्जमाफी देणे शक्य नाही. जे शेतकरी कर्ज भरू शकतात त्यांच्याकडून वसुली झालीच पाहिजे असे श्री. मोहिते यांचे म्हणणे होते.

राजारामबापू पाटील यांनी मांडलेला अशासकीय ठरावदेखील गाजला. ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या व्यतिरिक्त सरकारने रस्त्यांची आणि तलावांची कामे हाती घ्यावी अशी शिफारस करणारा हा ठराव होता. सरकारची ही योजना संदिग्ध असल्याची श्री. पाटील यांची तक्रार होती. आणि योजनेमध्ये कामगारांना त्यांच्या गावाच्या तीन मैलांच्या परिसरातच काम मिळाले पाहिजे अशी त्यांची मागणी होती.

ठरावाच्या चर्चेत बोलताना मुख्यमंत्री नाईक म्हणाले, की योजना मोठी आहे. कामेही प्रचंड आहेत. पण प्रत्येकाला त्याच्या खेड्याच्या तीन मैलांच्या परिसरातच काम पुरविणं कसं शक्य आहे ? त्याच्या जिल्ह्यात, त्याच्या तालुक्यात, त्याच्या गावाच्या शक्य तेवढ्या जवळ कामे देता येतील. पण अगदी तीन मैलांच्या परिसरात काम मागणे म्हणजे योजनेवर आणि सरकारवर सूडच घेण्यासारखे होईल.

त्यावर उत्तर देताना राजारामबापू म्हणाले, काम तर कामगारांना घराजवळच मिळायला हवे. मागेल त्याला काम मिळेल हे ठीक आहे. पण काम पाहिजे ना, मग जा जिल्ह्यात कुठेही असे करणे म्हणजे काम मागणाऱ्यावर सूड घेतल्यासारखे होईल, असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री आणि माजीमंत्री यांच्यातली ही 'सूडाची भाषा' ऐकून सभागृहाची चांगलीच करमणूक झाली हे सांगायला नकोच.

अर्धा तास चर्चेच्या सूचनेमध्ये श्री. राजारामबापू पाटील यांनी खुजगाव धरणाचा विषय काढला होता. मंजूर होऊन सहासात वर्षे झाली. पण साडेएकतीस कोटी रुपये अंदाजाच्या या धरणावर वर्षाला सुमारे पाचच लाख खर्च होत आले आहेत. या गतीने हे धरण पूर्ण व्हायला किती वर्षे लागतील असाही हिशेब त्यांनी करून दाखविला आणि धरण पूर्ण केव्हा होणार असा सवाल केला.

इतर अनेक बाबतीत श्री. पाटील यांनी वेळोवेळी सरकारला अडविण्यास कमी केलेले नाही. त्यामुळे विरोधी पक्षीयात साश्चर्य कुतुहल तर निर्माण झाले आहेच पण काँग्रेस गोटामध्येही मोठीच खळबळ उडाली आहे. राज्यकर्त्या पक्षामधलेच आमदार सरकारची एवढी कडक चाचपणी आतापर्यंत घेत नव्हते. तशी प्रथा नव्हती. पण राजारामबापूंनी धाडसाने ती मोडली. यामागे त्यांचा हेतू काय, त्यांचे पाठीराखे बड्यांमध्ये कोण आहेत आदी बाबतीत काँग्रेस गोटात जोरदार चर्चा सुरू आहे. मंत्रीमंडळीदेखील याबाबतीत गप्प आहेत.

विधानसभेत विरोधी पक्षीयांचा जोर कमी झाला आहे. काळदाते, उद्धवराव पाटील, गुलाबराव गणाचार्य, हशू आडवानी यांच्यासारखे सरकारला पदोपदी अडवून जाब विचारणारे माजी आमदार पराभूत झालेले आहेत. त्यामुळे विरोधी पक्षीयांचे कसे होणार याविषयी चिंता होती. परंतु राजारामबापूंनी विरोधी-पक्षीयांना एक नवा आधार आणि हुरूप दिला अशीच भावना विरोधकांमध्ये आहे. फक्त राजारामबापूंचा हा उग्र पवित्रा किती काळ टिकतो याबाबतीत मात्र विरोधकांमध्ये साशंकता आहे.

राजारामबापू एवढीच क्रियाशील नसली तरी थोडीफार विरोधी प्रवृत्ती दाखविणारे इतरही काही काँग्रेस आमदार आहेतच. मुंबईचे श्री. एफ. एम. पिंटो हे तर पूर्वीपासूनच स्वतंत्र बाण्याचे. मुंबईतून नव्याने निवडून आलेल्या काँग्रेस आमदारांमध्ये श्री. वि. कृ. तेंबे, श्री. प्रभाकर कुंटे, श्री. जगेश देसाई आदींच्या प्रवृत्ती विरोधकांच्याच. हंगामी अर्थसंकल्पावरील श्री. तेंबे यांचे भाषण चांगलेच

गाजले. आतापर्यंत काँग्रेसचे आमदार आमच्या जिल्ह्याचे अमुक नाही, तमक्या योजनेचा उल्लेख नाही, अमुक गोष्टीला खर्च कमी दिला अशा फुटकळ तक्रारी करून बाकीचा अर्थसंकल्प छान असल्याची पावती देत. परंतु हा अर्थ-संकल्प जनतेच्या आशा-आकांक्षांचा चक्काचूर करणारा आहे, अंधःकारमय आहे, अशा कडक शब्दात कधी काँग्रेस आमदाराने टीका केली होती ? श्री. तेंबे यांनी तसे धाडस केले. श्री. तेंबे नवीन असल्यानें हंगामी अर्थसंकल्पात अर्थ शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला अशी भलावणी अर्थमंत्र्यांनी केली खरी. पण तेंबे नवे असले तरी हंगामी अर्थसंकल्प कोणता आणि मुख्य अर्थसंकल्प कोणता हे न जाणण्या-इतपत काही ते अप्रगल्भ नाहीत. अर्थसंकल्प कोणताही असो. त्यात समाजवादी योजनांचे काहीही प्रतिबिंब नाही या श्री. तेंबे यांच्या आरोपाला अर्थमंत्र्यांजवळ उत्तर एवढेच होते, की पुढच्या अर्थसंकल्पात हे प्रतिबिंब दिसेल.

विरोधी पक्षीय आमदारांमध्ये श्री. त्र्यं. सी. कारखानीस, श्री. रामभाऊ म्हाळगी आणि श्री. दि. बा. पाटील हे जुने आमदार आपले अस्तित्व राखून आहेत. नव्या विरोधकांमध्ये समाजवादी पक्षाच्या श्रीमती मृणाल गोरे आणि जनसंघाचे श्री. कृष्णराव भेगडे हे तयार होताना दिसतात. शिवसेनेचे श्री. प्रमोद नवलकर हे बहूत करून फक्त शिवसेनेच्या प्रश्नावरच जागरूक असलेले दिसतात. कारण या अधिवेशनात वारंवार शिवसेनेचा उल्लेख अनेक निमित्तानी होत होता. शिवसेनेवर अनेक आरोप होत होते. आणि शिवसेनेचे विफल समर्थन करताना प्रमोद नवलकर दिसत होते.

अपक्ष सदस्यांमध्ये पेणचे श्री. ए. टी. पाटील आणि खटावचे श्री. केशव–शिंदे–पाटील (हे बंडखोर काँग्रेसवाले) हे अधूनमधून चमकताना दिसतात.

यावेळी अधिकृत विरोधी गटच विधानसभेत नाही. शेतकरी कामगार पक्षाचे सात, जनसंघाचे पाच, समाजवाद्यांचे तीन, कम्युनिस्टांचे आणि रिपब्लिकनांचे प्रत्येकी दोन, मार्क्सिस्टांचा एक, मुस्लीम लीगचे दोन आणि उरलेले २६ अपक्ष. असे सर्व पक्ष वेगवेगळे बसतात. अधिकृत विरोधी गटाला किमान २८ सदस्य लागतात.

शे. का. प., समाजवादी, कम्युनिस्ट आणि काही अपक्ष यांनी एकत्र येऊन विरोधी गट स्थापण्याचा प्रयत्न केला होता. पण नेतेपदाच्या वादावरून हा प्रयत्न जमला नाही. अपक्षांचा एक गट श्री. ए. टी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली मात्र निर्माण झाला आहे. बाकी ज्यांनी निवडणुकीत समझोता केला होता असे शे. का. प. व समाजवादी पक्षदेखील एकत्र बसू शकले नाहीत. विरोधकांची अशी केविल-वाणी अवस्था झाली असताना काँग्रेसमधलेच लोक विरोधी प्रवृत्ती दाखवू लागल ही गोष्ट निश्चितच उत्तेजनार्ह आहे.

□ □ □

# निवडणूक १९७२ :

१९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकींमध्ये विरोधी पक्षांच्या पराभवाच्या कारणांची मीमांसा करण्याचा हा माझा प्रयत्न आहे. मी मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात प्रथमवर्ष एम. ए. चा विद्यार्थी आहे. निवडणूक प्रवाहांचे आकलन करण्यासाठी मी केज मतदारसंघात आलो होतो. येथूनच समाजवादी नेते डॉ. काळदाते निवडणूक लढवीत होते. शिवाय मला मतदानाचा हक्क प्रथमच मिळत होता. तोपण बजावायचा होता.
विरोधी पक्षांचा पराभव का झाला, भारतात पर्यायी पक्ष का निर्माण होत नाही आणि काँग्रेस या संघटनेचे स्वरूप कसे आहे यावर माझे विचार मी मांडले आहेत. माझे विचार नवीन आहेत किंवा ते इतर कोणी मांडले नाहीत, असे मला म्हणायचे नाही; पण मला डॉ. काळदाते यांच्या पराभवातून जे जाणवलं ते मी येथे स्पष्ट केलं आहे....

**अशोक चौसाळकर**

१९७२ च्या १६ राज्यांसाठी निवडणुका पार पडल्या. गोवा व मणिपूरचा अपवाद वगळता सर्वच प्रांतांत विरोधी-पक्षांचा प्रचंड पराभव झाला. लागोपाठ दुसरा आघात विरोधकांना सहन करावा लागला. विरोधी पक्ष जनतेच्या आशा-आकांक्षा कधीच जाणू शकले नाहीत. १९६७ च्या निवडणुकीपूर्वी प्रजा-समाजवादी नेते श्री. हरी विष्णू कामत यांनी भाकित केले, की काँग्रेसला लोकसभेत ३२० जागा मिळतील आणि केरळ व राजस्थानचा अपवाद वगळता सर्व ठिकाणी काँग्रेस निवडून येईल. १९७१ साली हरी विष्णू कामतांनी भाकित केले, की बडचा आघाडीला २५० पर्यंत जागा मिळतील. हरी विष्णू कामत यांची बौद्धिकदृष्टचा बरोबरी करणारा पुढारी विरोधी पक्षात नाही. पण त्यांची दोन्हीही भाकिते चुकली. कारण विरोधी पक्षांचा स्वतःच्या सामर्थ्याविषयी भ्रम !

आज या सर्व गोष्टींचा पुन्हा विचार करायची गरज निर्माण झाली आहे. खरी तथ्ये शोधून काढण्याचा आणि पर्यायी पक्ष निर्माण न होऊ देणाऱ्या कारण-परंपरांचा मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. कारण आपल्या अल्पवयी लोक-शाहीच्या दृष्टीने हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे.

काँग्रेस पक्ष हा जगातील एक अतिशय शक्तिशाली पक्ष आहे. जगाच्या लोक-शाहीच्या इतिहासात या पक्षाला तोड नाही. अमेरिकेमध्ये रिपब्लिकन पक्षाने अशीच १८६० ते १८८४ पर्यंत अव्याहत सत्ता भोगली होती. डेमोक्रॅटिक्सानीही १९३२–१९५२ अशी वीस वर्षे सत्ता भोगली होती. इंग्लंडमध्ये हुजूर पक्षाने १९५१–६४पर्यंत सत्ता भोगली. पण भारत आणि इंग्लड व अमेरिका यांत मूलभूत अंतर आहे. कारण त्या पक्षांना पर्यायी असे पक्ष त्या देशात अस्तित्वात होते. तेथे भारतासारखी मोडतोड झाली नाही.

भारतात पर्याय देऊ शकणारे विरोधी पक्षच विकसित झाले नाहीत. त्यामुळे येथे एकपक्षीय लोकशाहीच चालू राहिली. एकपक्षीय लोकशाही हा तसा चमत्कारिक शब्दप्रयोग आहे. कारण जेथे लोकशाही असते तेथे एकपक्षीय शासन नसते. पण भारतात प्रचलित सिद्धांत कधीच लागू पडत नाहीत. भारताच्या संदर्भात त्यांचा विचार करताच त्याचे स्वरूपच बदलून जाते. सध्या लोकशाही समाजवाद हा भारतात ‘ चालणारा ’ शब्द आहे. तसा समाजवाद जगात कोठेच अस्तित्वात नाही. पण उद्या जर भारतात तो अस्तित्वात आला, तर जगातील समाजव्यवस्थेत ती क्रांतिकारक घटना ठरेल. सेक्युलॅरिझमचा अर्थही येथे असाच बदलला आहे. काँग्रेस पक्षाने हेतुपुरस्सर कोणतेही वाममार्ग अंगिकारले नाहीत. तरी जनतेने पक्षाला २५ वर्षे पदारूढ केले. म्हणूनच येथे एकपक्षीय लोकशाही विकसित झाली.

आपण काँग्रेस पक्षाच्या संघटनेचा अभ्यास केला, तर असे दिसून येईल, की हा

पक्ष जगातील आश्चर्यकारी पक्ष आहे. हा पक्ष भारतातील वैविध्याचा आविष्कार आहे. काही पक्ष श्रीमंतांचे असतात, काही गरीबांचे असतात. प्रत्येक Interest Group स्वतःच्या स्वार्थाला तत्त्वज्ञानाचे कवच चढवून राजकीय पक्ष म्हणून उभा रहात असतो. प्रत्येक पक्षाच्या राजकीय तत्त्वज्ञानामागे त्याच्या सदस्यांचा स्वार्थ असतो. या स्वार्थपोषणार्थ किंवा स्वार्थसंरक्षणार्थ लोकशाहीत पक्षांचा उदय होत असतो. याच स्वार्थांमधून जनतेच्या आकांक्षा जन्मत असतात.

## काँग्रेसचे स्वरूप

काँग्रेसची दाखवायची idealogy वेगळी आहे आणि वागायची पद्धत वेगळी. तसं पाहिलं तर समाजातील स्थितीवादी, प्रतिगामी व या समाजरचनेत ज्यांचा स्वार्थ गुंतला आहे असे या पक्षाच्या आसनावर बसलेले आहेत. कारण काँग्रेसमध्ये त्यांचे स्वार्थ केंद्रित आहेत. सूरज रतन दमाणी आणि चंद्रजीत यादव दोघेही काँग्रेस-मध्येच आहेत, याचे कारण समानस्वार्थ हे आहे. इंदिरा काँग्रेस व नेहरू काँग्रेस यात तसा फरक नाही. काँग्रेसची संघटना काँग्रेसला कधीच गती देत नाही, काँग्रेसचे नेतृत्व काँग्रेसला गती देते. कारण तसा विचार करण्याची संघटनेची ताकद नाही. ती व्यक्तिमहात्म्यावर पोसलेली संघटना आहे. निरनिराळे Interest Groups आणि परस्परविरोध पचविण्याची या संघटनेची ताकद विलक्षण आहे. भारतातील वैविध्य तिने असेच पचविले आहे.

काँग्रेसमध्ये म्हणूनच तत्त्वावरून कधीच वादळे उठली नाहीत. १९५० चा नेहरू-पटेल वाद किंवा इंदिरा–निजलिंगप्पा वाद हे सत्तेचे राजकारण (power politics) होते. समाजवाद हा गरीब जनतेचा महामंत्र आहे, या शब्दातून त्यांच्या आशा-आकांक्षा व्यक्त होतात. पण या समाजवादाचाच विरोध करणारे पटेल, पाटील, निजलिंगप्पा, मोरारजींसारखे लोक काँग्रेसमध्ये होते व आहेत. समाज-वादाचा वारा जोरात येताच हे लोक आपले डोके खाली वाकवीत आणि वादळ निघून जाताच डोके वर करीत. कमलापती त्रिपाठी, वसंतराव नाईक, दमाणी, महेंद्र मिश्र हे या वर्गाचे प्रतिनिधी आहेत. यांचे राजकारण असेच गुडघे टेकविण्याचे राजकारण आहे. शक्यतो सत्ता साधून स्वार्थाचे संरक्षण करणे हेच यांचे राजकारण!

भारतीय समाज हा काही एकात्म समाज नाही. खरं पाहिलं, तर जगात एकात्म समाज नसतोच. पण भारतासारखी समाजरचना कुठेच आढळत नाही. भारतातील चातुर्वर्ण्य समाजरचनेला जातीव्यवस्थेने अनेक छेद गेले आहेत. ही समाजरचना भारतातील तडजोडवाद व सहिष्णुता यांची परिणती आहे. सामाजिक दृष्ट्या हा समाज अतिशय विछिन्न, म्हणून येथील समस्याही अतिशय अवघड बनल्या आहेत. अशा अवघड व विचित्र समाजरचनेचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष अतिशय लवचिक असावा लागतो. म्हणूनच काँग्रेस हा अतिशय लवचिक पक्ष बनला. कसलाही दाब आला तरी तो सहन करू शकतो, मोडू शकत नाही. तो मोडत नाही कारण तो

लवचिक आहे. पण म्हणूनच तो पक्ष, पक्ष म्हणून कोणतेही कार्य करू शकत नाही. Direct action घेऊ शकत नाही किंवा जनताआंदोलन उभारू शकत नाही.

त्यासाठी काँग्रेसला सर्वांचेच प्रतिनिधित्व करावे लागले. भारतातील इतर राष्ट्रीय पक्षात एका जातीचे प्राबल्य आहे, पण काँग्रेस हा सर्वांचाच पक्ष आहे. सर्व जातीजमातीतील स्थितीवादी, प्रतिगामी, वडे धनवंत काँग्रेसमध्ये आहेत, कारण काँग्रेसमध्ये त्यांचा स्वार्थ आहे. गरीब मनुष्य काँग्रेसच्या कोणत्याही पदाधिकारावर सापडणार नाही कारण प्रत्येक जातीतील बलिष्ठ आपल्या हितसंवर्धनार्थ व हितसंरक्षणार्थ रहातात. याचा अर्थ पक्ष प्रतिगामी आहे असा नाही. कारण पक्षाचे केंद्रीय नेतृत्व व्यवहारवादी आहे. काळाची पावले व जनतेच्या आकांक्षा ओळखल्या तरच सत्तेवर रहाता येते हे या पक्षाला माहीत आहे. म्हणूनच हा पक्ष समाजवादी आहे. नेतृत्वापुढे हे लोक स्वार्थसाधनासाठी गुडघे टेकवीत असतात. उद्या जर काँग्रेसला पर्यायी पक्ष निर्माण झाला तर हे लोक त्या पक्षात जातील !

प्रत्येक जातीतील बलिष्ठांची संघटना असलेल्या काँग्रेसपुढे पर्यायी पक्ष निर्माण होणेच अशक्य होते. त्यात पुन्हा विरोधी पक्षांजवळ कधी संघटना अशी नव्हतीच. केवळ जातीवादाला किंवा धर्माला आवाहन करून भारतात पक्ष निर्माण झाले नाहीत, असे नाही पण त्यांची मर्यादा फारच थोडी होती. मुस्लीम लीग, हिंदुमहासभा, रिपब्लिकन पक्ष वगैरेंचा हा प्रयत्न फारसा यशस्वी ठरला नाही. कारण धर्माची भावना आर्थिक संबंधांपुढे नेहमीच शबलित असते. अकाली दल, केरळ काँग्रेस, झारखंड पार्टी, शेकाप, भाक्रांद या पक्षांनी काही काळ प्रभाव दाखविला, पण नंतर त्यांचा प्रभाव संपत गेला. जातींचा किंवा धर्माचा आधार घेऊन पर्याय निर्माण होऊ शकत नाही.

सतत लहान लहान नवे नवे पक्ष बनणे व मोडणे ही भारतीय पक्षीय राजकारणाची अव्याहत २५ वर्षे अपरिहार्य प्रक्रिया बनली आहे. जनतेच्या सतत निर्माण होणाऱ्या आकांक्षांचे हे पक्ष प्रतिनिधी होते. विशाल हरियाना पार्टी, भाक्रांद, रामराज्य परिषद, जनता पार्टी, लोकसेवादल, जनकाँग्रेस, किसान मजदूर पार्टी वगैरे पक्ष निर्माण झाले व लयास गेले. छोटचा छोटचा इंटरेस्ट ग्रुप्सनी स्वतःच्या स्वार्थसाधनासाठी हे पक्ष बनविले. त्यांचे काम संपताच हे पक्ष लयास गेले. पण यातून विरोधी पक्ष-कम्युनिस्ट, जनसंघ किंवा समाजवादी व ज्यांना जनतेत थोडाबहुत आधार आहे, असे पक्ष-शक्तिशाली झाले नाहीत. उलट तेच खच्ची झाले. 'तेलंगना प्रजासमितीने कम्युनिस्टांना लोळविले, विहपा व भाक्रांदने जनसंघाला लोळविले, म्हैसूरातील जनता पार्टीमुळे प्रजासमाजवाद्यांनी मार खाल्ला, तर उत्कल काँग्रेसने ओरिसात स्वतंत्रांना खच्ची केले. तोटा काँग्रेसचा झाला नाही. एवढे मोठे लोक काँग्रेसमधून जाऊनदेखील काँग्रेसला धक्का लागला नाही, उलट विरोधक गारद झाले ! दरवेळी १०-१५ प्रादेशिक पक्ष उदय पावतात व विरोधी राष्ट्रीय पक्षांना

गारद करतात. त्यामुळे पर्यायी पक्षाचा प्रश्न अतिशय अवघड बनला आहे.

भारतातील विरोधी पक्षांनी तरी त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले काय ? पण काँग्रेसचे वास्तविक स्वरूपच त्यांना समजले नाही. विरोधी पक्षांचे चंद्रमौळी संसार व बोलघेवडे, धीर नसलेले पुढारी त्यामुळे सगळ्यात जास्त नुकसान त्यांचेच झाले.

१९६७ साली आठ राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला. हा पराभव विरोधकांचा भ्रम वाढविण्यास कारणीभूत ठरला. म्हणूनच हरी विष्णू कामतांसारखा विरोधी पक्षातील सर्वांत बुद्धिमान नेता विरोधी बड्या आघाडीला २५० जागा मिळू शकतील असे म्हणू शकला. केरळ व तमिळनाडूमध्ये १९६७ साली जरी काँग्रेसला पराभव पत्करावा लागला, तरी तेथे पक्षाला ४० टक्क्यांपेक्षा जास्त मते होती. विरोधकांना काँग्रेसविरोधी मते संघटित करता आली होती. उदाहरणच द्यायचे झाले, तर दक्षिण मुंबई मतदारसंघाचे देता येईल. या मतदारसंघातून स. का. पाटलांचा पराभव करून जॉर्ज फर्नान्डिस निवडून आले. हा मतदारसंघ लगेच समाजवाद्यांचा बालेकिल्ला ठरला. पण विधानसभेवर तेथून पक्षाचा एकही उमेदवार निवडून गेला नव्हता. पक्षाची तेथे नीट संघटनाही नव्हती. या मतदारसंघात काहीही काम न करता तो आपला बालेकिल्ला आहे असे समाजवाद्यांनी मानणे वेडेपणाचे होते. पण असा मूर्खपणा विरोधक गेली २० वर्षे करीत आले आहेत, त्याचाच परिपाक म्हणजे १९७२ चा दारुण पराभव ? या 'बालेकिल्ल्यांतून १९७१ साली जॉर्जचे डिपॉझिट पण गेले !

## धक्का प्रयोग

१९६७ साली काँग्रेस आठ राज्यांत पराभूत ठरली, पण पक्षाची मते फारशी घटली नव्हती. केरळ, मद्रास व ओरिसा वगळता तीच सर्वांत मोठी पार्टी होती. हा पराभव फारसा मोठा नव्हता. उत्तरप्रदेश १९७ (२१३) राजस्थान ८९ (९४) पंजाब ४८ (५३) ओरिसा ३१ (७१) केरळ ९ (६७) मद्रास ५१ (११८) प. बंगाल १२८ (१४१) बिहार १२७ (१६०) अशा जागा काँग्रेसला मिळाल्या होत्या. (पहिले आकडे काँग्रेसला मिळालेल्या जागांचे आहेत व कंसातील आकडे बहुमतासाठी आवश्यक असणाऱ्या जागांचे आहेत) यावरून केरळ, तमिळनाडू व ओरिसा वगळता काँग्रेस सगळीकडेच तशी शक्तिशाली होती. डॉ. लोहियांच्या गैर-काँग्रेसवादामुळे काँग्रेसविरोधी मतांना परिणामकारक घाट मिळाला होता. पण त्या सिद्धांतामागे मोजकेच मूल्य होते. हा काँग्रेसला पर्याय नव्हता तर ते धक्कातंत्र (Shock treatment) होते. नकारार्थी धोरणातून निर्माण झालेले तत्त्वज्ञान अतिशय कालसंदर्भित असते. त्याला इतिहासात महत्त्व लाभत नाही कारण ते भ्रमोत्पादक असते.

या भ्रमातूनच विरोधकांनी १९७१ साली संस्थानिकांना मदतीस घेऊन आघाडी

बनविली. संसोपा, जनसंघ, स्वतंत्र व संघटना काँग्रेस या निवडणूकीत मोठ्या उमेदीने उतरले. मोरारजींना पंतप्रधानपदाची, अटलबिहारींना गृहमंत्रिपदाची व लिमयांना परराष्ट्र मंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली. पण या आघाडीला फक्त ५० च जागा मिळाल्या. विसर्जित लोकसभेत या पक्षांना १५० जागा होत्या! सर्वांचाच भ्रमनिरास झाला. सत्तेपासून पराङ्मुख झाल्यामुळे काही जणांना पिसाळल्यासारखे झाले!

घटनाचे अर्थ जाणून घेण्याची असमर्थता व जनतेच्या आकांक्षा न ओळखणे यामुळे हा भ्रम निर्माण झाला. १९६७ साली काँग्रेसचा खऱ्या अर्थाने फार मोठा पराभव झाला नव्हता. केंद्रस्थानी पक्ष अजून शिल्लक होता. भारतीय मतदारांनी १९६७ साली योग्य कौल दिला होता. भारतीय मतदरांना मूर्ख व अडाणी समजून आपले कर्तव्य झटकून देणे सोपे आहे, पण भारतीय मतदार मूर्ख आहे व त्याने दिलेला कौल चूक आहे असे मला कधीच वाटले नाही. कोणत्याही शहाण्या व्यक्ती-पेक्षा समाजमन जास्त प्रगत व विकसित असते आणि खोल विचार करू शकते; या ॲरिस्टॉटलच्या सिद्धांतावर माझा विश्वास आहे. म्हणून १९६७ च्या निवडणुका हा भारतीय मतदारांनी केलेला धाडसी प्रयोग होता. त्याचे महत्त्व व परिणाम फक्त इंदिरा गांधीच जाणू शकल्या.

## काँग्रेस—जनतेचा पक्ष

काँग्रेस ही भारतातील अतिशय शक्तिशाली, खोलवर रुजलेली व सात लाख खेड्यांपर्यंत पोचलेली संघटना आहे. पण पक्षाचे महत्त्व तोपर्यंतच जनतेत असते जोपर्यंत जनतेच्या आशा-आकांक्षाशी पक्ष समरस होतो. तिच्या अशा-आकांक्षा बोलू लागतो. जनतेच्या आशा-आकांक्षापासून दूर जाताच अतिशय बळकट संघटना असलेल्या पक्षाची स्थितीदेखील म्हैसूरमधील संघटना काँग्रेससारखी होते. कारण संघटना हे साध्य नाही ते एक साधन आहे. ते जनतेच्या आकांक्षा जाणण्याचे आणि प्रकट करण्याचे साधन आहे. इंदिराजींनी जनतेच्या आकांक्षा जाणल्या; म्हणून त्यांचा पक्ष हा जनतेचा पक्ष बनला. जनतेच्या आकांक्षांशी जो नेता समरस होतो तोच नेता जनतेचा नेता होतो. इंदिराजींना जनतेचे नेतृत्व लाभले, ते १९६९ नंतर त्यापूर्वी नाही.

कालचक्राची गती व दिशा जाणून त्यानुसार जो नेता आपल्या कार्याची दिशा ठरवितो, तोच खरा द्रष्टा असतो. १९६९ च्या मिनी जनरल इलेक्शन्समध्ये परा-भूत झाल्यानंतर हाच विचार इंदिराजींनी केला. दलित जनता नेहमी डावीकडे असते. जगातील दलितांचा समाजवाद हा आज मूलमंत्र ठरत आहे. समाजवादाचा घोष करून बाईंनी अतिशय हातचलाखीने नव्या पक्षाला जन्म घातला आणि त्या जनतेच्या मनातील बोलू लागल्या. त्याचवेळी त्या मास लीडर बनल्या. गूंगी गुडिया रहाण्याचे दिवस आता संपले होते.

# विरोधासाठी विरोध

विरोधी पक्ष याचवेळी कामातून गेले ! आपले कर्तव्य या बदलत्या परिस्थितीत काय आहे हे त्यांना कधीच समजले नाही. लोकशाहीत पर्याय आवश्यक असतो, पण त्यासाठी जनतेत काम केले पाहिजे. हेच नेमके विरोधी पक्षांना जमत नाही. स्वातंत्र्यपूर्वकालापासून काँग्रेसवाले जनतेचे प्रतिनिधी होते. नंतर त्यांच्या हातात सत्ता आली. जनतेला सत्तेची खिरापत वाटून त्यांनी तिच्यावर आपली पकड बसविली. जनतेमध्ये जशी काँग्रेसची मुळे होती तशी विरोधकांची नव्हती. नेहरूंच्या तोडीचा नेता त्यांच्याजवळ नव्हता. सर्व विरोधी पक्ष काँग्रेसच्या पोटातून निघालेले ! पांढरपेशा कम्युनिस्टांचे एकूण सामर्थ्यच मर्यादित. धैर्याचा व दृढ विचारांचा त्यांच्याजवळ अभाव. समाजवादी दुभंगलेले. गांधींवाद व मार्क्सवाद यांची पोपटपंची कारण्यात त्यांचे सर्व आयुष्य गेले. अशोक मेहता, ह. वि. कामत, डॉ. लोहिया, मधू लिमये वगैरे प्रचंड बौद्धिक सामर्थ्यांच्या नेत्यांना Direct action म्हणजे काय तेच कळले नाही. संघवाल्यांजवळ पहिल्यापासूनच स्वतंत्र विचारांचा अभाव. बौद्धिकांचे पारायण केले, शाखेत गेले व काठी फिरवली म्हणजे आपले राज्य येईल असे समजणाऱ्यांचा त्यात भरणा ! विरोधकांचा पायाच मजबूत नव्हता. कोणत्याही इंटरेस्ट ग्रुपने त्यांना आपलेसे केले नव्हते. फक्त विरोध करायचा म्हणून ते विरोध करीत होते. एकूण मतदारांपैकी ४५ टक्के मतदारच १९५२ पासून काँग्रेसला मतदान करीत होते. ५५ टक्के लोक काँग्रेसविरोधी मतदान करीत होते पण हे मतदान संघटित करण्याची, त्याला काँग्रेस विरोधी घाट देण्याची शक्ती विरोधकात नव्हती.

अशा वेळी विरोधी पक्षांनी जनतेत काम करून जनतेत पाय रोवावे लागतात. म्हणूनच लोकशाहीत आंदोलनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सत्ताधारी नेहमीच लोकशाहीत आंदोलनाच्या औचित्याबद्दल प्रश्न करतात. पण हा प्रश्न भ्रमोत्पादक आहे. अविकसित देशांमध्ये जनआंदोलनाद्वारेच राजकारण पुढे रेटावे लागते. कारण पाच वर्षांसाठी जनतेने निवडून दिल्यावर मतदारसंघाचे तोंड न पहाणारे येथे जास्त आहेत. अशावेळी त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करून घेण्याकरिता व जनतेच्या वाढत्या आकांक्षांचे प्रतिबिंब साकार करण्याकरिता जनआंदोलनाची गरज असते. विरोधी पक्षांना जर पुन्हा निवडून यायचे असेल तर सत्ताधाऱ्यांच्या दुप्पट काम करावे लागते. जनमताचा वाढता दबाव विधानसभेवर आणून सरकारचे ढोंगी स्वरूप उघड करावे लागते. यासाठीच जनआंदोलनाची गरज असते. बिजू पटनाईक, वीरेन मित्रा व प्रतापसिंह कैरो यांना याच आंदोलनांपुढे गुडघ टेकवावे लागले. महाराष्ट्रात शेतकरी पक्षाचे नेते केशवराव धोंगडे हे या दृष्टीने आदर्श आहेत, म्हणून अजून २५ वर्षे तरी काँग्रेस त्या मतदारसंघातून निवडून येऊ शकणार नाही असे काँग्रेसवालेच बोलतात. नाथ पैंचा राजापूर हा असाच बालेकिल्ला होता, पण अशी उदाहरणे फार तुरळक !

जनआंदोलनाचे व पाच वर्षे कसलाही लाभ नसताना जनतेत काम करण्याचे लक्ष्य अतिशय अवघड व कष्टाचे आहे. त्यासाठी नि:स्वार्थी, खेड्यात काम करण्यास तयार असलेले व खेडुतांचा विश्वास प्राप्त करू शकणारे प्रचंड कार्यकर्ता दल आवश्यक आहे. काँग्रेसशी समवर्ती (पॅरलल) अशी संघटना आवश्यक आहे.हे अतिशय प्रचंड काम आहे. बोलण्यास व लिहिण्यास सोपे, पण प्रत्यक्ष आचरण्यास फार अवघड. हे विरोधकांना समजलेले नाही. जेथे समजले आहे तेथे विरोधक अजूनही पाय रोवून उभे आहेत. पण हेही फार काळ टिकणार नाही. कारण काँग्रेस, विरोधकांचे बालेकिल्ले उध्वस्त करण्याच्या प्रयत्नात असते; हे राजापूर व कुलाब्याने दाखवून दिले आहे !

१९६७ साली जनतेने एक प्रयोग केला. मूळची काँग्रेसला मत देणारी जनता यावेळी चिडली. आणि काँग्रेसच्या भ्रष्टाचारी राज्याला विटली व आठ राज्यांत विरोधी पक्षांना तिने पदारूढ केले ! १९६७ साली विरोधक नऊ राज्यात पदारूढ झाले. गुजरातचे मंत्रिमंडळही हेलकावू लागले. विरोधकांचा हा अनपेक्षित विजय होता. कारण त्यांनासुद्धा आपल्या हाती सत्ता येईल असे वाटत नव्हते. याचा अर्थ विरोधी पक्षांना कार्य करायची संधी जनतेने दिली होती.

आणि हीच संधी विरोधकांचा भ्रम वाढविण्यास कारणीभूत ठरली. ज्या मतदारसंघात विरोधकांचा जय झाला तो मतदारसंघच विरोधकांनी आपला बालेकिल्ला ठरविला, पण प्रत्यक्षात तसे नव्हते. १९६७ साली उत्तर प्रदेशात जनसंघाने ९९ जागा जिंकल्या, जनसंघवाले गर्वात गेले. अडाणीपणाने त्यानी चरणसिंह मंत्रिमंडळ मोडले आणि १९६९ साली जनतेने जनसंघीयांना धडा शिकविला. अवघ्या ४८ जागा पक्ष मिळवू शकला !

थोडी सत्ता हातात येताच विरोधकांना चढली ! याचे उदाहरण पंजाब व मध्यप्रदेशातील जनसंघ आणि पश्चिम बंगालमधील मार्क्सवादी ! पंजाबच्या संमिश्र सरकारने माकडचेष्टांशिवाय एकही चांगले कार्य करून दाखविले नाही. जनसंघाच्या काडीमोडाने त्रस्त झालेल्या जनतेने पक्षाला पूर्णपणे खच्ची केले. प. बंगालमध्ये गुंडगिरीच्या जोरावर मार्क्सवाद्यांनी १९७१ साली ११३ जागा मिळविल्या पण गुंडगिरी करून जनतेचे समर्थन मिळत नसते व ती वरचढ ठरताच फारशी चालत नसते हे प. बंगालने दाखवून दिले. हा लज्जास्पद पराभव मार्क्सवाद्यांच्या कुकृत्यांचे फल आहे. कुठेही विरोधक धड वागले नाहीत. बिहारमध्ये तर १९६७ ते १९७२ पर्यंत ९ मंत्रिमंडळे झाली. पाच वर्षांपैकी दोन अडीच वर्षे राज्यात राष्ट्रपती शासन लागू होते. चरणसिंहानी उत्तर प्रदेशात सौदेबाजी केली. त्यात खुद्द चरणसिंह आदळले व पक्षाचा प्रचंड पराभव झाला ! विरोधक सत्तेवर आले ते एकमेकांचे पाय ओढण्यासाठी ! समाजवादी व जनसंघ यांचे सख्य विळ्या-

पृष्ठ ६० वर

नलिनी अंबाडे

# नऊ लाखांची गोष्ट !

ट्रिंग...टिरिंग...ट्रिंग...ट्रिंग...

'हलो'

'मिसेस अंबाडे, प्लीज. आयम् लिमये.'

'स्पीकिंग. बोला, काय हुकूम !'

'चैत्री हळदीकुंकवाला आला नाहीत ते.'

आमच्या सवतीबाई रुसल्या होत्या. पाडव्याला नवी चेन घातली गळ्यात तिच्या. माझ्यापेक्षा तिच्यावरच माया मिस्टर अंबाड्यांची.

'एवढ्यात नवी चेन ? किती रनिंग झालं ?'

'काहीतरी, सात हजार मैल झालंय वाटतं. बरं सकाळीसकाळी काय आज ?'

'मालमसाला आहे थोडासा – तुमच्या 'माणूस'साठी – या बाजूला आलात तर ऑफिसात डोकावून जा.'

'पण थोडंस फोनवर सांगाल.'

'हिंदू'च्या तीन तारखेच्या अंकात मोठ्ठं टेंडर आलंय. मोठ्ठी जाहिरात. म्हणजे नऊ लाखाचं टेंडर आहे. धर्मपुरी तालुक्यात उन्हाळ्यासाठी पंपिंग सेटस् हवेत म्हणे...सहाशे पंपसेटस्.'

'मग टेंडर 'मायर्स'ला मिळालेलं दिसतंय.'

इतक्यात त्यांच्या ऑफीसातला दुसरा फोन खणखणला. ट्रंककॉल असावा. हलो हलो करून मीच फोन बंद केला. मद्रासचे श्रीधर लिमये म्हणजे भारी उद्योगी व्यक्ती. मायर्स व वास्प पंपांचे दक्षिणेचे एकमेव वितरक. काय असावं बरं असा विचार करीतच बाहेर पडले. प्रथम 'हिंदू' दैनिकाच्या ऑफिसात गेले. मौंट रोडवर शांत अन् प्रशस्त इमारत. रिसेप्शनिस्ट शेजारीच अंकांची फाईल. कुणालाही पहायला मोकळीक. जर गेल्या महिन्याची फाईल पहायची असेल तर फी पडते. तीन मार्चचा अंक चाळला. मोठ्ठी जाहिरात कुठे दिसेना. नाही म्हणायला पानापानावर 'खिडक्या' होत्या. अशांपैकीच एक खिडकी म्हणजे मला हवी असणारी जाहिरात.

मी तिथल्या कारकुनाला विचारले मग–

'मला तीन तारखेचा अंक हवाय. डबल किंमत ना?'

'ओक्के' म्हणून त्याने रेकार्ड-सेक्शनला फोनवर तारीख कळविली व माझ्यासाठी ५४ पैशांची पावती तयार करू लागला. इतक्यात इंटरनल फोन आला, त्याने तो घेतला व माझ्याकडे दिला.

'तुम्हाला अंक कशाकरिता हवाय?'–फोनमधून कुणीतरी.

'सहजच!'

'तुम्ही कुणाकडून आलात?'

'म्हणजे? मी नाही समजले!'

'म्हणजे असं, की पोलीसखात्यातून, की सेक्रेटरिएटमधून, की अॅग्रिकल्चर खात्यातून?'

'तसं काहीही नाही. 'माणूस' म्हणजे 'मॅन' नावाचं एक वीकली निघतं पुण्याहून. त्याच्या संपादकांनी ३ तारखेचा अंक मागितलाय'–मी सरळ दडपून दिलं. 'कशासाठी ते मला माहीत नाही.'

'धर्मपूरी टेंडरसाठीच ना?' – आता मी चमकले. तो आवाज पुढे सांगू लागला, 'तुम्ही असं करा, तुमचं संपूर्ण नाव, पत्ता, व्यवसाय देऊन एक लेखी अर्ज रिसेप्शनिस्टकडे द्या, की मला अमुकअमुक अंक हवाय. पैसे भरण्याची आवश्यकता नाही.'

'गेल्या आठवड्यातला तर अंक, त्याला अर्ज नि बिर्ज कशाला? तुम्ही म्हणत असाल तर मी लेखी अर्ज देण्यास तयार आहे.'

'बरं, फोन प्लीज रिसेप्शन-क्लार्ककडे द्याल का?'

मी रिसीव्हर दिला अन् अर्ज लिहू लागले. जेमतेम चारच ओळी लिहून झाल्या असतील नसतील, तोवर फोनवरील संभाषण संपले. तो क्लॉर्क म्हणाला 'तुम्ही अर्ज देऊन जा. आम्ही कन्सिडर करू व अंक शिल्लक असेल तर जरूर देऊ. पुढल्या आठवड्यात चौकशी करा.'

मी फक्त एकदाच त्याच्याकडे पाह्यलं. अर्ज फाडून टाकला अन् शांतपणे बाहेर पडले. त्या फोनमधल्या (दीड) शहाण्यास वाटत असावं, की गेल्या आठवड्याचा अंक मला कुठे मिळणारच नाही. मी समोरची बस पकडली आणि 'वॉटर सप्लाय स्पेशालिस्ट प्रायव्हेट लिमिटेड'मध्ये येऊन उभी राहिले. एअर कंण्डिशण्ड थंड वातावरणात एकदम बरं वाटलं. मला पहाताच त्यांनी वॉकी-टॉकीवरून टेंडर्सची फाईल मागविली. एका मिनिटात फाईल आली. त्यांनी त्यातले कटिंगसमोर टाकले. 'हिंदू' ऑफिसात आलेल्या अनुभवामुळे माझीही उत्सुकता ताणली गेलेली होती. अधाशाप्रमाणे वाचून काढले. मोठ्या टाइपात 'टेंडर नोटीस' ही अक्षरे. तमीळनाडूच्या गव्हर्नरांच्यावतीने, रीजनल रिसर्च ऑफिसर, ड्राय लॅण्ड इंप्रुव्हमेंट स्कीम, धर्मपुरी,

जिल्हा सेलम, यांनी टेंडर्स मागविली होती. एकूण दहा कलमांखाली, दहा प्रकारचे सामान होते. एकेका टेंडर फॉर्मची किंमत ५·२० असून, मनीऑर्डरनेच पैसे पाठवायचे होते. दि. १५ मार्च १९७२ रोजी दुपारी ठीक ३॥ वाजता टेंडर्स उघडली जाणार होती. तीन हॉर्स पॉवरची २००, पाच हॉर्सपावरची २००, साडेसात हॉर्सपॉवरची १५० इंजिने, विजेच्या मोटर्स, स्टार्टर्स व स्विचेस, डिझेल इंजिने, पंपसेटस् असे सामान होते. मला तर त्यामध्ये वावगं काही दिसलं नाही. मी आपलं सहज विचारलं –

'किती होईल सगळ्यांची किंमत ?'

'सव्वा नऊ–साडेनऊ–म्हणजे लाखाच्या–घरात जाईल'

'मग तुम्ही मागविले का फॉर्म्स ?'

'हो, एक मागवला. त्यात होतं, की दहा हजार रुपये बयाणा रक्कम – आय मीन् अर्नेस्टमनी डिपॉझिट हवे आहे. का, कोणजाणे माझ्या मनात कुठंतरी पाल चुकचुकली आणि फॉर्म तसाच ठेवून दिला.'

'म्हणजे ?'

'म्हणजे असं' की पंधरा मार्चला टेंडर्स उघडण्याच्या वेळी हजर रहाण्याकरिता दहाबारा कंपन्याचे प्रतिनिधी तेथे गेले तेव्हा समजलं, की त्या नावाचं तेथे ऑफिसच नाही. अन् तसं खातच अस्तित्वात नाही.'

'मग काय केलं त्यांनी ?'

'काय करणार ? पोलिसात तक्रारी नोंदविल्यात एकेकांनी. ती एक गँग असली पाहिजे. बँकेतला कुणीतरी, पोस्टातला कुणीतरी अन् सरकारी खात्यातलीच काही बुद्धिमान मंडळी. एकट्यादुकट्याचं हे काम नाही.'

'ते काहीही असो, लिमये साहेब; तुमचं अभिनंदन करायला हवं' एवढ्यांत कॉफीचे कप आले व विषय तिथेच संपला. २० मार्चला तमीळनाडू सरकारने खास पत्रक प्रसिद्ध केले, की सदर जाहिरातीचा व सरकारचा काहीही संबंध नाही. असा कोणताच ऑफिसर नाही नि खातेही नाही. जनतेने सावध रहावे. किती कंपन्या फसल्यात देव जाणे ! आजतरी स्वतंत्र बाण्याच्या भारदस्त 'हिंदू' दैनिकावर ठपका ठेवण्यास सरकारला चान्स मिळालाय !

□ □ □

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## धोतर : बंगाली बाबूचे

भारतीय साडीने परदेशातदेखील खूप लोकप्रियता मिळवली याची कारणं आकर्षक रंग नि तऱ्हतऱ्हेची डिझाईन्स हीच मुख्यतः असावीत. असलं भाग्य धोतराच्या वाटयाला मात्र आलं नाही कधीच...येण्याची शक्यताही नाही. धोतरात तसं आहेच काय म्हणा आवडण्यासारखं ! रंगहीन, कळाहीन, लांबलचक कापडाचा तुकडा. बरं नेसायला तरी सोयीचा आहे का ? छे ! नावच नको. अंगापेक्षा बोंगा जास्त. शिवाय ते सारखं सावरावं लागतं. खाली लोंबणारा सोगा हातात वाळगायचा...एक हात त्यातच अडकून राहतो. हातात धरायचा कंटाळा आला; की सदऱ्याच्या खिशात तो कोंबायचा. आजच्या धकाधकीच्या दिवसात हात अन पाय अगदी मोकळे असणं कितीतरी आवश्यक आहे ! धावतपळत ट्राम नि बस पकडायची चालत्या वाहनात चढणं नि त्यातून उतरणं ह्या दोन्ही प्रकारच्या कसरती करायला हातपाय अडकलेले राहून कसं चालणार ? पण काही लोक इतके एक्स्पर्ट असतात की एका हाताने धोतराच्या सोग्याचं 'राष्ट्रीय ओझं' सावरीत नि त्यात पाय अडखळणार नाही एवढी खबरदारी घेत झक्कासपैकी चालत्या वाहनात एन्ट्री मिळवतात; दोन पाय अडकवलेल्या पँटवाल्यांनाही जे जमणारे नाही ते करून दाखवतात व त्यांच्याकडून मूक शाबासकीही मिळवतात.

एकूण धोतर नि ऐसपैस पंजाबी ( = अंगरखा) हा म्हणे राष्ट्रीय पोषाख आहे. त्याचा अभिमान असायलाच हवा. म्हणून तर बंगालमधली तरुण मंडळीसुद्धा देशाभिमान म्हणून म्हणा किंवा आपण कुणीतरी विशेष आहोत ह्या भावनेने म्हणा हटकून धोतर नेसून हिंडताना नि ऐटीत चालताना दिसतात. फिरायला किंवा सिनेमाला जाणारी अनेक नवी जोडपी बघा. बायको जरीची साडी, दागदागिने, भांगात सिंदूर नि पायांना आलता लावून खूप नटलेली असते. पण तिचा 'स्वामी' मात्र एकलांगी धोतरातच आढळणार. ह्या धोतराचा काचादेखील इतका सैल की त्यातून एखादा माणूस सहज आरपार जाऊ शकेल. धोतर नेसणाऱ्या माणसाला हमखास वाटत असतं, की आपण कुणीतरी मोठे जमीनदार आहोत...निदान एखादा 'भद्रलोक' म्हणजे प्रतिष्ठित बाबू तरी आहोतच...यातच तो दाढी वाढवलेला असेल तर त्याला वाटतं आपण कवी आहोत; किंवा धोतर मळकट असेल, खांद्यावर अडकवलेली झोळी असेल नि एकटाच शून्य नजरेने हिंडत असेल तर तो स्वतःला आर्टिस्ट समजतो हे नक्कीच ! क्वचित तो असतोही !

एकूण अशी आहे ही धोतराची कथा म्हणूनच पोषाखात कितीही क्रांती झाली असली तरी धोतराचं पूर्णतः उच्चाटन झालेलं नाही. ते आपली 'पोझिशन'

टिकवून आहे. अशा वेळी नव्याने धोतर नेसायला सुरुवात करणाऱ्या तरुणांचे मजेदार अनुभव ऐकण्यासारखे असतात. तेही मोठ्या चवीनं सांगतात व आपल्यालाही ऐकायला गंमत वाटते. असाच एक अनुभव एका तरुणाने सांगितला. म्हणाला,

"त्यादिवशी प्रथमच धोतर नेसून सकाळच्या प्रहरी मी बाहेर पडलो. मला लवकर चालता येईना. धोतरात पाय अडखळला तर एखाद्या तांदुळाच्या पोत्यासारखे आपण धप्दिशी रस्त्यात पडू की काय अशी सारखी काळजी वाटत होती. धोतराचा सोगा हातात धरून मी कंटाळलो, तेव्हा तो अंगरख्याच्या खिशात कोंबला. पण पुन्हा आली ना पंचाईत ? खिशातली काही वस्तु काढायची म्हटलं की, आधी तो धोतराराचा बोळा काढून दुसऱ्या हातात धरायचा तेव्हा हवी असलेली वस्तु रूमाल पैसे इ. काढता येणार. एकदा मोठ्या मुष्किलीने मी बसमध्ये प्रवेश मिळवला व मला बसायला सीटही मिळाली. पण माझ्या उतरण्याच्या वेळेपर्यंत ती बस इतकी काही खच्चून भरली की दरवाजापर्यंत येणं मुष्किल. म्हणून माझा स्टॉप येण्याच्या बरंच अगोदर मी उठलो. पण धोतरात पाय अडखळू लागले. मला आश्चर्यच वाटलं. मी तर आपल्या धोतराचा सोगा काळजीपूर्वक सदऱ्याच्या खिशात कोंबाला होता. तो खाली लोंबेल कसा ?...तेवढ्यात माझ्या बाजूला बसलेल्या सभ्य गृहस्थाने कपाळाला आठ्या घालून माझ्याकडे पाहिलं तेव्हा कुठे माझ्या लक्षात आलं, की मी सदऱ्याच्या खिशात व्यवस्थित कोंबलेला धोतराचा सोगा माझ्या नसून त्याच्या धोतराचा होता. रागाने त्याने मला म्हटलं– ' मोशाय, कधीपासून धोतर नेसायला लागलात तुम्ही ?' जणू काही हा माझा एकट्याचाच दोष होता !

तेव्हा मला वाटायला लागलं, की कलकत्त्याच्या लोकांनी आता एखादा टाइट ड्रेस प्रचारात आणावा आणि धोतर वापरणं बंद करावं...असा विचार करीत असतानाच मी बसमधून खाली उतरलो पण धोतराचं एक टोक बसला अडकलं. बस पुढे निघालीसुद्धा. नेसलेलं धोतर दोन्ही हातांनी सांभाळीत काही अंतर मला बसच्या मागे धावावं लागलं. मी पडलो नाही इतकंच. शेवटी धोतर फाटलं तेव्हा माझी सुटका झाली. माझ्या धोतराचा एक तुकडा बरोबर घेऊन बस भरधाव निघून गेली.

हे सगळं ऐकलं तेव्हा हसताहसता पुरेवाट झाली. तोही हसण्यात साथ देत होता. मग त्याला विचारलं कायरे दुर्गापूजेच्या दिवसात खूपशी लहान मुलंसुद्धा नवं धोतर नेसून बापाचा हात धरून लुटुलुटु चालताना दिसतात. खूप गोड दिसतात ती मुलं. पण त्यांना धोतर सावरायचा त्रासच होत असेल.

तो म्हणाला तसं नाही. ' छेलेमानुष 'साठी वेगळं धोतर असतं. ते सगळीकडून शिवलेलं असतं. मुलाने नुसते दोन पाय अडकवायचे आणि कमरेला फिट करायचं की झालं. मुलांसाठी असं स्पेशल धोतर विकत मिळतं.

हीपण एक नवलकथाच भासली !

## दोन क्षणचित्रे

इलेक्शन आटोपले...भरघोस यश पदरात पडले...कॉंग्रेसवाले मोठ्या समारंभपूर्वक यशाचे मानकरी म्हणून मिरवीत होते चौरंगीच्या रस्त्यावरून, पण एकाचे डोळे मात्र पाण्याने डबडबलेले ! आनंद साजरा करतेवेळी डोळ्यांत अश्रू यावेत हे आश्चर्यच ! वाटलं, चौकशी करावी. म्हणून गृहस्थांची गाठ घेतली. विचारलं 'हे अश्रू कशासाठी ? ते म्हणाले, 'काय सांगू ! माझं घर आहे बेलियाघाटाला पण गेली दोन वर्षं मी घरापासून दूर आहे...मला घरी जाणंच (तेथील परिस्थितीमुळे) अशक्य झालं; इतकं की आईवडिलांच्या शेवटच्या क्षणीही मला त्यांच्याजवळ जाता आलं नाही "

हे ऐकून आठवलं–खरंच, गेल्या दोन वर्षांत बेलियाघाटामध्ये नक्षलवादी व CPM वाले यांनी असा काही धुमाकूळ घातला होता, की सांगता सोय नाही. तिसऱ्या माणसाला तर प्रवेश मिळणं मुष्किल झालंच होतं. पण त्यांच्यातही आपापसात सदैव मारामाऱ्या. वर्तमानपत्रात बेलियाघाटाचं भयानक वृत्त नाही असा दिवस क्वचितच उगवला असावा त्या दोन वर्षांत !

आता चित्राची दुसरी बाजू समोर आली. इलेक्शन आटोपले आहे. परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांप्रमाणें CPM पक्षाच्या लोकांचे चेहरे उतरलेले म्लान झालेले दिसताहेत. मनातल्या मनात संतापाने आग होते आहे नि अपयशाचं दुःख ते नको नको म्हणत असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर फतकल मारून बसले आहे ! अशाच एका गृहस्थांची भेट झाली. त्यांना दिलासा देण्याच्या उद्देशाने विचारपूस केली. ते कळवळून म्हणाले 'अहो' मी रहाणारा बारानगरचा. पण...पण आता मला कधीही माझ्या घरी जाता येणार नाही हो !


त्यांचं म्हणणं खरं असावं. बारानगर म्हणजे CPM चा केवढा तरी दबदबा असणारं ठिकाण. पण आज, अरेरे ! नेमके तिथेच तोंडघशी पडण्याची पाळी यावी ना ?

पूर्वी ह्याच बारानगरमध्ये किती रक्तपात झाला नि कितीजण बळी पडले याचा हिशेब करू लागलो तर अंगावर काटा उभा राहील. बारानगर असलं म्हणून काय झालं सर्वसाधारण लोकांना हिंसाचाराचा वीट येणारच. साहजिकच त्यांचं मतपरिवर्तन होणार. 'निदान सुखाने तरी जगता येईल' असा विचार करूनच लोक मुकाट्याने मतदानकेंद्रावर जाऊन गाईच्या पाठीवर छाप मारून आले असले तर नवल कसलं !

एके काळी इतरांना थरथर कापायला लावणारा CPM पक्ष आज विपरीत दान पडल्यामुळे गोगलगाय बनला आहे ! चालायचंच ! आता त्यांची पाळी ना ! !

□ □ □

हीही एक कला आहे,
तिचेही आपले म्हणून एक शास्त्र आहे,
काही नीतिनियम आहेत, काटेकोर बंधने आहेत,
नेमून दिलेला अभ्यासक्रम आहे,
तो शिकवण्यासाठी शाळा आहे,
म्हणूनच मुंबईकरांनो, सावधान....

# खिसा  सांभाळा!

**प्रतिनिधी**

हा इशारा अर्थसंकल्प-अधिवेशन वगैरे वगैरेंच्या संदर्भात नाही. अनेक सार्वजनिक जागी ' खिसा पाकीट सांभाळा ' किंवा ' खिसेकापूंपासून सावध रहा ' ' जेब कतरोंसे बचके रहिये ' वा ' बीवेअर ऑफ पिकपॉकेट्स् ' असे फलक लावलेले असतात.

प्रतिदिनी मुंबईतील हजारो लोकांचे खिसे सफाईदारपणे कापले जातात. अगदी पत्ता लागत नाही. काही दिवसांपूर्वीची गोष्ट. रात्रीच्या गाडीने मी नासिकहून मुंबईकडे येत होतो. गाडीला तुफान गर्दी होती. एका बाकावर एक वयस्कर पागोटे-वाला गृहस्थ बसला होता. त्याची चुळबुळ चालली होती. अंगरख्यात असलेल्या बंडीतून त्याची चार अंकी रक्कम गायब झाली होती. आईसफ्रुटस् बनवायला लागणारी यंत्रसामग्री खरेदी करायला तो निघाला होता. गर्दीचा फायदा खिसेकापूने पूर्णपणे घेतला होता. पण शेवटी गर्दीच त्याला पकडायलाही कारणीभूत झाली. खिसा कापला गेल्याचे लक्षात येताच त्याने आपल्या पुतण्याला हे सांगितले. तात्काळ कुजबुज झाली. प्रवाशांत एक दांडगेश्वर होते. त्यांनी सर्वांना इशारा दिला, कोणीही येथून हलू नका. अर्थात गर्दीच एवढी प्रचंड होती, की कोणी प्रवाशी हालचाल करणे शक्यच नव्हते. इगतपुरी येताच खिडकीजवळ बसलेल्या प्रवाशाने पोलिसांना

बोलविण्याची व्यवस्था केली आणि मग ड्रामा रंगू लागला. पोलीस अधिकाऱ्यांच्या सराईत नजरेने माणसे हेरायला सुरुवात केली आणि मग त्याने एका व्यक्तीची बकोटी धरली. तो माणूस कबूल होईना. त्याने साळसूदपणाचा आव इतका बेमालूम आणला होता, की कोणालाही वाटावे, हा त्यातला नाही. झडतीत रक्कम मिळाली नाही. मात्र कागदाच्या तीन-चार कपट्यात व्यवस्थित बांधून ठेवलेला ब्लेडचा तुकडा त्याच्या पैशाच्या पर्समध्ये एका कोपऱ्यात आढळला. एवढा पुरावा पोलिसांना पुरेसा होता. मार बसताच त्याने कबूल केले. रक्कम त्याने दुसऱ्या साथीदाराकडे पोचवली होती. साथीदार पुढील डब्यात गेल्याचे त्याने सांगितले. गर्दीचा व रात्रीच्या वेळेचा फायदा त्याने उठवला होता. पोलीस व खिसेकापूसह म्हाताऱ्याला बिचाऱ्याला कल्याण येथे उतरावे लागले. गर्दीमुळेच तो तेथून सटकू शकला नव्हता. एक माणूस पकडला गेल्यावर इतर साथीदारांना पकडायला वेळ तो कसला लागणार ?

मुंबईतील खिसेकापूंचे वार्षिक उत्पन्न काही लाख रुपये असते असे सांगितले, तर आश्चर्य वाटेल. हे उत्पन्न सुमारे ४० लाख रुपयांवर असते असे माहीतगारांचे म्हणणे आहे.

काही खिसेकापू महिना तीन ते चार हजार रुपये एवढी कमाई करून ऐष-आरामात जीवन जगत असतात. तर काही जण हा धंदा फुटकळ प्रमाणात करतात. त्यांच्या टोळ्या असतात. बॉस असतो. त्यांना त्यात कौशल्य प्राप्त करून घेण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. यासाठी मुंबईत एक शाळाही चालते म्हणे ! बॉस हा फक्त इशारा करण्याचे काम करीत असतो. निरनिराळ्या टोळ्यांमध्ये काही अलिखित संकेतही असतात. प्रत्येक टोळी एखाद्या ठराविक विभागातच वावरत असते. तेवढ्या विभागातीलच खिसे ती टोळी कापणार. दुसऱ्यांच्या विभागात ते 'हस्तक्षेप' करणार नाहीत. समजा, चर्चगेट ते दादर या स्टेशन्स दरम्यान खिसे कापणारी एखादी टोळी आहे. चर्चगेटपासून त्यांनी एखादे बडे गिऱ्हाईक हेरून ठेवले आहे.पण काही कारणामुळे दादरपर्यंत त्याचा खिसा साफ करता आला नाहीं, तर मग तो खिसेकापू पुढे काय करणार ? यावरही तोडगा आहे. त्यापुढील विभागात डल्ले मारणाऱ्या टोळीपैकी कोणाला तरी अशा बड्या गिऱ्हाईकाची कल्पना दिली जाते. साधारणपणे किती पैसे असावेत याचा अंदाज ठरविला जातो आणि मग त्यावर कमिशन ठरते. ती टोळी यात यशस्वी ठरली तर पहिल्या टोळीला ठरलेले कमिशन मिळते. जर त्यांनाही ते जमले नाही तर त्यापुढील टोळीला ते गिऱ्हाईक दाखविण्याची कामगिरी दुसरी टोळी करते. अनेकदा तीन-चारशे मैल वा त्यापेक्षा जास्त दूरपर्यंतही हा पाठलाग केला जातो. याबाबत एक गंमतीदार गोष्ट ऐकायला मिळाली. भाऊचा धक्का (मुंबई बंदर) येथून कोकणात जाणाऱ्या बोटी सुटतात. हे एक गजबजलेले, गर्दीचे ठिकाण. शिवाय गावाकडे जाणारे लोक पैसाअडका बरोबर घेऊन जाणारच. म्हणजे पर्वणीच. कोकणात जाणारे कुळवाडी अशिक्षित, गरीब असतात. त्यामुळे ते

खिसेकापूंचे हमखास गिऱ्हाईक ठरतात. असाच एक कुळवाडी वेंगुर्ल्याकडे चालला होता. नुकतीच तालीम पार पाडून व्यवसायात उतरलेल्या २० ते २२ वर्षे वयाच्या एका खिसेकापूने त्याला हेरले. धक्क्यावरील गर्दीत धक्का मारून काम साधणे जमले नाही. मग पाठलाग चालू झाला. शेवटी एकदाची संधी मिळाली. खिसा उडवला गेला. पण एवढे सारे करून हाती आलेले घबाड किती होते ? अवघे ७ रुपये !

अनेक वेळा खिसेकापू पकडले जातात. त्यांच्यावर खटले चालतात. त्यांच्यापैकी बहुतेकजण बडे वकील बाजू मांडण्यासाठी एन्गेज करतात. मुंबईत खिसेकापूंचे वकीलपत्र घेणारे अनेक बडे वकील आहेत. त्यांची लठ्ठ फी हे खिसेकापू देतात. बऱ्याच वेळा हे वकील इतरांच्याही उपयोगी पडतात. उदाहरणार्थ, दोन-तीन वर्षांपूर्वी मुंबईतील एका मॅजिस्ट्रेटचा खिसा महालक्ष्मी रेसकोर्सवर कापला गेला. मॅजिस्ट्रेटसाहेब पडले मोठे वस्ताद. त्यांनी खिसेकापूंसाठी कोर्टात उभ्या राहणाऱ्या एका बड्या वकीलाला तात्काळ गाठले आणि काय गंमत पहा ! एक दिवस उलटण्याच्या आतच त्या वकिलाने साहेबांना त्यांची पर्स पैशांसह परत केली.

दुसऱ्या एका मॅजिस्ट्रेटला आलेला अनुभव वेगळा होता. एका खिसेकापूला त्याने शिक्षा सुनावली. त्यानंतर तो खिसेकापू म्हणाला, ' साहेब, आपण मला शिक्षा दिलीत पण माझी माणसं आठवड्याच्या आतच आपला खिसा कापतील. आठवड्याभर साहेबांना पोलिसांनी संरक्षण दिले. त्यानंतर दोन दिवसांनी साहेबांना आपला खिसा कापला गेल्याचे आढळले.

जाणकारांच्या मते खिसेकापण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांत बरेच कमी झाले आहे. याचे कारण असे, की चोरटा व्यापार व दारुची ने-आण करण्यात कमी श्रमात जास्त पैसा मिळवता येतो म्हणून अनेक लोक आता तो मार्ग जास्त पसंद करतात.

अनेक वेळा खिसा कापला जाऊनसुद्धा लोक तक्रार करीत नाहीत. काही लोकांचे म्हणणे असते, की तक्रार करून पोलीस हवी तशी दखल घेत नाहीत, म्हणून त्याचा काही उपयोग होत नाही. जेवढ्या खिसेकापूंना कोर्टात शिक्षा होते त्या सर्वांची माहिती मुंबई सी. आय. डी. ठेवते.

बी. ई. एस. टी. चे बस स्टॉप्स, बॉम्बे सेंट्रलचा एस. टी. चा बसस्टॉप (विशेषतः सणासुदीस लोक बाहेरगावी जातात यावेळी तर हा स्टॉप म्हणजे खिसेकापूंना परवणीच.) रेल्वे स्थानके, गच्च भरलेल्या आगगाड्या, चित्रपटगृहे, बसच्या व इतर तिकिटांच्या रांगा या साऱ्या जागी खिसेकापूंची चंगळ होत असते.

प्रत्येक खिसेकापूंची स्वतःची अशी पद्धती असते, काहींची बोटे सफाईदार असतात. अगदी अलगद ते पर्स उडवतात. तर काही ब्लेडचा वापर करतात. काही बसमध्ये तर काही आगगाड्यात खिसे कापतात. काही फक्त उभ्या असणाऱ्यांचे वा चालणाऱ्यांचेच खिसे कापतात, तर काही रात्रीच व इतर दिवसा खिसे कापतात.

आगगाडी वा बसमध्ये घाईघाईने चढणाऱ्यांच्या व गर्दीच्या मानसशास्त्राचा खिसेकापूंनी बरोबर अभ्यास केलेला असतो. थोडी धक्काबुक्की करून ते यात आपले काम साधतात. बसमध्ये चढून खिसे कापणारे काही वेळा कंडक्टर्सना पैसे देतात तर अनेक वेळा जिवाच्या भीतीने हे सारे माहिती असले, तरी बोलायला कंडक्टर्स घाबरतात.

बहुतेक खिसेकापू टोळचा टोळ्याने खिसे कापतात. एकजण धक्का मारतो दुसरा पर्स मारतो आणि तिसऱ्याकडे ती 'पास ऑन' करतो. एखाद्या वेळी प्रवासी व खिसेकापूंची जुंपलीच तर मध्यस्थी म्हणून एखादा पुढे येऊन साळसूदपणे आपल्या साथीदाराला वाचवतो. वेळप्रसंगी 'थांबा याला पोलिसांच्या ताब्यात देतो' असे सांगून त्याला आपल्या ताब्यात घेतो. कोर्ट कचेऱ्यांची लफडी नकोत म्हणून लोकही अशा प्रकारच्या 'समाज सेवका'च्या हाती गुन्हेगाराला द्यायला तयार होतात. काही अंतर गेल्यावर गुन्हेगाराला सोडण्यात येते किंवा तो हाताला हिसका देऊन पळून गेल्याचे नाटक केले जाते.

या व्यवसायात स्त्रियाही असतात. त्या स्त्रियांच्या डब्यात शिरून काम करीत असतात. बांगड्या, गळ्यातील सोन्याच्या साखळ्या उडविणे हाही धंदा त्या करतात. गाडी सुरू होण्याच्या सुमारास खिडकीतून हात घालून खिडकीजवळ बसलेल्या एखाद्या स्त्रीच्या गळ्यातील चेनला हिसका देऊन ती उडविण्याचे प्रकार मुंबईत सर्रास चालतात.

जेव्हा खिसेकापू पकडला जातो तेव्हा त्याचा बॉस वकीलाला फोन करून त्याच्या बचावाची व्यवस्था करतो. कायद्याच्या कचाट्यात सापडून त्याला शिक्षा झालीच तर बॉस त्या खिसेकापूच्या कुटुंबाला दरमहा आर्थिक मदत देतो. हे बॉसेस स्वतः या उद्योगापासून दूर असतात. ते चांगल्या फ्लॅट्समध्ये चैनीत रहातात. स्वतःच्या मुलाबाळांना बड्या शाळेत घालतात. गाड्या बाळगतात. तसेच हे बॉसेस 'बड्या गिऱ्हाईकां'ची माहिती काढणे व पोलिसांचे हात ओले करण्याचीही कामे करतात.

मुंबईत सुमारे दोन हजारावर खिसेकापूंची पोलिसांच्या दप्तरी नोंद आहे. फार वर्षांपूर्वी बाबू चष्मेवाला नावाच्या एका भयंकर व सराईत खिसेकापूचा मुंबईत बराच बोलबाला झालेला होता. हा बाबू म्हणे गिरगावात रहायचा आणि ट्रॅमच्या त्या जमान्यात ट्रॅमने प्रवास करणाऱ्यांचे खिसे सफाईदारपणे खाली करायचा. मुंबईतील त्या ट्रॅम्स गेल्या. अगदी म्युझियममध्येसुद्धा त्या आता बघायला मिळत नाहीत. ट्रॅम्सबरोबर तो बाबू कुठे गेला कोण जाणे. बाबूचा जमाना संपला असला तरी हा व्यवसाय अजूनही तेजीत चालू आहे. हजारोंची पाकिटे रोजच्या रोज गुल होताहेत आणि खिसेकापू लक्षावधी रुपये कमवताहेत.

□ □ □

# नियोग



चंद्रसेन टिळेकर

दोन दिवसांपूर्वीचं ते कीर्तन ऐकल्यापासून डॉ. कवठेकर अस्वस्थ झाले होते. इतके अस्वस्थ, की अनोळखी माणसानंही सहज हेरावं, की कुठंतरी काहीतरी चुकलंय.

वास्तविक दिवसभर पेशंट हाताळून झाल्यावर आलेली मरगळ जावी म्हणून केवळ विरंगुळा या हेतूनं ते कीर्तनाला जात. अध्यात्माची आवड वगैरे भानगड काही नव्हती. एक मात्र खरं, की ते कीर्तनात रंगून जात. हजारो वर्षांपूर्वीचा तो काळ, ते प्राचीन पुरुष, नीती-अनीतीच्या कल्पना – त्यांतून उद्भवलेल्या प्रचंड लढाया.... सारं काही डॉक्टर तन्मयतेनं ऐकत. केव्हाकेव्हा पत्नी बरोबर असली तर परतताना तिच्याबरोबर चर्चाही करीत पण ती तेवढ्या पुरतीच. दुसऱ्या दिवसापासून डॉक्टर आपल्या कामात पुन्हा गर्क !

पण या वेळचे काही वेगळेच होते. खरं तर सूक्ष्म दृष्टीनं डॉक्टरांकडे पहाणाराला गेले काही दिवस ते विचारात आहेत हे सहज जाणवलं असतं. पण त्या दिवशीचं ते कीर्तन ऐकल्यापासून विचारांची जागा अस्वस्थतेनं घेतली होती आणि आता जस जशी संध्याकाळची सहाची वेळ होत आली तशी ती अस्वस्थता आणखीनच वाढली. खरे म्हणजे आज रविवार दवाखाना बंदच असायचा; पण काल पेशंट्सच्या गडबडीत चंदुमल शेटजींची मुलगी उर्मिला, हिला तपासायचं राहून गेलं होतं म्हणून डॉक्टरांनी तिला आज बोलावलं होतं.

डॉक्टरांच्या येरझाऱ्या चालू असताच उर्मिला आली. 'ये, बैस,' डॉक्टर संथ स्वरात म्हणाले.

सुडौल बांधा, गौर काय नि मोहक चेहरा यांमुळे उर्मिला लांबून पहाणाराला निश्चितच आकर्षक वाटायची. पण थोडसं जवळून पाहिलं, की तिच्या चेहऱ्यावरची निःसत्वता लपत नव्हती. लवकरच तिला तेविसावं वर्ष लागणार होतं. परमेश्वरानं तिला इतका गोड चेहरा दिला होता, पण तितकाच घोर अन्याय तिच्यावर केला होता.

वयाच्या सातव्या वर्षी तिला क्षयाची बाधा झाली. चंदुमलशेटजीनं पाण्यासारखा पैसा खर्च केला पण तरीही सतत आठ वर्षं उर्मिलेला त्या रोगाशी झुंज द्यावीच लागली. शेटजींची तर फार मोठी पंचाईत झाली होती. मुळात हे गाव होतं डोंगर माथ्यावर – एक थंड हवेचं ठिकाण म्हणून अमाप प्रसिद्ध. श्रीमंत लोकांचं आवडतं अशा गावात शेटजींचा धंद्यातला जम चांगलाच होता. उर्मिलेला हॉस्पिटलात ठेवायची म्हणजे ससून शिवाय हॉस्पिटल नव्हतं. म्हणजे या गावापासून जवळजवळ दोनशे मैल दूर. शेटजींजवळ उर्मिलेसाठी भरपूर पैसा होता. पण वेळ मात्र नव्हता. पण त्यांच्या सुदैवानं तीन-चार वर्षांपूर्वीचं पुण्याचे डॉ. कवठेकर इथं स्थायिक झाले होते. त्यावेळी ते ऐन पंचविशीत असावेत. त्यांनी शेटजींना धीर दिला. सकाळ संध्याकाळ सतत दोन वेळा ते उर्मिलेला तपासायला जात. वाटेल ती आणि वाटेल त्या किमतीची औषधं ते स्वतः पुण्याला जाऊन आणीत. नवीन नवीन येणारी मेडिकल जर्नल्स अभ्यासीत. आपल्या हातून काही कमी राहू नये म्हणून ते तीन-चार महिन्यांतून एकदा उर्मिलेला पुण्याला नेत. तिथं डॉ. मेघनाथ

देशपांडे, टी. बी. स्पेशालिस्ट यांना तिला दाखवीत. त्यांच्याशी सविस्तर चर्चा करीत नि पुन्हा माघारी येत.

उर्मिलेबरोबर डॉक्टरांनाही सतत आठ वर्षे टी. बी. शी झगडावं लागलं होतं. शेवटी डॉक्टर यशस्वी झाले ! शेटजींनीही सुटकेचा उसासा टाकला होता. त्यांच्या धंद्यातही अडथळा आला नव्हता नि उर्मिलाही बरी झाली होती. म्हणूनच शेटजी डॉक्टरांबद्दल अत्यंत कृतज्ञतेची भावना बाळगून असत.

वयाच्या पंधराव्या वर्षी उर्मिला रोगमुक्त झाली. पण मधल्या काळात तिचं शिक्षण संपूर्णपणे बंद पडलं होतं. त्यानंतर शेटजींनी वर्षभर तिच्यासाठी घरीच मास्तर ठेवून तिला चांगलं लिहिता वाचता येईल अशी व्यवस्था केली होती.

उर्मिलेचं सोळावं संपलं तसं शेटजींनी तिच्या लग्नाची घाई सुरू केली. शेटजींचा नाव-लौकिक मोठा, तसंच ऐश्वर्यही मोठं ! त्यांच्या नावावर उर्मिलेला पहायला म्हणून लोक येऊ लागले. पण मुलगी पाहून झाल्यावर शेटजी स्वतःच मुलीच्या रोगाबद्दल कल्पना देत. वास्तविक उर्मिला आता संपूर्णतया रोगमुक्त होती. तरी ती सतत आठ वर्षे क्षयानं ग्रासली होती हे जेव्हा मुलाकडील मंडळी ऐकत तेव्हा त्यांच्या मनातली चलबिचल स्पष्ट दिसे. नंतर काय ते कळवू असं म्हणून मंडळी जात ती पुन्हा काही न कळविण्यासाठीच. काही ठिकाणी स्वतः शेटजी आपल्या मुनीमजींना पाठवीत. येतो येतो म्हणून लोक सांगत पण कुणी येत नसे. शेटजी जैन धर्माचे होते. सुरुवातीला ते जैनच स्थळे पहात. पण जसं जसं अपयश पदरात पडत चाललं तसतसे ते इतर जातीतली स्थळंही पाहू लागले. पण जिथं तिथं उर्मिलेची पास्ट हिस्टरी आड येई. हल्ली हल्ली शेटजी तर बिजवरांचीही चौकशी करायला लागले होते.

उर्मिलेचं वाचन चालूच होतं. खांडेकरांनी चितारलेलं भावनाविवश प्रेम, फडक्यांनी रंगवलेलं उत्कट प्रेम, काकोडकरांचं आक्रमक प्रेम, यातला कोणता तरी प्रेमाचा प्रकार आता आपल्या वाटेला यावा असं तिच्या तारुण्य सुलभ मनाला वाटत होतं. दरवेळेला कुणीतरी पहायला येणार या वार्तेनं ती आशेनं सजून बसायची, पण परिकथेतला राजकुमार कधी कधी सांगून यायचाच नाही तर कधी कधी येऊन गेला की पुन्हा परतायचाच नाही. आशा-निराशेचा हा लपंडाव गेली सतत सहा वर्षे चालला होता. पण दरवेळी विजयी होत होती घोर निराशा ! भावनेच्या या कोंडमाऱ्यानं उर्मिला आता खंगत चालली होती. गेले सहा महिने तिला डोकेदुखीचा विकार जडला होता. अधूनमधून किरकोळ आजारही व्हायला लागले. इतके दिवस थांबलेले डॉ. कवठेकरांचे उपचार परत सुरू झाले. एकदा असेच डॉक्टर शेटजींकडे गेले असता शेटजींनी त्यांना विचारलं,

"डॉक्टर, उर्मिलेची तब्येत पुन्हा बिघडलेली दिसतेय, पुन्हा तसला काही रोग..."

" नाही, त्याची काळजी करू नका. आता ती चांगलीच निरोगी आहे. "

" पण डॉक्टर तिची तब्येत अतिशय खालावत चालली आहे. काही सुधारणा नाही का होणार ?"

डॉक्टरांनी विषय टाळायचा प्रयत्न केला. पण शेटजींनी दोन-तीन वेळा तोच प्रश्न केला तेव्हा ते दबलेल्या आवाजात म्हणाले,

" शेटजी, आता उर्मिलेचं लग्न व्हायला हवं. "

डॉक्टरांच्या उत्तरानं शेटजी दुखावल्यासारखे दिसले.

' डॉक्टऽर ', शेटजींच्या स्वरात थकवा होता. ' आम्ही काय थोडं प्रयत्न करून राहिलोय ? पण पोरीच्या या रोगाचा गवगवा सगळीकडे झालेला. कुणी कबूलच होत नाही. गल्याच आठवडयात मुनीमजींनी एक विजवराचं स्थळ आणलं होतं. मुलगी पसंत पडल्यावर मुनिमजींनी त्याला गतकाळातील खरी हकीगत सांगितली. तसं तो म्हणाला,

" माझी पहिली बायको असून मी दुसरं लग्न करतोय तिच्या संमतीनं कारण आम्हाला संतती नाही. पण आम्हाला संतति हवी ती निकोप...तेव्हा...' शेटजी पुढचं बोललेच नाहीत. डॉक्टर काय समजायचं ते समजले.

लोकांना दोष देता येत नव्हता. त्यांना वाटायचं उगाच विषाची परीक्षा कशाला ?

उर्मिला कवठेकरांकडे कधी कधी दवाखान्यात जात असे तर तर केव्हा केव्हा डॉक्टर शेठजींच्या घरी जात असत. पण आताशा जास्त करून उर्मिला दवाखान्यातच येत असे. डॉक्टरांच्या लक्षात एक आलं होतं, की पूर्वी तिला आपण तपासत असू त्यावेळेस तिच्या चेहऱ्यावर निरागस भाव असत नि ओठांवर बडबड ! पण आताशा तिला तपासण्यासाठी आत बोलावल्यावर ती अबोल होई. एक्झामिनेशन टेबलावर झोपल्यावर ती तशी दिसे. पण डॉक्टर तपासण्यात दंग असताना ती त्यांना न्याहाळीत असे. तपासणी संपली तरी ती तशीच पडून राही.

-- डॉक्टरांच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नव्हती. त्यांच्या नजरेनं तिच्या डोळ्यांतले भाव अचूक वाचले होते.

दिवसांमागून दिवस जात होते नि उर्मिला जास्तच खंगत चालली होती. आता तिला फक्त ओढ लागायची डॉक्टरांच्या दवाखान्याची ! डॉक्टरांच्या तपासणीची !! त्यावेळेस तिच्या सर्वांगावरून फिरणाऱ्या डॉक्टराच्या हस्तस्पर्शाची !!!

ही तपासणी अशी रोजच व्हावी असं तिला वाटू लागलं.

डॉक्टरही अस्वस्थ झाले होते. नाही म्हटलं, तरी ते आता चाळीशीला आले होते. त्यांच्या सुदृढ प्रकृतीवरून तसं कुणाला वाटलं नसतं. पण ते खरं होतं ! त्यात त्यांना सुविद्य पत्नीही होती. त्यांच्यावर जिवापाड प्रेम करणारी !

डॉक्टरांच्या मनात नीती अनीतीच्या कल्पनांनी गोंधळ माजवून टाकला. तत्त्व की अस्तित्व असा संघर्ष त्यांना हिंदोळ्यासारखा खालीवर फेकीत होता.

म्हणूनच त्या दिवशी ते जरा विरंगुळा मिळावा म्हणून रात्री कीर्तनाला गेले होते. पण परत आले ते अधिकच अस्वस्थ होऊन...कारण नेमका त्याच दिवशी कीर्तनाचा विषय होता 'नियोग'! डॉक्टर थोडेसे उशीराच किर्तनाला आले होते. त्याच वेळी कीर्तनकार सांगत होते,

'...तेव्हा राजमातेने भीष्माला विनंती केली, तुझ्या दोघी वहिनींना तू पुत्र-प्राप्ती करून दे. भीष्म आपली ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा मोडू इच्छित नव्हता. मातेची विनंती नम्रतेने नाकारून तो म्हणाला 'दिरापासून झालेली पुत्रसंतती जरी शास्त्र-संमत असली तरी माते, तुझी विनंती मी स्वीकारू शकत नाही! त्याऐवजी पराशरपुत्र व्यासांना जर तू बोलावशील तर? कारण माते! व्याससुद्धा अंबिकेचा व अंबालिकेचा दीरच आहे. तो त्यांना नियोग पद्धतीने पुत्रप्राप्ती करून देईल! तेव्हा राजमातेने व्यासांना विनंती केली. व्यासांनी विनंतीचा स्वीकार केला. अशा रितीने अंबिकेला पंडु व अंबालिकेला धृतराष्ट्र व विदूर हे पुत्र प्राप्त झाले.

हे झाले पुत्रप्राप्तीच्या संदर्भात! पण सुखप्राप्ती बद्दलही हिंदुधर्मानं उदारताच दाखवलेली आहे. एखाद्या स्त्रीला शारिरीक सुखाची भूक असेल व तसे तिने पुरुषाजवळ सूचित केलं असेल तर पुरुषानं तिची तृप्तता करणं हे धर्माला मान्य आहे...

कीर्तनाहून परतताना डॉक्टर स्वतःशीच प्रश्न विचारीत होते. म्हणजे मी...मी हे करायला हवं? यात वावगं काही नाही? हे...हे शिष्टसंमत आहे?

उर्मिलेला ते बैस म्हणाले होते आणि त्यांच्या येरझाऱ्या चालू असतानाच हे विचार त्यांच्या मनात येत होते.

'डॉक्टर, तपासायचं नं मला?' उर्मिलेनं आतुरतेनं विचारलं 'हो...हो. चल आज व्यवस्थित तपासायचंय तुला.' डॉक्टरांच्या शब्दात आता निश्चय येत चालला होता. एक्झामिनेशन टेबलावर उर्मिला आडवी झाली.

निश्चय करून डॉक्टरांनी तिच्याकडे जायला पाऊल उचललं. पण क्षणभर ते तिथेच घोटाळले. तितक्यात कीर्तनकारांचे शब्द त्यांच्या कानी घुमू लागले, 'एखाद्या स्त्रीला शारीरिक सुखाची भूक असेल तर परपुरुषानं तिची तृप्तता करणं हे धर्माला मान्य आहे,...धर्माला हे मान्य आहे...धर्माला हे मान्य आहे..

डॉक्टरांचं अडखळलेलं पाऊल पुढे पडलं. ते उर्मिलेजवळ गेले...आणखी जवळ गेले...खूप खूप जवळ गेले... डॉक्टरांना नि उर्मिलेला स्वतंत्र अस्तित्वच उरलं नव्हतं...

थोड्याशा अवकाशानंतर डॉक्टरांनी उर्मिलेकडे पाहिलं तिच्या डोळ्यांत काठोकाठ कृतज्ञता भरली होती!

□ □ □

# मुक्काम : पुणे
# हॉटेल सतलज

# विषय : मराठी मासिकांची सजावट

**यशवंत जोशी**

महाराष्ट्र मुद्रण परिषद या मुद्रकांच्या मध्यवर्ती संघटनेचे नूतन अध्यक्ष व मुंबईच्या रॅशनल आर्ट अॅण्ड प्रेस प्रा. लि. या ख्यातनाम मुद्रणालयाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जयंतराव देवकुळे यांनी परिषदेच्या कार्यास उत्साहाने सुरुवात केली आहे. त्यातला पहिला बहारदार कार्यक्रम पुणे येथे रविवार दि. २ एप्रिल १९७२ रोजी सतलज हॉटेलच्या हिरवळीवर आयोजित करण्यात आला होता.

श्री. जयंतराव देवकुळे यांनी परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात अनेक विवाद्य मुद्यांना चर्चात्मक तोंड फोडले आहे. त्यांपैकी एक विषय म्हणजे ' मराठी मासिकांची पृष्ठजुळणी आणि सजावट ' याबद्दल होता. अध्यक्षीय भाषणात या बाबतीतील रचनातंत्रावर त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या विषयावर मुद्रक, चित्रकार व संपादक यांची मते कळावीत म्हणून या चर्चात्मक कार्यक्रमास त्यांनी पुण्यातील तीस-चाळीस संबंधितांना आमंत्रणे दिली होती.

चर्चेला सुरुवात करण्यासाठी श्री. देवकुळे यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले, की ' छापलेले अधिक सुंदर दिसावे ही माझ्या मनाला एक कायमची ओढ आहे आणि याच दृष्टीने मराठी मासिकाच्या पृष्ठजुळणीबाबत मी माझ्या अध्यक्षीय भाषणात काही स्पष्ट विचार मांडलेले आहेत. मराठी मासिकांच्या जुळणीबाबत, पृष्ठरचनेबाबत काही मूलभूत कल्पना ठरवाव्यात; आकर्षकता, चित्ररेखांकन, वाचनसौकर्य याबाबत काही प्रमाणभूतता असावी असा विचार माझ्या मनात येतो. असे संकेत ठरवूनही काही नाविन्य, रचनेतील आगळेपण आणता येईल काय याही बाबत मी विचार करीत रहातो. आपल्या मराठी मासिकांमध्ये पृष्ठजुळणी किंवा

मजकुराची आकर्षक रचना या गोष्टीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. व्यावसायिक चित्रकलेचे विद्यार्थी मुद्रण-प्रकाशन क्षेत्रात थोडेसे वावरू लागल्याने बदल होत आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही, परंतु तरीही माझी नाराजी आहे. अनुक्रमणिकेत पृष्ठांक नसतात, पांढऱ्या जागा फार सोडल्या जातात, वाचनसुकरतेकडे लक्ष दिले जात नाही. नाविन्याची हौस असावी व जुने ते टाकलेच पाहिजे असा आग्रह नसावा. याबाबत आपणा सर्व विचारवंतांनी काही प्रमाणभूत नियम ठरवावेत काय याबद्दलची आपली मते मनमोकळेपणाने सांगावीत.'

एवढे सांगून त्यांनी काही मासिकांतील पृष्ठरचनांचे नमूने दाखविले व त्याबद्दल सटीक चर्चा केली. मासिकाची चित्रे कित्येक वेळा अर्थशून्य व कलाहीन असतात असाही त्यांनी आरोप केला.

## अन्यायकारक विधाने

प्रकाशन व्यवसायात नाविन्याचा व कलात्मक मांडणीचा पुरस्कार करणारे ख्यातनाम रचनातज्ज्ञ श्री. देवीदास बागूल यांनी श्री. देवकुळे यांच्या प्रतिपादनावर कडाडून विरोध व्यक्त केला. ते म्हणाले, 'श्री. देवकुळे यांच्या अध्यक्षीय भाषणात जी विधाने आहेत, ती मासिकांच्या संपादकांबाबत अनुदार आणि अन्यायकारक अशी मला वाटतात. अनुदार अशा दृष्टीने, की त्यांनी चांगल्याला चांगले न म्हणता जे त्यांना वाईट दिसले त्याला त्यांनी झोडपले आहे. वाईट तेवढे धुंडून त्यावर टीका न करता चांगल्याचे रसग्रहण त्यांनी करावयास हवे होते. श्री. देवकुळे यांची विधाने अन्यायकारक आहेत असे मी म्हणतो, याचे कारण निराळे आहे. काही वाईट रचना पाहून सर्वच मराठी मासिकांच्या पृष्ठरचना वाईट असतात असे म्हणणे न्यायाचे होणार नाही. काकोडकर भरपूर लिहितात, पण दुर्गाबाई भागवत कमी लिहितात. फक्त काकोडकरांचे वाङ्मय वाचून जर मराठी साहित्याबाबत कोणी मत व्यक्त करू लागला तर ते चुकीचे होईल. याच न्यायने चांगल्या पृष्ठरचनांचे रसग्रहण न करता फक्त वाइटांवर टीका करणे हे मासिकसृष्टीवर अन्यायाचे होईल.

'श्री. देवकुळे यांच्या भाषणात इतरही अनेक गैरसमज पसरविणारी विधाने आहेत. त्यावरही विचार व्हावयास हवा. कोरी जागा जी सोडली जाते त्यावर त्यांचा मोठा आक्षेप आहे. सजावटकार जी रचना करतो ती काही एका विशिष्ट लयतत्त्वाने करीत असतो. कोऱ्या जागेचे महत्त्व हव्या त्या मजकुराकडे लक्ष वेधण्यासाठीच असते. पूर्वी माणसे जास्त वाचत नसत, पण जास्त पाहता असत. आजचा माणूस सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत बरेचसे वाचीत असते. त्याच्या डोळ्या विश्रांती देणे हाही कोऱ्या जागेचा एक फायदा असतो. सजावटीत काही प्रयोग असतात, त्यातले काही फसतही असतील. पण प्रत्येकाला प्रयोगाचे स्वातंत्र्य हवे. संपादकास कशी पृष्ठरचना हवी ते ठरवू द्यावे. त्यासाठी नियम, संकेत, प्रमाण-

भूतता नसावी.'

यानंतर आनंद मुद्रणालयाचे व्यवस्थापक व पुणे मुद्रण विद्यालयाचे एक अध्यापक श्री. यशवंत जोशी यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, आजची मराठीतील सामान्य जनांसाठी निघणारी मासिके पृष्ठसजावटीच्या दृष्टीने अतिशय प्रयोगशील आहेत असे माझे मत झाले आहे. विशेषतः दुपानी पृष्ठरचनेमधील (डबलस्प्रेड) विविध कला नाना तऱ्हेची मासिके दाखवीत आहेत. जयंतरावांच्यामते मराठी मासिके सजावटीच्या दृष्टीने टाकाऊ आहेत, पण मला तसे वाटत नाही. परंतु या सर्व पृष्ठरचनांच्या प्रयोगापाठीमागे विशिष्ट अभ्यास असेल असे मात्र मला वाटत नाही. सर्वच संपादकांना ही दृष्टी असेल असे आपणास म्हणता येणार नाही. कलेच्या मूलतत्त्वांची जाणकारी असल्यामुळे वैशिष्टचपूर्ण सजावट केली जाते असे नसून ती बव्हंशी अनुकरणाने होत असते असे मला वाटते. संपादकांना पृष्ठसजावटी शिकविणाऱ्या शाळा नाहीत, तशी विद्यालये हवीत असे मला वाटते. फिल्म इन्स्टिटयूटचे उदाहरण घ्या. तिथे अभिनयाचे शिक्षण घेतलेले काही कलावंत आज प्रसिद्धीच्या झोतात आलेले आपण पहातो. अंगी असलेल्या कलागुणांचा विस्तार हा एकच हेतू शिक्षणसंस्थांना नसून चाचपडणाऱ्यांना मार्गदर्शन हाच प्रधान हेतू अशा शिक्षणसंस्थांचा असू शकतो.

## आत्मनिष्ठ मुद्रणसौंदर्य

'पृष्ठरचनेच्या कलापूर्ण सजावटीमध्ये काही प्रमाणभूतता असावी असे श्री. जयंतरावांचे मत आहे. मला तसे वाटत नाही. कारण मुद्रणसौंदर्य हे बव्हंशी आत्मनिष्ठ असते, ते वस्तुनिष्ठ नसते. त्यामुळे एकाला जी रचना सुंदर वाटेल ती दुसऱ्याला वाटणार नाही. आधुनिक कलेच्या सौंदर्यामध्ये विवाद्यता या आत्मनिष्ठतेमुळेच येत असते. हे जरी खरे असले, तरी प्रमाणभूततेमधील एक दोष नाविन्याचा पुरस्कार करणारे सजावटकारही टाळू शकलेले नाहीत. त्यांच्याही पृष्ठरचना किंवा कलात्मक सजावटी कुठेही ओळखू येतात इतकी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप त्यावर असते. त्यांच्याही रचनेत तोचतोचपणा येऊ लागला आहे. त्यांच्या कलात्मकतेला सीमा असतात आणि या सीमा आत्मनिष्ठतेमुळे ठरतात. हा दोष अर्थात त्यांचा नाही, तर मुद्रणसौंदर्य हेच आत्मनिष्ठ आहे यामुळे हे घडत असते.

'वाचनसुकरता मराठी मासिकात नाही असे श्री. जयंतरावांना वाटते. पण तसे मला वाटत नाही. एखादा मनुष्य दुसऱ्यास पत्ता समजावून देतो तेव्हा तो त्यास समजू नये म्हणून सांगत नसतो. त्याच्या सांगण्यातील त्रुटीमुळे कदाचित ऐकणाऱ्याला तो दुर्बोध वाटेल. तसेच मराठी मासिकांचे आहे. त्यांच्या नाविन्याच्या प्रयोगात कोठे वाचनसुकरतेला प्रत्यवाय आला, तर ते आपण समजून घेतले पाहिजे. या प्रयोगशीलतेकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे. कारण दोन रुपये टाकून मासिक घेणाऱ्या ग्राहकाला ते आकर्षक वाटावे असाच त्या संपादकाचा प्रयत्न असतो.'

यानंतर किर्लोस्कर प्रेसचे प्रॉडक्शन सुपरिंटेंडेंट श्री. चिं. ग. वझे म्हणाले, ' प्रमाणभूतता किंवा संकेत नसावेत असे मला वाटते. कारण प्रत्येक मासिक आपली प्रतिमा–इमेज–निर्माण करायचा प्रयत्न करीत असते. आपली प्रतिमा विचित्र पद्धतीने निर्माण व्हावी असे संपादकास वाटले, तर त्यास प्रमाणभूततेची बंधने नसावीत. नवे ले-औट्स टाकाऊ असतात असे आपण म्हणू नये. पण वाचनसौकर्य आणि नवी सजावट यांचा मिलाफ झाला तर ते अधिक चांगले होईल. प्रत्येक संपादकाने आपल्या पृष्ठरचनेची डमी प्रत तयार करून द्यावी असे सुचवावेसे वाटते.'

यावर चित्रकार श्री. टण्णू यांनी चित्रकारांची अडचण मांडली. चित्रांचा व लेखांचा एकमेकांशी संबंध दिसत नाही या रा. देवकुळयांच्या विधानाचा परामर्श त्यांनी घेतला. त्यांच्या मतें एका लेखासाठी बनविलेले चित्र संपादक आपल्या सोयीसाठी दुसऱ्या लेखासाठी वापरतो. श्री. बेहेरे यांनी लेख वेळेवर हाती येत नसल्याने ही आपत्ती येते असे सांगितले.

मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष श्री. काणे हे आपल्या भाषणात म्हणाले, ' आतापर्यंत चर्चेवरून मासिकांच्या संपादकांना पृष्ठसजावटीत काही कळत नाही असा सर्वांचा समज आहे की काय असे मला वाटू लागले आहे. मी या विचाराशी सहमत नाही. सजावटीबाबत मासिकांचे संपादक जागरूक असतात, त्यासाठी संकेतांची काही गरज नाही. महाराष्ट्र मुद्रण परिषद या विषयाचा विचार करीत आहे हे स्तुत्य आहे, पण माझ्या मते मुद्रणालयातील अपुऱ्या साधनसामग्रीचा विचार त्यांनी अधिक कसोशीने करावा. मुद्रक आपली ही जबाबदारी ओळखत नाही. त्यामुळे संपादकाने उत्तम पृष्ठरचना दिली तरी ती वाया जाते. परिषदेने याबाबत अवश्य मार्गदर्शन करावे. '

किर्लोस्कर मासिकांचे सहसंपादक श्री. सराफ म्हणाले, ' या विषयाचा विचार करताना आपण मराठी मासिकांच्या संपादकांच्या पूर्वपीठिकेचा विचार करणे अगत्याचे आहे. आजचा संपादक हा गेली १०।२० वर्षे हे काम करीत असतो. त्याच्या सजावटीच्या कल्पना जुन्या असतात. त्याची आर्थिक परिस्थितीही भर-भक्कम नसते. परंपरेला तो चिकटून असतो. गेल्या ५ वर्षांत ले आउटसंबंधीच्या कल्पना–कन्सेप्टस–पार बदलून गेल्या आहेत, त्याची त्याला जाणीव असतेच असे नाही.

' जे प्रकाशक मासिके चालवितात ते खातेवार प्रमुख नेमून कामे करतात. त्यांच्या हाताशी चार-पाच चित्रकार असतात. प्रत्येकाची कलेबाबतची धारणा भिन्न असते, त्यामुळे प्रत्येक लेखाचा लेआउट निराळा होतो. मराठी मासिकांच्या बाबत असे म्हणता येईल, की एका मासिकामागे एकच अवधानी मन, एकच मास्टर माइंड काम करीत नाही. त्यामुळे सर्व बाबतीत सुसंवाद आढळून येत नाही. त्याच प्रमाणे आणखी एक गोष्ट अशी, की रचनाशास्त्राचे व्याकरण अजून तयार झालेले

नाही. चांगले किंवा वाईट याची फूटपट्टी अजून बनविण्यात आलेली नाहीं. तोपर्यंत पृष्ठजुळणीवावत निश्चितपणे आपण काही सांगू शकत नाही.

'प्रत्येक मासिकाचा एक विशिष्ट तोंडावळा असतो, त्याची एक विशिष्ट प्रतिमा जनमानसात उमटलेली असते. हा विचार लक्षात घेऊन मला असे सुचवावेसे वाटते, की मासिकातील भडक लिखाण, सोज्वळ लेखन किंवा मध्यममार्गी प्रवृत्तीचे लेखन हे लक्षात घेऊन कोणत्या प्रकारचे टाइप वापरावेत, 'टायपोग्राफिकल ट्रीटमेंट' कशी सजावटीस दिली जावी याबाबतचे संकेत परिषदेने अवश्य ठरवावेत. पृष्ठरचना आणि सजावट याबाबत आपण सर्वचजण प्रयोगशील आहोत, चाचपडत आहोत हे ध्यानी घेतले पाहिजे.'

मराठी मासिकांच्या सजावटीमध्ये एक प्रकारचे अराजक आहे असे सांगून कल्पना मुद्रणालयाचे मालक श्री. चि. स. लाटकर म्हणाले, 'प्रमाणभूलता असावी की नसावी हा माझ्यापुढे संभ्रम आहे. सजावटीबावत मुद्रकानेही आपली जबाबदारी अंगाबाहेर टाकता कामा नये असे मला वाटते. या संपूर्ण विषयाचा जाणकारांनी अभ्यास करून प्रयोगशीलतेस वाद दिला पाहिजे.'

मंदार प्रिण्टर्सचे प्रतिनिधी श्री. माधवराव पटवर्धन म्हणाले, 'निरनिराळ्या प्रवृत्तींची जशी माणसे असतात, तशी मासिकेही असतात. प्रत्येक कलेची धाव आनंदाकडे असते, पण सगळा घोटाळा होतो तो अनुकरणामध्ये होतो. मराठी मासिके आज अथपासून इतीपर्यंत मोनो पायका वापरतात. यात जी मोनॉटनी येते त्यात वदल करण्याचाही काहीतरी विचार व्हावयास हवा. पूर्वी नाटकमंडळयांचा जसा एक अव्वल संच असे, तसा आज मराठी मासिकसृष्टीच्या पाठीमागे उभा नाही हीच एक मोठी चिंतनीय बाब आहे.'

यानंतर श्री. जयंतरावांनी सर्व उपस्थितांनी या विषयावर मनमोकळेपणाने चर्चा केली यावद्दल आनंद व्यक्त केला. परिषदेचे नवे सरचिटणीस श्री. वि. वि. पटवर्धन यांनी उपस्थिताचे आभार मानले व चहापानानंतर हा कार्यक्रम संपला.


समारोपादाखल बोलताना श्री. देवकुळे यांनी आश्वासन दिले, की यापुढे सजावटीवद्दल अधिक तपशीलवार चर्चा आयोजित केल्या जातील. पुस्तक सजावटी-बद्दलही स्वतंत्र चर्चा ठेवण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांची ही योजना सर्वच उपस्थित संपादक, मुद्रक-प्रकाशक यांना विधायक वाटली.

परिषदेचे सरचिटणीस श्री. वि. वि. पटवर्धन यांनी उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. चहापानानंतर हा खेळीमेळीच्या चर्चेचा कार्यक्रम संपला.

□ □ □

# प्राक्तन

## "60,00,000 ACCUSERS"



जेरुसलेमच्या डिस्ट्रिक्ट कोर्टात
ज्यू-संहारक ॲडॉल्फ आइशमनवर
झालेल्या जगप्रसिद्ध खटल्यात
इस्रायलचे ॲटर्नी जनरल
गिडाँ हाजनेर यांनी केलेल्या
हिब्रूतील प्रदीर्घ भाषणाचा
इंग्रजी अनुवाद
अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे.
60,00,000 ACCUSERS
हे त्या पुस्तकाचे नाव
त्या पुस्तकाचा हा धावता परिचय....

इंग्रजी अनुवाद : रॉझेनी
इस्रायलचे राजदूत

परिचय : चित्तरंजन घोटीकर

वाघ-सिंह, लांडगे-कोल्हे, गिधाडं नि जहरी नाग-सर्प या हिंस्र प्राण्यांना 'आईशमन' म्हणून संबोधलं तर त्यांनीही शरमेनं मान खाली घालावी! बस्स, या एकाच वाक्यात दुसऱ्या युद्धकाळात साठ लाख निष्पाप ज्यूंची, ते केवळ ज्यू आहेत म्हणूनच अमानुष कत्तल घडवून आणलेल्या अॅडॉल्फ कार्ल आइशमन या नराधमाचं वर्णन करता येईल. अधिक वर्णनाची आवश्यकता नाही. जगातील मानववंशातील ज्यू या अत्यल्प पण अत्यंत बुद्धिवादी मानव-समूहाचं शिरकाण करायचं या कठोर निर्धारानेच अॅडॉल्फ आईशमननं साठ लक्ष ज्यूंची निर्घृण हत्या घडवून आणली. ही जणू एक परमेश्वरी आज्ञाच किंवा आपलीच मक्तेदारी आहे, या सदैव जागृत जाणीवेनंच त्याने ज्यू-रक्ताचे पाट वाहविले. हे पाट शोषून घेताना, साठ लाख ज्यूंची प्रेते आपल्या पोटात घेताना युरोपमधील सश्यश्यामला पुण्यभूमीही थरारून शहारली असेल; गलबलली असेल; कळवळली असेल; अक्रोशानं टाहो फोडून विव्हळली असेल. तिनं हिटलर, गोबेल्स, रिबेंट्रॉप, गोअरिंग. हिमलर, हेड्रिच् आदि जर्मनांना तळतळून शाप दिला असेल, 'तुमच्या पापांचा घडा भरलाय...त्यांचा तुम्हाला एक दिवस जाब द्यावाच लागेल...' या नालायक नेत्यांना तो द्यावा लागलाही. पण जर्मनीत युद्धोत्तर झालेल्या सैरावैरा पळापळीत जर्मनीतून सटकलेल्या आईशमनचं काय? त्यालाही आपल्या पाशवी कृत्यांचा जाब द्यावा लागलाच. जेरुसलेममधील डिस्ट्रिक्ट कोर्टातील मोशे लँडॉ, बेंजामिन हॅलवे नि थिट्झॅक् रॅन्हे या नाणावलेल्या तीन ज्यू—न्यायमूर्तींनी एकमतानं फाशीची शिक्षा सुनावलेला, हिटलरचा उजवा हात होता तरी कोण? याची कुंडली, जन्मग्रह होते तरी कसे? कुठल्या कुमुहूर्तावर हा जन्माला आला? याचा स्वभाव, प्रकृती नि प्रवृत्ती कशी होती? कोणत्या अमानुष भावनांची सरमिसळ याच्यात झाली होती? या अपवादात्मक मानवाची ओळख नि त्याचा दारुण अंत जाणून घेणं अत्यावश्यक ठरेल. मन, भावना, सदसद्विवेकबुद्धीची देणगी मिळालेला माणूस इतका दुष्ट, निर्दय निपजू शकतो? 'होय', असं उत्तर इतिहासानं दिलं आहेच. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या त्रिकालबाधित सत्य-नियमानुसार आईशमनदेखील एक 'खास नमुना' होता. फक्त या 'नमुन्याला' नरकाच्या दारातही पश्चात्तापाचा लवलेश झाला नव्हता. आइशमननं आपल्या हातांनी ज्यूंचा रक्तरंजित इतिहास घडवून आणण्याचं श्रेय (?) मिळवलं आणि इस्रायलसारख्या तडफदार, कर्तृत्वशाली नि जिवंत राष्ट्राचा ससेमिरा आपल्या पाठीमागे लावून घेतला. चार हजार वर्षांच्या वणवण भ्रमंतीनंतर १४ मे १९४८ रोजी 'पुनरुज्जीवित' झालेल्या या स्वाभिमानी, तेजस्वी नि जगाला काही चागलं देऊं शकणाऱ्या राष्ट्राला आइशमनला यमसदनाला पाठविल्याशिवाय स्वस्थ कसं बसवलं असतं? नाहीतर आपल्या साठ लक्ष ज्यू—बांधवांचं निर्घृण हत्याकांड घडवून आणलेल्या या जागृत राष्ट्राच्या अस्मितेला नि भ्रातृभावनेला काय किंमत होती?

शिवाय साठ लाख निष्पाप मानवांच्या खुन्याला शिक्षा व्हायला नको होती का ?

## जन्म....शिक्षण....

१९ मार्च १९०६ रोजी जर्मनीतल्या सॉलिजेन शहरात या ज्यू-भक्षक आईशमनचा जन्म झाला. लहानपणीच तो आपल्या आई-बापावरोबर ऑस्ट्रियातील लिझ शहरी आला. प्राथमिक नि माध्यमिक शिक्षणानंतर एका तांत्रिक विषयांच्या कॉलेजमध्ये त्याचं शिक्षण झालं. १९२७ मध्ये तो जर्मन-ऑस्ट्रियन फ्रंट-फायटर्स-मध्ये सामील झाला. १९३२ मध्ये तो जर्मनीच्या नाझी पक्षाचा नि हिटलरच्या एस. एस. संघटनेचा स्वेच्छेनेच सभासद झाला. हिटलर या आपल्या धन्याप्रमाणेच तो ऑस्ट्रिया सोडून बर्लिनमधल्या राईशमध्ये स्थायिक झाला. केवळ ऑस्ट्रियन सैन्यात नोकरी करायचं टाळण्याकरता हिटलर ऑस्ट्रियातून सटकला होता. आइशमनला मात्र पहिल्या युद्धानंतर जर्मनीत उदयास येत चाललेल्या नॅशनल सोशालिस्ट पक्षाच्या सत्तेचं सुप्त आकर्षण होतं. १९३३ मध्ये आइशमननं लॅशफील्ड येथील एस. एस. संघटनेत सैनिकी शिक्षण घेतलं. १९३४ मध्ये तो कॉर्पोरल झाला. डॉश्यू येथील कॉन्सन्ट्रेशन कॅम्पमध्ये एक रानटी प्रकृतीची सत्तापिपासू व्यक्ती होती. थिओडर आयके ! या थिओडरनं प्रथमपासून एक तत्त्व ठरवून टाकलं होतं. 'सहनशीलता म्हणजे कमकुवतपणा, याची सदैव जाणीव बाळगून प्रत्येकानं राष्ट्रहिताच्या दृष्टीनं निर्घृणपणे, दयाशून्य वृत्तीनंच वागलं पाहिजे. राजकीय विरोधकांना नि संतप्त बंडखोरांना ठणकावून सांगितलं पाहिजे, 'सावधान ! तुमचा गळा घोटून आवाज बंद केला जाईल. याद राखा !' जर्मनीची १९४५ च्या मेमधे राखरांगोळी होईपर्यंत हेच तत्त्व एक ध्येयसूत्र म्हणून जर्मनीनं कटाक्षानं पाळलेलं दिसतं. डॉश्यू कॉन्सन्ट्रेशन कॅम्प म्हणजे हिंसा–हत्याकांडाचं शिक्षण देणारं एक विद्यालय होतं. प्रत्येक नाझी पुढाऱ्याला या शिक्षणाच्या माध्यमातून जावंच लागे. याच ठिकाणी नाझींना द्वेषाचं जहरी तत्त्वज्ञान नि कैद्यांना कंठस्नान घालण्याचं शिक्षण दिलं गेलं. येथील अनुभवाने तयार झालेला आइशमन १९३४ च्या सप्टेंबरमध्ये एस. डी. संघटनेत सार्जंट झाला. १९३५ मध्ये त्याचा या संघटनेच्या ज्यू–विभागात प्रवेश झाला. एस. डी. संघटना नि गेस्टापो (स्टेट सिक्रेट पोलीस) यांचं घनिष्ट एकीकरण नि परस्पर सहकार्य होतं. एस. डी. संघटनेत पुढे त्याचे विश्वासू सहकारी बनलेले अनेकजण त्याला भेटले. एस. डी.त चढत चढत १९३७ मध्ये त्याला कमिशन मिळालं. याच सुमारास त्याचा नि ज्युलियस स्ट्रेचरचा (मानवतेचा शत्रू म्हणून ज्याला न्यूरेनबर्गच्या इंटर नॅशनल मिलिटरी ट्रायब्यूनलनं गुन्हेगार ठरवलं होतं) दाट स्नेह जमला. स्ट्रेचरनं त्याच्याशी घनिष्ट दोस्ती जमवली नि १९३७ मध्ये न्यूरेनबर्गला भरलेल्या नॅशनल–सोशॉलिस्ट पार्टी कॉंग्रेसच्या अधिवेशनात त्याला आणलं. नाझीच्या हितचिंतकांचा नि ज्यू-विरोधी आंदोलकांचा त्याच्याशी संबंध इथून पुढे वाढत गेला.

मार्च १९३८ मध्ये ऑस्ट्रियाचा पाडाव झाल्यावर आइशमनला ऑस्ट्रियात पाठविण्यात आलं. एव्हापासून ज्यू प्रश्नांवर अधिकार वाणीनं बोलणारी एक अनुभवसिद्ध व्यक्ती म्हणून आइशमनचा बोलबाला झाला. व्हिएन्नाला स्वतंत्र प्रज्ञेनं काम करण्याचं आणखी शिक्षण घेऊन ज्यूविरोधी एक कुशल संघटक म्हणून तो कार्य करू लागला. यावेळी ज्यूंनी जर्मनीतून निघून जावं अशी नाझींची ज्यूंवर जुलुम-जबरदस्ती होऊ लागली होती. ही संधी साधून आइशमननं याचं वर्धिष्णु ध्येय-धोरणाचा निकरानं पाठपुरावा केला. त्याच्या या 'खास कार्याची' राईश-मधील मंत्र्यांनी 'ज्यूंचा निःपात करणारी एक आदर्श व्यक्ती म्हणून कुतुहलानं गौरवपूर्ण दखल घेतली. व्हिएन्नात या कार्यक्रमाला लोकशाही उदात्ततेचा बेगडी मुलामा चढविण्यात आला. ज्यूंना सांगण्यात येऊ लागलं, 'तुम्ही ऑस्ट्रियाचे सन्माननीय नागरिक आहात...तुम्हाला समाजात दर्जा, प्रतिष्ठा आहे.. तुम्हाला नोकऱ्या दिल्या जातील...घर-दार करू दिलं जाईल...प्रॉपर्टीही करू दिली जाईल...' या आश्वासनावर भुललेल्या ज्यूंना, ज्यू-निःपाताच्या रणगाड्याखाली भरडलं गेल्यावर अखेरीस भ्रमनिरास होऊन कळून येई, की आपलं सर्वस्व गेलं आहे किंवा जाण्याच्या मार्गावर आहे. नोकऱ्या नाहीत; मुलांना शाळात बंदी; 'Jude' असा शिक्का मारलेला प्रवासाचा दाखला आपल्यास देण्यात आला आहे नि त्यानुसार एका विशिष्ट तारखेनंतर आपणावर ऑस्ट्रिया सोडून जाण्याची सक्ती करण्यात आली आहे; पुन्हा कधीही न परतण्याकरता! सर्व मार्गांनी नि साधनां-निशी ज्यूंवर हकालपट्टीचं दडपण येऊ लागलं. नागरिकत्व नसलेल्या परकीय ज्यूंवर चोवीस तासांच्या आंत ऑस्ट्रिया सोडून जाण्याचा हुकूम बजावण्यात आला. प्रांता-प्रांतातून, जिल्ह्याजिल्ह्यातून पकडून आणलेल्या ज्यूंना व्हिएन्नाच्या अनाथालयात डांबण्यात आलं. स्थानिक ज्यूंनाच त्यांच्यावर देखरेख करण्याला लावण्यात आली. असं करायचं नाकारणाऱ्यांना पकडण्यात आलं. ज्यू इस्पितळांचा, शाळांचा नि हेल्थहोम्सचा कबजा करण्यात आला. आइशमनची ही 'करामत' पाहण्याकरता बर्लिनमधून व्हिएन्नात हाकून काढलेल्या नि त्यापासून योग्य तो 'धडा' घेण्याचा आदेश आलेल्या ज्यूंना आइशमनच्या या कामगिरीनं थक्क केलं.

## जुलूम, जबरदस्ती

आइशमनच्या या कार्याचं अनुकरण बर्लिनच्या 'ज्यूंच्या हकालपट्टी करणाऱ्या सेंट्रल जर्मन अॅथॉरिटीनंही' १९३९ च्या सुरुवातीपासूनच करण्यास प्रारंभ केला. १९३९ च्या सप्टेंबरमध्ये हिमलरनं 'नॅशनल सिक्यूरिटी पोलीस' नि 'नाझी पार्टी इंटेलिजन्स सर्व्हिस' यांचं एकीकरण केलं. याच सुमारास आइशमन बर्लिनला परतला. ज्यूंची हकालपट्टी करणाऱ्या बर्लिन कार्यालयात त्याची प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. जिभेवर साखरपेरणी नि हृदयात हलाहल, या खास नाझी पद्धतीची नि प्रवृत्तीची जोपासना करण्यास त्यानं सुरुवात केली. एका बाजूला ज्यू विरुद्ध दडपशाही, जुलुम नि धाकदपटशा चालू असतानाच त्यांना

सांगितलं जायचं, ' खुद्द सैतानही वाटतो इतका दुष्ट नसतो...त्याच्याशीही सामोपचारानं जमवून घेता येतं...वाटाघाटी करता येतात...त्याच्याजवळही सौज्यनाचा, मार्दवाचा, आदबीचा अंश असतो...' डॉ. लॉवेनहर्झ या व्हिएन्नाच्या एका नामवंत ज्यू नेत्याच्या आइशमननं मुस्काडीत भडकावली होती. बर्लिनच्या एका ज्यूला त्यानं ऐकवलं, ' कुत्र्या, यापूर्वीच खरं तर तू कॉन्सट्रेशन कॅम्पमध्ये असायला हवं होतंस ' सेबॅस्टिन नावाच्या एका वृद्ध ज्यूनं ऑफर केलेली सिगरेट, झुरळ झटकावं तशी आइशमननं तिरस्कारानं फेकून दिली. याच वेळी त्याची नाटकी, दांभिक वाणी बकायची. ' ज्यूंच्या प्रश्नाबद्दल आम्हाला खूप आस्था आहे...त्यांच्या बारीकसारीक विनंतीचाही आम्ही आस्थेन विचार करू. ' आपल्या बुडापेस्ट येथील घराच्या आवारातील एका बदामाच्या झाडावरचं फळ चोरून खाल्ल्याबद्दल आइशमननं एका ज्यू मुलाला ठार केलं होतं.'

ज्यूंनी जाणलं होतं, आपल्या जीवनमरणाचा प्रश्न आइशमनच्याच हाती आहे नि त्याच्याशी सामोपचारानं घेणं भाग आहे. बुडापेस्टच्या एका बुद्धिमान ज्यू पुढाऱ्याला आइशमननं ' तुझं मी भक्ष्य करीन ' अशी धमकी दिली होती. ' ज्यूंचा अधिपती ' इथपर्यंत आइशमनची भूमिका बनली. ज्यूंच्या छळवादाबरोबरच त्याला बढती नि सत्ता मिळत गेली. १९३९ अखेरीस तो बर्लिनमध्ये होता. मार्च १९४१ मध्ये तो गेस्टापोचा प्रमुख बनला. ही भूमिका युरोपियन ज्यूंची शोकांतिका होईपर्यंत त्याने सोडली नाही. ज्यू-प्रश्नाचा कायमचा निकाल (Final solution of the Jewish question) लावण्याची सूत्रं त्याच्याच हातात होती. राईशमधील




आंब्या आंब्यावर लिहीलेले असते चोखणाराचे नांव!




परंतू आंब्याच्या उत्तम लोणच्यावर लिहीलेले
असते फक्त ठाकूरांचेच नांव!!

ठाकूर लोणची, पापड, मसाले, चटण्या.
माहीम मुंबई.

प्रत्येक आधिकारी त्याच्या आज्ञेची जणू वाटच पहायचा.

फ्रान्स, नार्वे, बेल्जियम, इटली, हॉलंड नि लुक्झेंबर्ग या जर्मनीनं जिकलेल्या राष्ट्रात आईशमननं खास आधिकारी नेमले नि ज्यू प्रश्नाचा निकाल लावण्याचे आधिकार दिले. रुमानिया, वल्गेरिया नि स्लोव्हाकिया इ. जर्मनीच्या कलानं घेणाऱ्या राष्ट्रात त्यानं तेथील जर्मनीच्या वकिलातींमार्फत तेथील ज्यूंची इतरत्र रवानगी केली. सर्वियात, क्रोशियात, ग्रीस नि डेन्मार्कमध्ये त्यानं ज्यूंच्या हकालपट्टी करता खास पथकं पाठविली. तो स्वतः हंगेरीत आला. ज्यूंचा खातमा करण्याकरता त्यानं सर्वत्र हात पसरले. जगप्रसिद्ध 'वॅन्सी परिषद' त्यानंच आयोजित केली. या परिषदेनं ज्यू-विच्छेदन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे अधिकारही त्यालाच दिले. हिमलरच्या नावानं त्यानं हुकूम सोडण्यास सुरुवात केली. कॉन्सट्रेशन कॅम्पमधील ज्यूंना मशीनगन्सच्या गोळ्या घालून सामुदायिकरीत्या मारण्याचे हुकूम त्यानं हिमलरच्या नावानं दिले होते. प्रत्यक्ष जर्मन सैन्यालाही हुकूम देण्याचा अभूतपूर्व आधिकार त्यानं गाजवून घेतला.

## रूडॉल्फ हेस लिहितो....

१९४१ च्या ऑक्टोबरमध्ये एस. एस. संघटनेच्या प्रमुखानं आइशमनच्या कार्याचा बेफाम गौरव करून, त्याचं केवढं अद्वितीय महत्त्व आहे, हे पटवून देण्याकरता त्याला भलं मोठं प्रशस्तीपत्रक दिलं नि त्याला लेफ्टनंट.कर्नलचा हुद्दा द्यावा, अशी शिफारस केली. त्याचा परिणाम होऊन आइशमनला आणखी बढती मिळाली. ज्यूंचा नायनाट करण्याच्या 'गौरवपूर्ण' कार्याबद्दल त्याला अनेक किताबही मिळाले. ज्यूंना टिपून काढून गॅसचेंबरची वाट दाखवणं नि उघड्या मैदानात गोळी घालण्याची आज्ञा देणं हा त्याच्या हातचा खेळच होऊन बसला. त्याशिवाय तो स्वस्थ बसत नसे. त्याच्या सहवासात आलेल्या नि त्याला सहकार्य दिलेल्या अनेकांनी युद्धानंतर त्याच्याबद्दल लिहून ठेवलंय. यापैकी फाशीची शिक्षा झालेल्या दोघांपैकी रुडॉल्फ हेसने लिहिलंय : "Eichmann was absolutely devoted to his mission, and was certain that the extermination was necessary in order to save the German people in the future from the destructive intentions of the Jews. That was how he understood his mission, and he devoted all his energies to carry out the extermination plans of the Reichsfuhrer. Eichmann was sharply opposed to every suggestion to sift-out the Jews capable to work frcm those deported. He regarded this as a constant danger to his plans for the 'final solution', in view of the possibility of mass escapes or some other event that might permit the Jews to remain alive.'

आइशमनच्या सहवासात बराच काळ आलेल्या कर्ट बेचरनं त्याचं थोडक्यात

पण मार्मिक शब्दात वर्णन केलं आहे : " Eichmann was not the spiritual father of the programme, but he was its zealous executor."

खाटिकखान्यात सपासप गुरं कापावी तसं साठ लाख ज्यूंच्या भीषण संहाराला जबाबदार असलेल्या आइशमननं हे ' महान कार्य ' केवळ नाइलाजानं केलं असं नाही, तर आपण काय करीत आहोत या जागृत नि सुस्पष्ट जाणीवेनं ! आपल्या कृती यथायोग्य, अचूक नि अत्यावश्यक आहेत त्या; केल्याच पाहिजेत, या मिशनरी श्रद्धेनं ! आपलं तन, मन आणि जर्मनीचं धन सर्वस्व पणास लावून ! मे १९४५ मध्ये क्रूर नाझी राक्षसांचा फडशा उडाल्यावरदेखील, १९३९-४५ च्या सहा वर्षांच्या काळात जो भयंकर ज्यूसंहार झाला त्याबद्दल सहृदय जगाचे हृदय फाटल्यावरही आणि नाझी नेत्यांनी एकमेकांकडे बोट दाखवून, दुसऱ्याच्या माथ्यावर याचं खापर फोडून, स्वतःवरील जबाबदारी झटकायला सुरुवात केल्यावरही, आईशमन या वाहून घेतलेल्या कार्याला चिकटून होता. पस्तावा होण्याचं तर दूरच राहो, ज्यू वंश पुसून टाकलाच पाहिजे, या ध्येयावर त्याची अविचल श्रद्धा होती. १९४५ च्या एप्रिलमध्ये त्यानं एका विश्वासू सहकाऱ्याजवळ उद्गार काढले : " I would be ready to commit suicide, and that I would gladly leap into my grave, after I have succeeded in exterminating five million Jews. "

३० जानेवारी १९३३ रोजी वृद्ध हिंडेनबर्गनं जर्मनीची सूत्रं हिटलरच्या हाती सोपविली. त्यावेळी आपण जर्मन जनतेचं नि जगाचं महान अकल्याण करीत आहोत, याची त्याला कल्पना तरी होती ? नवीन मंत्र्यांचा शपथविधी झाल्यावर तो त्यांना म्हणाला होता, " And now, gentlemen, forward, with the help of God ! " जर्मनीनं घोडदौड केली खरी, पण रक्तपात नि विनाशाच्या दिशेनं !

## युद्ध संपले आणि....

९ मे १९४५ रोजी जर्मनीनं बिनशर्त शरणागती लिहून दिली. रशिया, फ्रान्स नि अमेरिकेचे रणगाडे व सैन्य बर्लिनच्या रस्त्या-रस्त्यातून राईशच्या दिशेनं घणघणाट करीत असताना हिटलर नि त्याची प्रेयसी इव्हा ब्राऊ यांनी आत्महत्या केली. आता मात्र आपली धडगत नाही या प्रखर जाणीवेनं, झालेल्या सैरावैरा पळापळीत, संधी साधून, आइशमन जीव मुठीत घेऊन आर्जेंटिनाला पळून आला नि तिथे ' रिकार्डो क्लेमंट ' या बनावट नावाखाली आयुष्य कंठू लागला. पण सदैव भिरभिरत्या कावळ्याच्या नजरेनं ! कमालीच्या सावधगिरीनं ! अष्टौप्रहर जागरूक चित्तानं ! या ज्यू रक्तपिपासू बोक्याला ज्यू-बडग्याची सतत जाणीव होती. ज्यू-पिशाच्च त्याच्या मानगुटीवर घट्ट बसलं होतं. स्वप्नातही !

' रिकार्डो क्लेमंट ' ही व्यक्ती आर्जेंटिनाच्या ' ब्यूनास आयर्स ' या राजधानीत फक्त १७ जुलै १९६० पर्यंतच वावरत होती. डोळ्यांत तेल घालून ज्यूंची त्याच्या-

वर पंधरा वष पाळत होतीच. नसून कसं चालेल ! पापाला वाचा फुटली नाहीच तर कुणीतरी ती फोडावी लागतेच.

१८ जुलै १९६० चा त्याचा दुर्दिन उगवला. इ-वी तोहर नि जॅक शिमोनी या दोघा ज्यूंनी त्याच्यावर, त्याच्या किंचित क्षणाच्या बेसावध अवस्थेत, गरुडाची झडप घालून ब्यूनास आयर्समधून विमानातून त्याला इस्रायलला पळवून आणलं. आइशमनच्या वकिलानं हा दिवस ११ मे १९६० होता, असं खटल्याच्या वेळी कोर्टाला सांगितलं. मे १९६०मध्ये आइशमननं ब्यूनास आयर्समध्ये (स्वखुषीनं) पुढील जाहीरनामा (Declaration) लिहून दिला : " I, the undersigned, Adolf Eichmann, declare of my own free will that, since my true identity has been discovered, I realise that it is futile for me to attempt to go on evading justice. I state that I am prepared to travel to Israel to stand trial in that country before a compe tent court. I understand that I shall receive legal aid, and I shall endeavour to give a straightforward account of the facts of my last years of service in Germany, so that a true picture of the facts may be passed on to future generations. I make this decla-ratian of my own free will. I have been promised nothing, nor havy any threats been made xgainst me. I wish at last to achieve inner peace. As I am unable to remember all the details and may be confused about certain facts, I ask to be granted assistance in my endeavours to establish the truth by being given access to documents and evidence.

Buenos Aires, }<br>May, 1960 }  sd/ : *Adolf Eichmann.*"

जेरुसलेमच्या डिस्ट्रिक्ट कोर्टात मुख्य न्यायमूर्ती मोशे लॅंडॉ, बेंजामिन हॅलवे आणि यिट्झॅक रॅव्हे या तीन नामवंत ज्यू कायदेपंडित न्यायमूर्तींपुढे ता. ११ एप्रिल १९६१ रोजी आइशमन विरुद्ध फौजदारी खटला सुरू झाला. (फौजदारी केस क्र. ४०/६१).

फिर्यादी इस्रायल शासनाच्या वतीनं इस्रायलचे (त्यावेळचे) ॲटर्नी-जनरल गिडॉं हॉजनेर उभे ठाकले. त्यांना मदतनीस म्हणून डॉ. जेकब रॉबिन्सन, गॅव्हरिल वाक्, यॅकॉव्ह बॅरोर, झ्वि तेर्लो हे चौघे होते. आरोपी आइशमनतर्फे जमनीतील कोलन बारचे प्रख्यात कायदेपंडित डॉ. रॉबर्ट सरव्हॅशियस नि म्युनिक बारचे डाएटर वेटेनब्रॉक हे अनुभवी वकीलद्वय सरसावले होते. हिरीरीनं !

अॅडॉल्फ आइशमन गुन्हेगार-खुनी होता की नव्हता, हे ठरविण्याकरताच तर जेरुसलेमच्या न्यायालयात रणांगणावर दोन बुद्धिमान प्रकांड कायदेपंडितांच्या पलटणी कायद्याच्या ज्ञानाच्या शस्त्रास्त्रांनिशी समोरासमोर खड्या ठाकल्या होत्या.

या अभूतपूर्व नि गुंतागुंतीच्या फौजदारी खटल्यास युद्धोत्तर कालात सुरुवात झाली, ती ११ एप्रिल १९६१ रोजी !

## पंधरा आरोप

आइशमनविरुद्ध वेगवेगळ्या स्वरूपाचे एकूण पंधरा आरोप होते. या सर्वांचा मतितार्थ एकच होता : दुसऱ्या जागतिक युद्धाच्या अगोदर (१९३९ पूर्वी) नि ऐन युद्धकाळात (१९३९–४५) आइशमननं स्वत:, वरिष्ठांच्या आज्ञेनुसार नि एस. एस., एस. डी. नि गेस्टापो या क्रूर नाझी संघटनांमार्फत जर्मनी, पोलंड, रशिया, ग्रीस, हंगेरी, उत्तर–पश्चिम–दक्षिण युरोप इ. राष्ट्रांत साठ लाख ज्यूंचं भीषण हत्याकांड घडवून आणलं. ही कत्तल विश्वातील एका मानव-वंशाची, म्हणजेच मानवतेची होती. मानवतेविरुद्ध अमानुष गुन्हा होता. कत्तलीचे प्रकार : उघड्या मैदानात ज्यू पुरुष, स्त्रिया, मुलं, मुली यांना उभं करून (अनेक प्रसंगी नग्नावस्थेत) पाखरांप्रमाणे गोळ्या घालणं; ज्यूंना स्नान घालून शुद्ध करण्याच्या बतावणीखाली गॅस चेंबर्समध्ये गुदमरून-घुसमटून मारणं; ज्यूंना घरादाराला, मालमत्तेला पारखं करून तांड्यातांड्यांनी हाकून काढणं; त्यांची मालमत्ता जप्त करून विकणं; त्यांना किमान मानवी हक्क नाकारणं; ज्यूंना शारीरिक सहनशिलतेपलीकडे अपार कष्ट करायला लावून, गुलाम बनवून, त्यांचा हेतुपुरस्सर अंत घडवून आणणं; अनेक कॉन्सट्रेशन कॅम्प्समध्ये डांबून असहाय्य अवस्थेत त्यांचे हालहाल करून ठार मारणं; त्यांच्यावर मरेमरेतो आर्थिक कर लादणं; जीवन नाकारणं; मारलेल्या ज्यू स्त्रियांचे रेशमी केस कापून घेणं नि विवाहाची प्रीतिचिन्हं–सोन्याच्या अंगठ्या काढून घेणं; बसविलेले सोन्याचे दातही उपटून काढणं; ज्यू बुद्धिवाद्यांची नि विचारवंतांची उपासमार करणं; ज्यूंना जर्मनेतर, म्हणजेच अनार्य रक्ताचे ठरवून खतम करणं; माय-लेकरांची ताटातूट करणं; ज्यू-ज्यूएतर विवाहांपासून झालेल्या संततीचं दांपत्यांच्या मनाविरुद्ध स्वरूप ठरविणं; ज्यूंना कम्युनिस्टांचे पाठीराखे, म्हणजेच आर्य-जर्मन-जनतेचे शत्रू म्हणून संबोधणं; भांडवलदार, म्हणजेच मजुरांचे शत्रू मानणं, इत्यादी.

ज्यूंच्या हिब्रू भाषेत एक अर्थपूर्ण म्हण आहे : 'नरकाच्या दाराशी गेल्यावरही दुष्टांना पस्तावा होत नाही. (The wicked, even at the gate of the hell, do not repent) हिटलरने आपल्या अखेरच्या राजकीय मृत्युपत्रातही 'विशुद्ध आर्य रक्ता'च्या जर्मन जनतेला संदेश दिला होता : 'जर्मन शासनाला नि जनतेला माझं अखेरचं सांगणं आहे, की जातिभेदांची, वंशभेदांची ध्वजा फडकावीत ठेवा. जगातील सर्व राष्ट्रांच्या या विषारी शत्रूंची–जागतिक ज्यू-जमातीची–नावनिशाणीही शिल्लक ठेवू नका.'

रोमारोमात ज्यू-द्वेष भरलेल्या आईशमनविरुद्ध खटला सुरू झाला. त्यातील प्राथमिक मूलभूत हरकतींच्या विश्लेषणाची ही प्रश्नोत्तर हकीकत : ता. ११ एप्रिल १९६१.

प्रमुख न्या. लँडॉ : आपण ॲडॉल्फ आइशमनच ना ?

आइशमन : होय.

न्या. लँडॉ : आपण आपलं वकीलपत्र डॉ. रॉबर्ट सरव्हेंशियस यांना दिलं आहे ?

आइशमन : होय.

न्या. लँडॉ : आपल्यावरचे पंधरा आरोप आपणास नीटपणे समजले आहेत ?

आइशमन : होय.

डॉ. सरव्हेंशियस : आरोपी दोषी आहे किंवा नाही, हे ठरविण्यापूर्वी दोन मूलभूत हरकतींचे मुद्दे मी मांडीत आहे. एक : आरोपीविरुद्ध आपले काही दूषित नि विकल्पित पूर्वग्रह प्रथमपासूनच झाले असल्याची आरोपीच्या मनातील भीती मी व्यक्त करतो. दोन : हा खटला चालविणे या कोर्टाच्या अखत्यारीत येत (Jurisdiction) नाही

न्या. लँडॉ : स्पष्टीकरण कराल ?

डॉ. सरव्हेंशियस : करतो...या खटल्यात आपण ज्यूंनी न्यायमूर्ती म्हणून बसू नये याला काही कारणं आहेत की नाहीत, हे आपण प्रथम ठरवावं. तसंच, आपण या खटल्याचा अंतिम निर्णय अगोदरच ठरवून टाकला आहे की नाही, याचाही शोध-बोध घ्यावा. ज्यूंच्या झालेल्या प्रचंड हत्याकांडात आपल्यापैकी कुणाचाही जवळचा किंवा दूरचा एखादा तरी सगासोयरा किंवा मित्रही खतम झाला असल्याची शक्यता असल्यानं आपलीं मनं आरोपीबद्दल कलुषित झाली असण्याची शक्यता नाही काय ? भीषण कत्तलीत ज्यू जमातच फार मोठ्या संख्येनं गोवली गेली असल्यामुळे नि त्या संहाराच्या थरारक आठवणींमुळे, आपणापैकी निदान एका ज्या न्यायमूर्तीला तरी या खटल्यातून वगळण्यात यावं, अशी परिस्थिती आहे की नाही ? आपल्या मनात आरोपीबद्दल दूषित विकल्प निर्माण झाला आहे, अशी साधार भीती आरोपीला वाटणं साहजिकच नाही का ? एखाद्या न्यायमूर्तीनं दुसऱ्या एखाद्या खटल्यात आइशमनबद्दल काही एक मत व्यक्त केलं असेल, म्हणूनच केवळ मी ही व्यक्त करीत आहे, असं नाही. खुद्द जनतेतही या खटल्याच्या नि:पक्षपातीपणाबद्दल शंका व्यक्त केल्या जात आहेत. खुद्द इस्रायलच्या सुप्रीम कोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तींनं–न्या. ओल्शन यांनी–एका निकालपत्रात मत व्यक्त केलं आहे, की केवळ फिर्यादीं, बचावपक्ष, जनता आणि न्यायमूर्ती यांच्याच खटल्याच्या नि:पक्षपातीपणाबद्दल खात्री होऊन उपयोगाचं नाही; जर न्यायमूर्तींचं मन पूर्वग्रहदूषित आहे, अशी साधार भीती जनतेत निर्माण झाली असेल, तर असे न्यायमूर्ती तो खटला चालविण्यास पात्र नाहीत, असं धरून चालण्यास तेवढं एकच कारण पुरेसं आहे.' या खटल्या-

पुरतं बोलायचं तर जगातील सारी जनता हेच पब्लिक आहे. जगात महत्त्वपूर्ण स्थानं भूषविलेल्या श्रेष्ठ विचारवंतांनी एकमुखानं बोलून दाखविलं आहे, की न्यायालयं सदैव अपक्ष (न्यूट्रल) असायला पाहिजेत. तथापि, हे कोर्ट तसं असूच शकत नाही, असं गृहीत धरून चालण्यास आणखीही एक कारण आहे. हा खटला काही मामुली स्वरूपाचा नाही. आरोपीविरुद्ध केलेल्या आरोपांना राजकीय विचार-सरणीचंही अस्तर आहे; आरोपी जर्मनीच्या राजकीय घटनांत सहभागी झाल्याचाही आरोप आहे. या राजकीय घडामोडीत, घटनांत, इस्रायलला नि ज्यूंना विलक्षण कुतुहल नि रस आहे. या कुतुहलाचं स्वरूपही राजकीय आहे. विश्वातील सारी ज्यू जनता या खटल्याकडे उघडया डोळयांनी, कान टवकारून लक्ष देऊन आहे. त्याच-बरोबर राजकीय लिखाण करणाऱ्या सर्व ज्यू नियतकालिकांनी, दैनिकांनी आइशमनचं म्हणणं ऐकूनही न घेता त्याला सर्रास बदनाम करून, गुन्हेगार ठरवूनही टाकलं आहे. या साऱ्या गदारोळाकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. या घडा-मोडींचा जनमनावर फार मोठा विपरीत नि दूरगामी परिणाम झाला आहे. या विखारी राजकीय प्रचाराचा निर्णायक परिणाम न्यायमूर्तींच्याही मनावर झाल्या-शिवाय कसा राहील? इस्रायलच्या ज्यू शासनाला ज्यू जनतेची कड घेण्याचा अवश्य अधिकार आहे. म्हणूनच खुद्द शासनही पूर्वग्रहदूषित झालं असण्याची शक्यता कशी नाकारता येईल? याचाच अर्थ फिर्यादीलाही याच कलुषित दृष्टिकोनाची कड घेणं भाग आहे. तथापि, आपण न्यायमूर्तींनी मात्र, आपण स्वतः या भावनावेगाच्या नि गदारोळाच्या आवर्तात गुरफटून न जाता, त्याच्या पलीकडे जाऊन, आपण अपक्ष किंवा स्थितप्रज्ञ राहणार आहोत काय, याचा अवश्य विचार करायला हवा. असं विचारण्याचा आरोपीला अधिकार आहे किंवा नाही, याचाही विचार कोर्टानं केला पाहिजे. संपूर्ण अलिप्तता हाच न्यायदानाचा मूलभूत पाया आहे की नाही?

## हरकतीचा दुसरा मुद्दा

माझा दुसरा दावा आहे, की या न्यायालयाला हा खटला चालविण्याचा अधिकारच नाही. हे कोर्ट त्या दृष्टीनं अपात्र आहे. कारण इस्रायलनं संमत केलेला नि ज्याच्या खाली आइशमनवर आरोप ठेवला आहे तो 'The Nazis and Nazi collaborators (Punishment) Law, 1950' हा कायदाच मुळी आंतरराष्ट्रीय कायद्याशी विसंगत आहे. असा कायदा संमत करण्याचा इस्रायलला अधिकारच नाही. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मूलभूत तत्त्वाविरुद्ध असा कायदा कुठलं राष्ट्र संमत करू शकेल?

आइशमनला आर्जेंटिनामधून जुलुम-जबरदस्तीनं नि धाकदपटशा दाखवून पळ-विण्यात आलं असून या कोर्टापुढे उभं करण्यात आलं आहे. वर दिलेल्या १९५० च्या कायद्यात, इस्रायलची स्थापना होण्याअगोदरच व्यक्तींचा नि कृतींचा उल्लेख आहे. तसंच, इस्रायलच्या सरहद्दीबाहेरील नि इस्रायलचे नागरीक नसलेल्या व्यक्तींचा

उल्लेख आहे. आइशमन इस्रायलचा नागरीक नाही. अशा परदेशीय नागरिकावर इस्रायलमध्ये कसा काय खटला चालू शकतो ? आंतरराष्ट्रीय कायद्यानं आंतर-राष्ट्रीय एकत्रित सहजीवनाची शाश्वती दिली आहे. त्याची जपणूक झालीच पाहिजे. या कोर्टात कायद्याचं पालन झालंच पाहिजे आरोपीचे हात तर इथे कर-कचून आवळले गेले आहेत. आरोपीजवळ आपले साक्षीदार इथे आणण्याइतकी आर्थिक ताकद नाही. हे साक्षीदार एस. एस. नाझी संघटनेचे अधिकारी होते नि आता त्यांना जर्मनीतून इथे येऊन आरोपीच्या बाजूनं साक्ष देण्याची वेळ आल्यास त्यांना आपल्या सुरक्षिततेची नि मतस्वातंत्र्याची शाश्वती नाही. इस्रायल आंतर-राष्ट्रीय कायद्याच्या मूलभूत तत्त्वांची पायमल्ली करणार नाही, अशी आशा आहे. तथापि, १९५० च्या कायद्यात नि तो संमत करून घेण्यात नाझींबद्दलचा आकस नि द्वेषच दिसून येतो, अशी या साक्षीदारांना भीती वाटत आहे. वरील कायदा अपवादात्मक समजावा लागेल. इस्रायलनं सूडाच्या कल्पनेचा धिक्कार केला आहे ना ? श्रीमती गोल्डा मेयर ह्या परराष्ट्रमंत्री असताना त्यांनी यूनोच्या सिक्यूरिटी कौन्सिलच्या एका सभेपुढे ता. २२ जून १९६० रोजी कबुली दिली आहे, की सूडाचा प्रश्नच निर्माण होत नाही. गोल्डा मेयर यांनी त्यावेळी ज्यू राज-राजकवी बायलीक याच्या 'The Devil himself cannot think up a revenge for the murder of one single child' या काव्यपंक्तीचा उल्लेखही केला होता. तथापि इथे मात्र सूडाची भावनाच डोकं वर काढू लागल्याचं दिसत आहे; तिला खतपाणी घातलं जात आहे, असं मानायला वाव आहे. हेही मनुष्य स्वभावालाच धरून आहे असं मी मानतो. पण ही सूडाची भावना आरोपांचं स्वरूप धारण करून कोर्टातील खटल्याचा विषय बनते तेव्हा त्याला आंतरराष्ट्रीय कायद्याशी सुसंगत अशाच कायद्याचा आधार नको का ? इथं जर अपराधाचं परि-मार्जन करणं हाच हेतू असेल, तर आरोपी हे प्रक्षालन कसं करू शकेल ? मानवतेच्या एका मोठ्या समुहाच्या मृत्यूची भरपाई तो कशी काय करू शकतो ? आरोपी नागरीक असलेल्या राष्ट्रानंच ज्यूंना यमयातना भोगायला लावल्याबद्दल वैयक्तिक दृष्ट्या आरोपीला त्या अपराधाचं परिमार्जन करायला लावता येणार नाही. या खटल्यात नैतिक जबाबदारीचा नि नुकसानभरपाईचा प्रश्न गोवला गेला असेल, तर आरोपीला हाताशी धरून, त्याच्या सहकार्यानं हा अनर्थ घडवून आणलेल्या राष्ट्रानंच ही नैतिक जबाबदारी स्वीकारावी. आरोपीच्या हातून घडलेल्या कृती या त्याच्या प्रत्यक्ष राष्ट्राच्याच हातून घडलेल्या असल्यामुळे त्या राष्ट्रालाच त्यांच्या भीषण परिणामांकरता नैतिकदृष्ट्या जबाबदार धरलं पाहिजे. प्रत्यक्ष ज्यूसंहाराच्या गुन्ह्यांपेक्षा त्याची जबाबदारी नि जनकत्व कुणाचं, हाच महत्त्वाचा प्रश्न इथे आहे. आपल्या राष्ट्राकरवीच आरोपी या पापात गोवला गेला आहे. फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी या राष्ट्राने ही जबाबदारी केव्हाच आपल्या शिरावर घेतली आहे.

पूर्वीच्या जर्मन राज्यकर्त्यांनी केलेल्या चुकांबद्दल पश्चिम जर्मनीच्या आजच्या सत्ताधाऱ्यांनी नुकसान भरपाई दिलेलीही आहे. प. जर्मनीनं पूर्वी झालेल्या ज्यूंच्या छळाबद्दल इस्रायलला भरपूर भौतिक मदतही देऊ केली आहे. युद्धानंतर न्यूरेनबर्गला आंतरराष्ट्रीय लष्करी न्यायालयापुढे झालेल्या खटल्याचं स्वरूपच वेगळं होतं. त्यात गोवले गेलेले आरोपी जर्मनीचे राष्ट्रनेते होते. त्यांनी त्यांच्या अमानुष गुन्ह्यांचं भरपूर प्रायश्चित्तही भोगलेलं आहे. त्यांच्या पातळीवर आइशमनला नेऊन ठेवता येणार नाही. म्हणूनच त्या खटल्यातील परिमाणं नि फूटपट्ट्या इथेही लावून आरोपीला शिक्षा करता येणार नाही. सर्वसाधारणपणे जागतिक लोकमत आंधळं असतं नि ते खोलवर विचार न करताच फार त्वरित निर्णय घेतं. विद्वान नि जबाबदार कायदेपंडितही नेहमीच आदर्श न्यायमूर्तींची भूमिका वठवू शकतात, असं नाही.

म्हणून ' Nazis and Nazi collaborators (Punishment) Law ' या इस्रायलच्या कायद्यालाच माझी मूलभूत हरकत आहे. तो एक युद्धोत्तर कायदा असल्यामुळे सनदशीर नाही. म्हणून बिनबुडाच्या कायद्यान्वये आरोपी दोषी ठरू शकत नाही.

न्या. लँडॉ :–आणखी काही हरकती ?

डॉ. सरव्हॅशियस : आहेत.

न्या. लँडॉ : सांगा.

डॉ. सरव्हॅशियस : या खटल्याची एकूण पद्धती नि स्वरूपच न्यायमूर्तींचा हा खटला चालविण्याचा अधिकार काढून घेणारं आहे. ज्या पद्धतीनं आइशमनला आर्जेंटिनातून पळवून इस्रायलमध्ये आणण्यात आलं, ती पद्धतीही गर्हणीय असून बेकायदेशीर आहे. म्हणून बेकायदेशीररीत्या पकडून नि पळवून आणलेल्या आरोपीवर हे कोर्ट खटला चालविण्यास पात्र ठरू शकत नाही. आइशमनला पकडण्यात आल्यावर त्यानं खुषीनं जो जाहीरनामा लिहून दिला असल्याचं सांगण्यात आलं, त्यानुसार आरोपीनं इस्रायलमधील कोर्टाचा हा खटला चालविण्याचा अधिकार आपणहोऊन मान्य केला आहे, असाही दावा करण्यात आला आहे. हा जाहीरनामा आइशमननं स्वखुषीनं लिहून दिला आहे ? मुळीच नाही. तो त्याच्याकडून जुलुमजबरदस्तीनं, धाकदपटशा दाखवून, दमबाजी करून लिहून घेण्यात आला आहे. म्हणून तो शून्य किंमतीचा असून, पुरावा म्हणून स्वीकारताच येणार नाही. कायद्याच्या दृष्टीनं त्याला कवडीचंही मोल नाही. म्हणून त्या बेकायदेशीर जाहीरनाम्याच्या आधारावर या कोर्टाला हा खटला चालविण्याचा अधिकार प्राप्त होऊ शकत नाही. जी व्यक्ती आपल्यावर खटला भरला जाईल या भीतीनं सतत पंधरा वर्षं लपूनछपून वावरते, ती व्यक्ती एकदम, एकाएकी उघडच्यावर कधीही येत नसते नि ' मी कोर्टासमोर आरोपी म्हणून उभं राहायला तयार आहे, ' असं कबूलही करीत नसते.

विशेषत: आपण यमसदनाला पाठविलेल्यांचे सगेसोयरे राहतात त्या इस्रायलमधील एखाद्या कोर्टात ! आजपर्यंत राजकीय स्वरूपाचं जे बदनामीकारक उदंड लिखाण आइशमनबद्दल लिहिलं गेलं आहे, त्यावरून असं निश्चित दिसून येईल, की खुद्द इस्रायल-शासनाच्या खास आज्ञेवरूनच त्याला इथे खटला भरण्याकरता पळवून आणण्यात आलं आहे. अशी वस्तुस्थिती असताना इस्रायलच्या शासनानं आंतरराष्ट्रीय कायद्याची पायमल्ली केली आहे, असंच म्हणणं भाग आहे. त्यामुळे जबरदस्तीनं पळवून आणण्याच्या मुळातल्या बेकायदेशीर कृतीला कायदेशीरपणाचा बेगडी, खोटा, फसवा मुलामा देता येणार नाही. आइशमनला इस्रायलच्या हुकुमावरूनच आर्जेटिनामधून इथे पळवून आणलं गेलं आहे, हे सिद्ध करण्याकरता मी इवी तोहर आणि 'जॅक शिमोनी' या दोघांची साक्ष काढू इच्छितो. या दोघांनी आइशमनला मुसक्या बांधून ब्यूनास आयर्समधून २२ मे १९६० रोजी चक्क पळवून आणलं.

न्या. लँडॉ : कोणती तारीख ?

डॉ. सरव्हॅशियस : २२ मे १९६०. या दोघांनी आरोपीचं स्वातंत्र्य हिरावून घेतलं नि त्याला इथं गुंडाळून, खेचून आणलं. न्यायमूर्ती महाशय, एक चूक सुधारतो. ही तारीख ११ मे १९६० होती. या दोघांपैकी 'जॅक शिमोनी' हा आर्जेटिनाच्या 'El Al' या विमानकंपनीच्या मालकीच्या एका विमानाचा वैमानिक होता. याच विमानातून त्यानं आरोपीला पळवून आणलं. या दोघांनी सांगावं, इस्रायलच्या शासनाचीच त्यांना तशी आज्ञा नि फूस होती की नाही ? या दोघांची साक्ष फार महत्त्वाची नि मोलाची ठरणार आहे. कारण त्यावर या कोर्टाला हा खटला चालविण्याचा आधिकार आहे, की नाही हे अवलंबून रहाणार आहे.

## सिक्युरिटी कौन्सिलचं मत

ॲटर्नी जनरल : आइशमनची आर्जेटिनातील धरपकड नि त्याला इथे आणलं जाणं हे विषय यूनोच्या सिक्युरिटी कौन्सिलच्या ता. २३ जून १९६० च्या सभेपुढे चर्चिले गेले आहेत. सिक्युरिटी कौन्सिलनं त्या तारखेला संमत केलेल्या ठरावात नमूद केलं आहे, की 'नाझी अमदानीत झालेल्या ज्यूंच्या अमानुष छळामुळे; नि त्यामुळे झालेल्या अन्यायाच्या जागतिक जाणीवेमुळे आइशमनवर ह्या भीषण गुन्ह्यांकरता योग्य अशा न्यायालयात खटला भरला गेला पाहिजे.' आइशमन गुन्हेगार असून दोषी आहे, असं सिक्युरिटी कौन्सिलनं म्हटलेलं नाही. त्याचे गुन्हे सिद्ध करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे नि मी ती स्वीकारीत आहे. तथापि, योग्य अशा न्यायालयात आरोपीवर खटला भरला गेलाच पाहिजे, असं मत सिक्युरिटी कौन्सिलनं निश्चित व्यक्त केलं आहे, हे दुर्लक्षून चालेल काय ? न्यूरेनबर्ग येथील इंटरनॅशनल मिलिटरी ट्रायब्यूनल पुढील नाझी नेत्यांवरील खटल्यात आरोपी गोवला गेला नव्हता. त्यामुळे त्या ट्रायब्यूनलनं दिलेल्या निकालपत्राचा

या खटल्यात आरोपीविरुद्ध उपयोग करता येणार नाही, हे मलाही मान्य आहे. तथापि, त्या ट्रायब्यूनलनं आइशमनचा 'ज्यूंचा छळ नि नायनाट करण्यास कारणीभूत,' असा दोनदा आवर्जून उल्लेख केला आहे, हे नजरेआड करून चालेल काय? आरोपीविरुद्ध पुरावावा म्हणून मी हे सांगत नाही. पण साऱ्या सहृदय जगाची न्यायबुद्धी, सदसद्विवेकबुद्धी, आइशमनवर खटला भरला पाहिजे, असं सतत गेली पंधरा वर्ष टाहो फोडीत आहे, हे विसरून चालणार नाही. ट्रायब्यूनलच्या निकाल-पत्रात 'हिटलरनं ज्यूंच्या नि:पाताची अंमलबजावणी करण्याकरता आइशमनची खास नेमणूक केली होती नि त्यानुसार, आइशमनच्याच शब्दांत सांगायचं, तर साठ लाख ज्यूंची कत्तल करण्यात आली; ज्यू-प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावायचा याचा अर्थ ज्यू-वंशाचं नावच पुसून टाकायचं...हे १९३९ पासूनच ठरविण्यात आलं होतं,' असं स्पष्ट नमूद केलं गेलं आहे. ट्रायब्यूनलनं फक्त वरील मत व्यक्त केलं. यूनोच्या सिक्यू-रिटी कौन्सिलनं त्याचा पुनरुच्चार केला नि यूनोनं ठरविलं, की आइशमननं या गुन्ह्यांचा जाब दिलाच पाहिजे. म्हणून हा खटला योग्य रीतीनंच भरला गेला आहे. इस्रायलशिवाय जगातील इतर कुठल्याही राष्ट्रानं आइशमनविरुद्ध खटला चाल-विण्याची इच्छादेखील व्यक्त केलेली नाही. त्या दृष्टीनं तयारीही चालविलेली नाही. आइशमनच्या वकीलानं सांगितलं, की त्यानं प. जर्मनीच्या शासनाला, त्या शासनानं आइशमनला प. जर्मनीत मागवून घेऊन हा खटला त्या राष्ट्रात चाल-वावा, अशी विनंती करण्यासंबंधी लिहिलं आहे. पण इस्रायल शासनाच्या वतीनं मी जाहीर करतो, की अशी विनंती प. जर्मनीनं इस्रायलला केलेली नाही. या क्षणा-पर्यंत कुठल्याही राष्ट्रानं अशी इच्छा व्यक्त केली नाही. आरोपीच्या म्हणण्याप्रमाणे इस्रायलमधीलच काय पण कोणताही ज्यू न्यायमूर्ती हा खटला चालविण्यास पात्र नाही. कारण ज्यू–संहारामुळे ज्यू न्यायमूर्तींना त्याच्याबद्दल अढी असणार; आपले सगेसोयरे मारले गेले असल्यामुळे, प्रत्येक कुटुंबातील एकतरी व्यक्ती बळी गेली असल्यामुळे, तुम्ही ज्यू न्यायमूर्ती हा खटला चालविण्यास लायक नाही. थोडक्यात, ज्यूएतर किंवा इतर अपक्ष (न्यूट्रल) न्यायमूर्तीकरवीच हा खटला चालविला गेला पाहिजे. पण ही विचारसरणी ग्राह्य मानली तर कोणत्याही हेराला कायदेशीर-रीत्या कोर्टात खेचता येणार नाही. कारण तसा खटला चालवायचा तर 'न्यायमूर्ती शत्रुराष्ट्रातील आहेत,' असा दावा तो करील. तथापि, अशा हेराची सुनावणी करणारे न्यायमूर्ती अपक्षच असले पाहिजेत, अशी विचारसरणी कुणीही मांडलेली नाही. आपल्यावरील खटला न्यायाच्या धारवाडी काट्यावरच चालला पाहिजे, असा हट्ट धरण्याचा हक्क गुन्हेगाराला जरूर आहे. पण म्हणून न्यायमूर्ती अपक्षच असले पाहिजेत, असा बुद्धिशून्य नि दुराग्रही दावा त्याला मांडता येणार नाही. हेच तत्व फौजदारी खटल्यांना लागू आहे. कारण 'आपल्यावरचा खटला प्रामाणिक ज्यूरींपुढे चालविला जात आहे,' अशी तक्रार दरोडेखोराला करताच येणार नाही.

या खटल्यास हेच तत्त्व लागू आहे. पाशवी सामुदायिक मानवी-संहाराच्या गुन्ह्यात, न्यायमूर्तींनो, तुम्ही अपक्ष असलं पाहिजे, असं कुणीही तुम्हाला सांगू शकत नाही. अशा निर्घृण गुन्ह्यात या जगात अपक्ष व्यक्ती असू शकेल असं जर आइशमनच्या वकिलाचं म्हणणं असेल, तर तशी तथाकथित व्यक्ती न्यायमूर्तिपदावर बसायला अपात्र ठरेल. जगात कुठलाही मानव सर्वथैव अपक्ष असूच शकत नाही. व्यक्तिगत किंवा राष्ट्रीय आपत्ती ओढवली असतानाही न्याय्य नि सचोटीच्या स्तरावरून खटला चालविता येतो. कारण खटले चालविले जातात ते व्यक्तिनिष्ठ भूमिकेवरून नव्हे, तर सादर केल्या जाणाऱ्या साऱ्या पुराव्याच्या छाननीतून ! आरोपीविरुद्ध सादर केल्या जाणाऱ्या पुराव्याच्या अनुषंगानेच आपण योग्य तो निर्णय द्यावा, हीच माझी अपेक्षा आहे. आरोपीनं आपल्या बाजूने फार मोठ्या बुद्धिमत्तेचा नि योग्यतेचा वकील इथे उभा केला आहे. आरोपीला हे शक्य व्हावं म्हणून इस्रायलच्या पार्लमेंटनं (Knesset) "Advocates' Ordinance" ही दुरुस्त करवून घेतलं आहे. या वकिलाचा सर्व खर्चही देण्याचं इस्रायलच्या शासनानं मान्य केलं आहे.

व्यूनास आयर्समध्ये मे १९६० मध्ये लिहून दिलेल्या जाहीरनाम्याबद्दल दोन शब्द ! हा जाहीरनामा धाकदपटशा-दमबाजी देऊन आरोपीकडून काढून (Extorted Confession) घेण्यात आला आहे, असा दावा करण्यात आला आहे. या जाहीरनाम्यामुळेच या कोर्टाला हा खटला चालविण्याचा अधिकार प्राप्त होतो, असं मला म्हणायचं नाही. आरोपीच्या केवळ एका सहीमुळे इस्त्रायलच्या कोर्टाला तसा आधिकार प्राप्त होतो, अशी वस्तुस्थिती मुळीच नाही. आइशमनच्या एका सहीला एवढं महत्त्व नि मोल मुळीच नाही. पण त्याच्या वकिलाला इतर गोष्टीसंबंधात त्या जाहीरनाम्याची क्षिती वाटत नाही; तो बेकायदेशीर, निरुपयोगी (Invalid) वाटतो. पण 'आरोपीचा या खटल्याचा सारा खर्च इस्त्रायलनं सोसावा,' अशी इस्त्रायलच्या शासनाला विनंती करताना मात्र (दि. २२ डिसेंबर १९६० चं पत्र) आरोपीच्या याच जाहिरनाम्यावर भर देऊन, त्याचा अधार घेतला जातो, हे आश्चर्यकारक नव्हे काय ? आरोपीच्या या जाहीरनाम्याचा उल्लेखच का केला जावा, हे कळत नाही. दडपशाही करून तो लिहून घेतल्यामुळे तो बेकायदेशीर ठरतो नि आरोपीच्या खर्चासंबंधात मात्र तो आधारभूत ठरतो काय ?

[ उत्तरार्ध पुढील अंकी ]

रशिया-अमेरिका आपल्या गुप्तहेरांकडून एकमेकांबद्दल इतकी प्रचंड माहिती जमवतात की त्यामुळेच या दोन देशात आज शांतता आहे....

# अंतराळातील (गुप्त?) हेर!

विजय वैद्य

अमेरिकेच्या राजधानीत–वॉशिंग्टनमध्ये–एका क्रमांक नसलेल्या इमारतीत हजारो फोटोंवर प्रक्रिया चालली होती. निगेटिव्ह्जवर अशी प्रक्रिया होऊन तयार फोटो मिळत होते. त्याच छायाचित्रांपैकी एका छायाचित्रात रशियाची राजधानी मास्को येथील एका रस्त्यावरून चालत जात असलेल्या रशियन नागरिकाचा फोटो होता. ह्यॅ: ऽ ऽ! त्यात काय विशेष, असे वरकरणी वाटेल. पण त्यात जरूर काहीतरी विशेष होते. खरं म्हणजे छायाचित्रांच्या एका मालिकेतील ते तिसरे छायाचित्र ोते. पहिले छायाचित्र संपूर्ण मास्को शहराचे होते. दुसऱ्या छायाचित्राने मास्कोतील एका रस्त्याचे सारे बारकावे टिपले होते, तर तिसऱ्या व मोठ्या केलेल्या छायाचित्रात 'तो' रशियन नागरीक चालत असलेला दिसत होता. ग्रा सर्व अत्यंत सुस्पष्ट आलेल्या छब्यांचे वैशिष्टय हे होते, की त्या पृथ्वीपासून सुमारे १०० मैलांपेक्षाही अधिक उंचीवरून घेतलेल्या होत्या. मास्को शहरावरून प्रदक्षिणा करणाऱ्या अमेरिकन उपग्रहाने ती छायाचित्रे टिपली होती.

'मिलसॅटस्' म्हणजे मिलिटरी सॅटेलाइटस् (लष्करी उपग्रह) कार्यक्रमानुसार इतर देशांतील लष्करी गुपिते आणण्याकरिता हे अंतराळातील 'जेम्स बाँड' अमेरिका नेहमीच पाठवीत असते. अर्थातच रशियन्सही हेच करीत आहेत.

हे सारे काम अंधारात चालते. कोणत्याही सामान्य अमेरिकन नागरिकाला याबद्दल काहीच माहिती नसते. या उपग्रहांची लांबी, रुंदी, वजन काय, त्यांची किंमत किती होते, त्यासाठी वापरलेले तांत्रिक कौशल्य कोणते, एवढेच नव्हे तर हे उपग्रह अवकाशात केव्हा सोडले जातात, त्यांचे कार्य काय, अगदी कशाचा म्हणजे कशाचाही थांगपत्ता लागू दिला जात नाही.

१९५८ सालापासून आजपर्यंत सुमारे ७०० च्या वर उपग्रह अमेरिकेने अंतराळात भिरकावले. त्यांपैकी जवळजवळ दोन तृतियांश तरी 'लष्करी उपग्रह' होते.

हजारो छायाचित्रतज्ज्ञ, लष्करविषयक तज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ व इतर अशा अनेक विषयांतील निष्णात लोक या कार्यात अत्यंत मग्न असतात.

अहोरात्र हे तज्ज्ञ मिळालेल्या छायाचित्रांचे व माहितीचे पृथक्करण करीत असतात. हे हेर उपग्रह गुप्त संदेशही पाठवीत असतात. त्यांचाही अर्थ लावायचा असतो. अत्यंत महत्त्वाची अशी जी माहिती मिळते ती छाननीसाठी खास तज्ज्ञांकडे पाठविली जाते. अमेरिकेचे संरक्षणखाते या 'मिलसॅटस्' कार्यक्रमासाठी प्रतिवर्षी दोन हजार दशलक्ष डॉलर्सपेक्षाही अधिक खर्च करते. लष्करी अंतराळशास्त्र य नावाखाली ही रक्कम गुपचुप ठेवली जाते. याशिवाय सी. आय. ए. (सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी–अमेरिकेचे गुप्तहेर खाते) व तत्सम इतर गुप्तहेर शाखा (या सर्व शाखांचे अंदाजपत्रक कधीच उघड केले जात नाही.) अमाप पैसा खर्च करून मिळालेल्या माहितीचा योग्य तो अर्थ लावत असतात. हेही अत्यंत जिकिरीचे काम असते. याचा अर्थ 'मिलसॅटस्' कार्यक्रमावर ४० हजार दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक खर्च केला जातो. यावरूनच कार्यक्रमाची महती लक्षात येईल.

अमेरिकेतील कोणते उद्योगव्यवसाय पेंटॅगॉनसाठी (अमेरिकन संरक्षण खाते) या उपग्रहांना लागणारी सामग्री बनवतात, हे नेहमीच अचूकपणे सांगता येणे शक्य नसते. पण एवढे मात्र खास, की लॉकहीड (रॉकेटला उड्डाणासाठी प्रचंड शक्ती पुरवणारी यंत्रे बनवणारा कारखाना) आर. सी. ए., सी. बी. एस. लॅबोरॅटरीज्, आयटेक, हायकॉन, फिलकोफोर्ड, टी. आर. डब्ल्यू., जनरल इलेक्ट्रिक अॅण्ड एरोजेट–जनरल. आदी कंपन्या पेंटॅगॉनला साहाय्य देतात. नॉर्थरोपसारख्या कंपन्या उपग्रहातून पृथ्वीवर फेकली जाणारी (ज्यात माहिती असते) नळकांडी व ती अलगद उतरवणाऱ्या हवाई छत्र्या व इतर सामग्री बनवितात. लॉकहीड सर्वांत अधिक महत्त्वाची कामगिरी बजावते.

'आमच्या शत्रूकडे किती अण्वस्त्रें आहेत याची मला अचूक माहिती आहे' असे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन्सन एकदा म्हणाले होते. त्यांना ही जी 'अचूक माहिती' मिळू शकली, त्याचे गमक 'मिलसॅटस्' कार्यक्रमातच आहे.

या कार्यक्रमानुसार अमेरिकेला एस. एस. ९ या रशियन अस्त्रांबद्दल किंवा चिनी अण्वस्त्रांच्या प्रगतीबद्दलच माहिती मिळते असे नाही तर चीनमध्ये किती दशलक्ष टनांचे तांदळाचे उत्पादन होईल किंवा कडाक्याच्या हिवाळ्यामुळे रशियन गव्हावर दुष्काळाचे सावट पडेल का, अशा एक ना दोन असंख्य गोष्टींबद्दल अचूक माहिती मिळते. रशिया-अमेरिका आपापल्या हेर उपग्रहांद्वारे एकमेकांबद्दलची इतकी प्रचंड माहिती मिळवितात, की अनेक तज्ज्ञांच्या मते या कारणामुळेच या दोन देशांत व पर्यायाने जगात शांतता नांदू शकते. एका बड्या अमेरिकन तज्ज्ञाने तर चक्कच म्हटले, की यामुळे या दोन देशांतील अण्वस्त्रस्पर्धा व अण्वस्त्र युद्धाला आळा बसला आहे.

हेर उपग्रहांकडून मिळालेली माहिती इतकी अचूक असते, की रशिया व अमेरिकेचे सत्ताधीश या माहितीवर निर्धास्तपणे विसंबून राहू शकतात. याचे एक गमतीदार उदाहरण आहे.

एक दोन वर्षांपूर्वी जिनिव्हा येथील शस्त्रकपात परिषदेत या दोन बड्या राष्ट्रांत बोलणी चालली होती. शस्त्रकपातीला दोन्ही देशांनी तशी तत्त्वत: मान्यता दिली होती. पण करार करूनही गुप्तपणे अण्वस्त्रे तयार होणारच नाहीत याची काय हमी? म्हणूनच परिषदेपूर्वी अमेरिकेने एक मागणी केली. अमेरिकन तज्ज्ञांना रशियात जाऊन खरोखरीच अण्वस्त्रे होत नाहीत याची पहाणी करण्याची मुभा मिळावी अशी ही मागणी होती. नंतर मात्र अमेरिकेने ही मागणी सोडून देऊन 'आंतरराष्ट्रीय अणुशक्ती मंडळा'च्या तटस्थ राष्ट्रांच्या सदस्यांनी रशियन अणुभट्ट्यांना भेटी देऊन तयार केलेल्या अहवालावर समाधान मानायला आपण तयार आहोत असे स्पष्टीकरण केले. हे करीत असताना आपण असे का करतो याचे खोलवर जाऊन अमेरिकेने जरी स्पष्टीकरण केले नसले, तरी ती गोष्ट अगदी उघड होती.

अमेरिकन अंतराळ हेरांचा डोळा सोव्हिएत युनियनवर होताच की! रशियन भूमीवरून सुमारे शभर मैलापेक्षाही अधिक उंचीवरून प्रदक्षिणा करणारे ह हेर अण्वस्त्र तयार करणाऱ्या अणुशक्ती भट्ट्यांच्या जागांजवळून वहाणाऱ्या नद्यांच्या तपमानात किती वाढ झाली आहे याची पूर्ण माहिती मिळवू शकत होते. यावरूनच प्रत्यक्ष अणुभट्ट्यांत किती किरणोत्सर्ग निर्माण झाले आहे, याचा बिनचूक अंदाज बांधता येत असे. यावरूनच तेथील प्रगतीची कल्पना येत असे.

पण वरील गोष्ट स्पष्ट करण्याची जरुरीच नव्हती. कारण रशियालाही हे सारे माहीत आहे, एवढेच नव्हे तर त्यांचेही अंतराळ हेर हेच काम अमेरिकन भूमीवर करीत असतात.

मग हे हेर त्यांच्यादृष्टीने गुप्त हेर ते कसले! तसे ते नाहीतही व आहेतही. हे हे त्याचे उत्तर आहे. दोन्ही राष्ट्रे याबाबत अत्यंत कडक गुप्तता पाळून असतात. सुमारे दशकापूर्वी 'सॅमोस' (सॅटेलाइट ॲण्ड मिझाइल ऑब्झर्वेशन सिस्टम) किंवा 'मिडास' (मिझाइल डिफेन्स अलार्म सिस्टम) अशी नावे तरी या कार्यक्रमांना होती, पण आता तीसुद्धा गेली आहेत. या नावांऐवजी ज्यांनात्यांना क्रमांक देण्यात आले आहेत. सॅमोसचे वजन २६०० पौंड असे. आताच्या 'मिलसॅटस्'चे वजन सुमारे ८ हजार पौंड आहे. रॉकेटचा सर्वांत वरचा भाग असलेल्या 'अजेना डी' यातून हे मिलसॅटस् अवकाशात फेकले जातात. या 'अजेना डी' चा व्यास पाच फूट तर उंची ३५ ते ४० फूट असते. तेव्हा उंची व वजनात वाढ झाल्यामुळे त्यांच्या कार्यशक्तीचा पल्ला किती प्रचंड प्रमाणात वाढला असेल याचा अंदाजच केलेला बरा.

काही महत्त्वाचे 'मिलसॅटस्' पुढीलप्रमाणे आहेत. अर्ली वॉर्निंग सॅटेलाइट–

(याचा क्रमांक अज्ञात आहे.) या 'मिलसॅट'मध्ये इन्फारेड किरणे असलेली यंत्र-सामुग्री बसवलेली असते. पृथ्वीपासून दोन हजार मैलांवरून हा उपग्रह फिरत रहातो.

तिसरे महायुद्ध सुरू होण्याची शक्यता निर्माण झाल्यास क्षणार्धात त्यासंबंधी माहिती पाठविण्यासाठी याचा उपयोग ठरला आहे. अशावेळी रशियन पाणबुड्यांनी सोडलेल्या अण्वस्त्रांवर पहारा करणे आणि 'फ्रॅक्शनल ऑरबिट बंम्बार्डमेंट सिस्टम' या प्रकारची अस्त्रे व आंतरखंडीय क्षेपणास्त्र यावर बारीक लक्ष ठेवणे हे महत्त्वाचे काम या हेराकडे आहे.

अतिशय शक्तिशाली रडार यंत्रणा असलेले ७७० क्रमांकाचे हेर उपग्रह, असंख्य ढगांनी मैलोंगणीत जाडीचे थर निर्माण केले असले तरीसुद्धा अगदी सूक्ष्म बार-काव्यांसह पृथ्वीवरील छायाचित्रे सुस्पष्टपणे टिपू शकतात.

फेरेट (यांचाही क्रमांक अज्ञात आहे) हे उपग्रह 'इलिमां'च्या (म्हणजे इलेक्ट्रॉनिक इंटेलिजन्सच्या) कामगिरीवर असतात. त्यांच्याबद्दल असं म्हणतात, की साध्या टेलिफोनवर चाललेले संभाषण पृथ्वीपासून १०० मैल उंचीवरही अत्यंत स्पष्टपणे टिपून घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे. कदाचित ही थोडीफार अति-शयोक्ती असू शकेल, पण सोव्हिएत व चिनी नाविक व विमान दलांचे रेडियो-संदेश बदलत्या ध्वनिलहरींवरही पकडून अमेरिकन तळांकडे पाठविणे हे त्यांचे काम.

उपग्रह क्रमांक ८२३. याचे पूर्वीचे नाव 'वेला' असे होते. अण्वस्त्रचाचणींचा वेध घेण्याचे काम त्यांच्याकडे सोपवलेले आहे. त्यांच्यात अल्ट्रा-व्हायोलेट व क्ष किरणांची यंत्रसामग्री बसवलेली असते. अणुशक्तिकेंद्रे व भट्ट्या यांतून तयार झालेली उष्णता व किरणोत्सर्ग यावर टिपले जातात. या उपग्रहांपैकी काही पृथ्वी-पासून ७० हजार मैलांवर फिरत असतात. मतलब? यदाकदाचित चंद्राच्या पलीकडल्या भागात रशिया अण्वस्त्रचाचणी करण्याचा प्रयत्न करणार असेल तर ती चाचणीही नजरेतून सुटू नये.

९२० अ क्रमांकाच्या हेर उपग्रहात अत्याधुनिक कॅमेरे बसविलेले असतात त्यांची क्षमता इतकी दांडगी आहे, की पृथ्वीच्या कोणत्याही भागातून पळणारी कोणतीही मोटार कोणत्या कारखान्यात (फोर्ड, शोव्हरलेट, मर्सडिज बेंझ वगैरे वगैरे) तयारी झाली असावी, हे स्पष्टपणे छायाचित्रित करता येते. याद्वारा अव-काशातून वर्तमानपत्रही वाचता येईल असे एका शास्त्रज्ञाने म्हटले आहे.

६८ सालच्या ऑगस्टमध्ये रशियाने चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले होते. तेव्हा ९२० अ या हेर उपग्रहांनी रुमानियातून कवायती करीत जाणाऱ्या रशियन

सैन्याच्या पलटणींच्या हालचाली टिपल्या. त्यांची युनिट्स वा रेजिमेंटस् कोणती होती हे ओळखण्याइतपत ही छायाचित्रे चांगली आली होती.

त्यातील अत्याधुनिक यंत्रसामग्रीबद्दल आणखी एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे कोणत्या कारखान्याची उत्पादनक्षमता किती आहे किंवा शत्रूच्या लक्षात येऊ नये म्हणून काळ्या रंगाने रंगविलेल्या लष्करी काफिल्यातील गाड्या अगदी गडद अंधाऱ्या रात्रीही टिपून घेण्याची खास व्यवस्था व फिल्मस त्यात असतात. हा एक सर्वात महत्वाचा उपग्रह आहे.


हवामान-उपग्रह — अणुयुद्ध झालेच तर रशिया व चीनचा कोणता महत्त्वाचा भाग अण्वस्त्रांच्या टप्प्यात यावा याबरोबरच सोव्हिएत युनियन व चीनवरील हवामान कसे असेल, त्यादृष्टीने अमेरिकेने कोणता उपग्रह केव्हा सोडावा, तसेच आधीच अवकाशात फिरत असलेल्या उपग्रहांतील कॅमेरे केव्हा सुरू व्हावेत व केव्हा बंद केले जावेत यासंबंधी महत्त्वाची माहिती हे उपग्रह पाठवतात.

लॉस एंजलीसपासून वायव्येला सुमारे १५० मैलांवरील वेडेनबर्ग हवाई तळांवरून हे उपग्रह सोडले जातात.

अमेरिकी हेर उपग्रह सुमारे ७ दिवसांपासून ते २५ दिवसांपर्यंत भ्रमण करीत असतात. गुएम, हवाई, अलास्का न्यू हॅम्पशायर आदी ठिकाणी माहिती घेणारी केंद्रे असावीत असा अंदाज आहे. माहिती गोळा करून काही उपग्रहांची कॅपसूल्स पृथ्वीवर परत येतात. ती हवाईबेटाजवळ १० हजार फूट उंचीवरच हवाई दलाची खास विमाने हवेतच पकडतात.

रशियन हेर उपग्रह साधारणपणे आठ दिवस अवकाशात असतात आणि ते सुमारे १० हजार पौंड वजनाचे असतात.

वरीलपेक्षा अधिक सामर्थ्यशाली हेर उपग्रह तयार करण्याचे दोन्हीही राष्ट्रे अत्यंत कसून प्रयत्न करीत आहेत.



पुष्पा भावे



# असाही एक अश्वत्थामा

## कोसळलेला

मुंबई मराठी साहित्यसंघाच्या नाट्यशाखेने रविवार दि. २६ मार्च रोजी श्री. खानोलकरांच्या 'असाही एक अश्वत्थामा' या नाटकाचा पहिला प्रयोग सादर केला. या नाटकाचे दिग्दर्शन श्री. रमेश चौधरी यांनी केले होते. नुकत्याच झालेल्या राज्य नाट्यस्पर्धेत श्री. चौधरींनी दिग्दर्शित केलेल्या 'पाचोळा जळत नाहीए' (लेखक : शं. ना. नवरे) या नाटकातील नटसंचच याही नाटकात होता. 'पाचोळा जळत नाहीए' या नाटकाची सुखद स्मृती मनात असल्यामुळे या नव्या नाटकाला जाताना मनात विशेष अपेक्षा होत्या. अर्थात 'कालाय तस्मै नमः'चे लेखक श्री. खानोलकर हेच या नव्या नाटकाचे लेखक आहेत हे माहीत असल्यामुळे मनात शंकाही होत्याच. 'असाही एक अश्वत्थामा' या शीर्षकामुळे व या नाटकाच्या जाहिरातीतील अपंग माणसाच्या चित्रामुळे या नाटकाविषयी काही अपेक्षाही निर्माण झाल्या होत्या.

परंतु प्रत्यक्षात नाटक पहाताना पहिल्या अंकातच नाट्यलेखनाचा कमकुवतपणा स्पष्ट झाला. मराठी नाटकात व चित्रपटांत, हिंदी चित्रपटात वारंवार येणारे विवाहपूर्व संबंधापासून झालेल्या अपत्याचे नाट्य, मनू या मानीव मुलीवरील रमाकांतच्या निर्मळ प्रेमाचे कथानक, रमाकांतने लिहिलेल्या चरित्रातून निर्माण झालेले वादळ, सातपुते व पोपटकर या दोन क्रांतिकारकांतील–दोन जीवनमार्गींतील–संघर्ष, विजया आणि रमाकांत या पती-पत्नीच्या नात्याचे गुंतागुंतीचे कथानक–एवढी सारी कथानके–उपकथानके तीन अंकांच्या रचनेत बसविण्याचा यत्न श्री. खानोलकरांनी केला आहे. परिणामी त्यातील एकाही कथा-वस्तूला ते पुरेसा न्याय देऊ शकले नाहीत; आणि विविध कथासूत्रांचा संबंध जोडण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न अत्यंत कृत्रिम झाले आहेत. या विविध उपकथा-नकांच्या गर्दीने जड झालेल्या नाटकाशी त्यातील काव्य संपूर्णतः विसंगत वाटते,

आणि म्हणून नाटकाच्या कृत्रिमतेत भर घालते. वस्तुत: श्री. खानोलकरांच्या विलक्षण कल्पकतेला विजयाचा कृत्रिम वांझपणा, त्यायोगे प्रियकराशी एकनिष्ठ राहण्याचा यत्न, त्यामुळे रमाकांत व विजयात निर्माण झालेले ताण, ही नाट्यक्षम कथावस्तु सुचली होती. अथवा क्रांतीवीर पोपटकरांच्या व्यक्तिरेखेला प्राधान्य देऊन तेजोवलयाबाहेर फेकल्या गेलेल्या महान व्यक्तीही कशा क्षुद्र होतात, हे दाखवत शीर्षकानुकूल नाटक उभे करणे शक्य होते. परंतु प्रत्यक्षात नाटककाराने जे नाटक उभे केले आहे. त्याला नाट्यक्षमताच नाही. त्याचे स्वरूप बरेचसे कादंबरीसारखे आहे. या पार्श्वभूमीवर रमाकांताच्या तोंडी आलेल 'माझ्या चरित्रातील ही सारी पात्रे जिवंत होऊन...' या अर्थाचे ('नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या नाटकाचे स्मरण करून देणारे) जे वाक्य येते ते अर्थहीन वाटते. कारण या नाटकाचे स्वरूप भडक भावविवश असे आहे.

श्री. रमेश चौधरी या दिग्दर्शकाने हे नाटक कसे निवडले याचेच आश्चर्य वाटले. कारण या दिग्दर्शकाने गेली अनेक वर्षे दृश्यमाध्यमाच्या दृष्टीने लक्षणीय अशा नाट्यकृती सातत्याने निवडल्या होत्या. त्यांनी तयार केलेल्या नटसंचामध्ये श्री. रवींद्र दिवेकरांसारखे गुणी नटही आहेत. दिग्दर्शक व नट म्हणून श्री. चौधरी यांनी आणि रमाकांतची अवघड भूमिका सादर करताना श्री. दिवेकर यांनी श्रम घेतले होते.

परंतु नाटकच इतके लंगडे, की सर्व नटांनी आणि साहाय्यक तंत्रज्ञांनी श्रम घेऊनही नाटक कोसळलेच.

श्री. खानोलकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाबद्दल पूर्ण आदर बाळगूनही त्यांना अशी सूचना करावीशी वाटते, की त्यांनी जरा थांबून पुन्हा एकदा नाटक या माध्यमाचा विचार करावा. केवळ सुंदर वाक्ये, विचित्र कल्पना, अनोखी व्यक्तिरेखा एकत्र करून, त्याच्या मोहात गुंतून नाट्यधर्मी एकसंध कलाकृती निर्माण होत नाही. या वरवरच्या तपशीलांच्या, काही वेळा चमत्कारांच्या, मोहात गुंतून श्री. खानोलकर स्वत:वर आणि सुचलेल्या कथावस्तूंवर अन्याय करीत आहेत. आज मराठी रंगमंचावर नाट्यकलेविषयी निष्ठा बाळगणारे तरुण कलावंत इतके आहेत आणि प्रयोगसंख्येवर नजर न ठेवता इमानाने लिहिणारे नाटककार इतके अल्प आहेत, की श्री. खानोलकरांसारख्या नाटककारावर फार मोठी जबाबदारी आहे. या जबाबदारीचे स्मरण ते ठेवतील काय ?

शरद गोखले



# पिंजरा

## समाधानकारक

फारा दिवसांनी आलेला शांतारामबापूंचा मराठी चित्रपट पिंजरा, आणि 'सोंगाड्या'च्या यशाची झूल अंगावर असतानाच शाहीर दादा कोंडके यांनी तयार केलेला एकटा जीव पुणेकर रसिकांपुढे एकाच वेळी रुजू झाले. त्यात सुट्टीचा मोसम आणि लग्नसराईची धामधुम चालू असल्याने दोन्ही चित्रपटांचे किमान यश आपेक्षित आहेच. तथापि दोन्ही चित्रपटांची तुलना करायची झाल्यास शांताराम-बापूंचा चित्रपट अधिक सरस आहे. कथाप्रधान चित्रपटाला तमाशाची लावलेली मजबूत झालर शांतारामबापूंच्या पदरामध्ये फारा दिवसांनी मोठे यश टाकून जाईल.

गुणवंतवाडी नावाचं छोटं गाव. त्या गावात श्रीधरपंत नावाचा ध्येयवादी शिक्षक असतो. तन, मन, धन, वेचून श्रीधरपंत गावाची सेवा करत असतो. त्याच्या सेवावृत्तीची गावच्या पाटलाला कदर असल्याने पंतांच्या कष्टांचे आस्ते आस्ते चीज होते. स्वच्छता, प्रौढ शिक्षण, नशाबंदी, आदी सर्व आघाड्यांवर गावाची यशस्वी वाटचाल सुरू रहाते. 'आदर्शगाव' म्हणून शासनामार्फत गावाचा गौरव होतो. तमाशा गावाची नासाडी करेल, अशी धास्ती असल्याने श्रीधरपंत गावामध्ये तमाशा येऊ देत नाहीत. गावाचा लौकिक ऐकून आलेल्या चंद्रकला तमासगिरणी-वर गावाबाहेर माळावर तमाशाच्या पाली लावण्याची वेळ येते. गुरुजी श्रीधरपंत माळावरूनही या माणसांना हुसकून लावतात. तमासगिर मंडळी आपला मुक्काम नदीच्या पलीकडच्या तीरावर टाकतात. प्रौढशिक्षणासाठी येणारी मंडळी शिक्षणा-पेक्षा तमाशात रस घेऊ लागतात. आणि अखेरीस स्वतः गुरुजी नदी पार करून येतात. बाईच्या मुलाखतीची पहिली फेरी झडते. पहिल्या फेरीमध्ये दुसरीची, दुसरीमध्ये तिसरीची बीजे पेरलेली असतात. कळत न कळत गुरुजी बाईकडे ओढले जातात. आणि सूडाच्या भावनेने पेटलेली बाई गुरुजींवर जीव लावून बसते. गावापासून रहस्य लपून असले, तरी पाटलाच्या अडदांड मुलाला खरी गोष्ट समजते. आपले व चंद्रकलेचे संबंध गुरुजी कबूल करत नाहीत म्हणून बाजीराव पाटील संतापतो. करून सवरून सोवळ्याचं सोंग घेतलेल्या गुरुजीचा त्याला संताप येतो. आणि रात्री गुरुजींचा खून करण्यासाठी तो गुरुजींच्या घरी जातो. घरामध्ये गुरुजी आणि

चंदकला दोघेही असतात. काय करावं या भांबावलेल्या अवस्थेत असतानाच, आपल्या बायकोवर बाजीरावने हात टाकला म्हणून संतापलेला गवळी पाटलाचा खून करण्यासाठी नेमका तेथे येतो. आणि पाटलाचा खून करून दगडाने त्याचे डोके चेचून निघून जातो. चंद्रकलेच्या सल्ल्याप्रमाणे गुरुजी मेलेल्या पाटलाला स्वतःचा वेष चढवतात. आणि चंद्रकलेचा हात धरून निघून जातात. नाव गाव नसलेलं अनामिक किळसवाणं आयुष्य त्यांच्या वाट्याला येतं. आणि अखेरीस स्वतःच्या खुनाचे गुन्हेगार म्हणून हातात बेड्या पडल्यावर, आपण मेलो नसल्याचे सांगून जीव वाचवायचा, का गुरुजींची उज्वल प्रतिमा कायम ठेवण्यासाठी बलिदान करायचे असा प्रश्न निर्माण झाल्यावर गुरुजी बलिदानाचा मार्ग पत्करतात. सर्व वस्तुस्थिती माहिती असलेली चंद्रकला या धसक्याने मरण पावते. ओळीने तीन-चार गचाळ चित्रपट काढल्यावर शांतारामबापूंनी एक समाधानकारक चित्रपट प्रेक्षकांना दिला आहे. काहीशा भडक कथेतील अनेक बारकावे त्यांनी मोठ्या खुबीने चित्रपट-भर पेरलेले आहेत. कथेचा मुख्य धागाही त्यांनी सातत्याने संभाळला आहे. स्त्री-स्पर्शाने शहारलेले गुरुजी, प्रथमच दारू पिणारे गुरुजी, प्रथमच मिश्री लावणारे गुरुजी, त्यांनी फ्रीझ-फेम तंत्राने प्रेक्षकांच्या मनावर बिंबवले आहेत. चंद्रकलेकडे गुरुजींनी ओढले जाण्याचा भागही त्यांनी छान घेतला आहे. तमासगिरीच्या कंपूतील एक तमासगीर (निळू फुले) आपली व्यथा गुरुजींना ऐकवतो. तो भाग फार छान जमून आला आहे. शांतारामबापूंनी चित्र छान घेतले आहे. चंद्रकलेच्या पोपटाच्या पिंजऱ्याचा प्रतिकात्मक वापर 'अति झालं आणि हसू झालं' अशा थाटाचा आहे. गुरुजींच्या कपाळातील जखमेतून पडलेला रक्ताचा थेंब चंद्रकलेच्या कपाळी पडणेही असेच कृत्रिम असले, तरी शांतारामबापूंच्या चित्रीकरण पद्धतीशी सुसंगत आहे. चित्रपटामध्ये तमाशाला भरपूर प्राधान्य असले तरी कथेचा तोल संभाळण्याचे


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

कौशल्य राखले गेल्याने चित्रपटाची रंजकता वाढूनही चित्रपट अकारण विषय सोडून भरकटतो आहे असे वाटत नाही.

'रंगीत चित्र' हे अजूनही मराठी चित्रपटांच्या बाबतीत वैशिष्टच आहे. शांतारामबापूंनी मार्केट नसलेल्या फुजी कलरमध्ये चित्रपट काढून छायाचित्रण, आणि लॅब-प्रोसेसिंग, या दोन्ही बाबतीत समाधानकारक दर्जा संभाळला आहे.

'पिंजरा'साठी शांतारामबापूंनी कलाकार तंत्रज्ञांची टीमही छान जमवली असून प्रत्येकाने आपला वाटा उचलल्याने चित्रपटाला एक गोटीबंद आकार आला आहे. चंद्रकलेच्या भूमिकेसाठी संध्याची निवड योग्य वाटते. नृत्यातील तिच्या कौशल्याचा या भूमिकेसाठी तर उपयोग झाला आहेच. अस्सल तमासगिरणीचे हे रुप संध्याने जीव ओतून उभे केले आहे. पडद्याच्या माध्यमाबाबत अनभिज्ञ असलेले डॉ. श्रीराम लागू श्रीधरपंत गुरुजींची भूमिका इतकी छान करतात, की या भूमिकेसाठी दुसऱ्या कलाकाराचे नाव सुचवा; असे म्हटले, तर चटकन दुसरे नाव डोळ्यांसमोर येत नाही. संयमित अभिनय, धारदार आवाजातील अचूक संवादफेक ही त्यांची वैशिष्टचे येथेही कायम आहेत. निळू फुले तमासगीराची एक छोटी भूमिका झकास करून जातो. माणिकराज (बाजीराव पाटील) सरला येवळेकर गवळ्याची बायको. गोविंद कुलकर्णी (मोठे पाटील) आणि वत्सला देशमुख (अक्का) हे अन्य कलाकार छोटचा भूमिकेमध्ये आपले अस्तित्व जाणऊन देतात.

शंकर पाटील यांचे साधे सुरेख संवाद, कित्येक जागी प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद घेऊन जातात. जगदीश खेबूडकर यांच्या गीतांवर राम कदम यांनी सुंदर साज चढवला आहे. 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल, नका सोडून जाऊ रंगमहाल' हे गीत चांगलेच गाजेल. सुधीर फडके यांनी गायलेले 'दहा दिशांनी दहा मुखांनी आज फोडला टाहो'— हे अखेरचे गीतही परिणामकारक चालीत गुंफले गेले आहे. अन्य सर्वच गीतांच्या चाली गोड आहेत.

पुण्यामध्ये आणि पश्चिम महाराष्ट्रात चित्रपट चांगलाच चालेल, आणि या चालत्या यशामध्ये शांतारामबापूंच्या नावाखेरीज राम कदम आणि श्रीराम लागू यांचा वाटाही मोठा असेल, हे नमूद केलेच पाहिजे.



 पृष्ठ १३ वरून

भोपळ्याचे ! अस्थिरता व अपेक्षाभंग यामुळे विरोधक पुरते बदनाम झाले.

चाणाक्ष इंदिरा गांधींनी हे ओळखले होतेच. आक्रमक प्रचारयंत्रणा उभारून आपली प्रतिमा त्यांनी उभी केली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीय-करण करणे वगैरे गोष्टी करून आपण समाजवादी आहोत हे त्यांनी सिद्ध केले. प्रचंड साधनसामर्थ्य व अतिशय आकर्षक नि आक्रमक व्यक्तिमत्व असलेल्या या स्त्रीपुढे विरोधकांनी नेहमीसारखाच मूर्खपणा केला. विरोधक नेमके यावेळी कमी पडले. त्यांची आपसातील भांडणे चालूच होती. जनतेने त्यांना जी संधी दिली होती ती प्रतिक्रियात्मक होती. जनता विरोधी पक्षांकडून फार वेगळे, काहीतरी भव्य दिव्य अपेक्षित होती. अशी अपेक्षा धरणे चूक असते पण या अपेक्षा विरोधक पूर्ण करू शकले नाहीत. तेव्हा यांच्यापेक्षा जुनी काँग्रेसच बरी. त्यातून इंदिरा गांधींचे तेजस्वी नेतृत्व तिला आहे असा मतदारांनी विचार केला.

## काम कमी, प्रचार जास्त

विरोधी पक्षातील काही व्यक्तींनी चांगली कामे केली. जनसंघाचे विजयकुमार मलहोत्रा, डॉ. बलदेव प्रकाश; समाजवाद्यांचे कर्पुरी ठाकूर, रामानंद तिवारी; स्वतंत्रांचे सिहदेव यांनी प्रशंसनीय काम केले. परंतु त्यांचा तेवढासा प्रभाव पडला नाही ! कारण जबाबदार विरोधी पक्षाची प्रतिमा निर्माण झाली नाही. सत्तेवर यायचे, तर सत्ताधाऱ्यांच्या दुप्पट काम विरोधकांना करावे लागते. विरोधक पाच वर्षे झोपी जातात. मधल्या कालात जनआंदोलन उभारणे, जनतेत जागृती करणे, आश्वासनपूर्तीसाठी जनतेचा सत्तारूढ पक्षावर दबाव आणणे या गोष्टी त्यांनी केल्या नाहीत. नुसत्या विधानसभेतील ओरडीने काही होत नसते हे मसानी, मधोक, सोंधी, हेम बारूआ, लिमये यांच्या पराभवाने सिद्ध झाले आहे. कृष्णराव धुळुप उद्धवराव पाटील, बापूसाहेब काळदाते ही त्यांची प्रांतीय आवृत्ती !

आक्रमक प्रचारयंत्रणा व योजना हे एक काँग्रेसचे वैशिष्ट आहे. त्यातल्या त्यात उत्तरेतील काँग्रेसवाले सर्वच बाबतीत आदर्श विरोधी पक्ष आहेत ! परंपराप्राप्त प्रचंड संघटना व गतिमान नेतृत्व यामुळे हा पक्ष शक्तिशाली राहिला. पराजयातून पुन्हा विजयाकडे येऊ शकला. वेड्या व भोळ्या आत्मविश्वासाने विरोधकांचा घात केला.

विकसनशील देशातील जनता सर्वच बाबतीत अपरिपक्व असते. कारण सेक्यु-लॅरिझम, लोकशाही, समाजवाद या पाश्चात्य कल्पना अजून तिला नव्या आहेत. पण तिच्या आकांक्षा मोठ्या असतात. म्हणूनच समाजवाद हा तिचा मूलमंत्र बनला आहे. गरीब राष्ट्रे 'डावी' असतात कारण भांडवलशाहीनिहित उच्च-

नीचता त्यांना परवडत नाही व मंजूरही नसते. अशावेळी स्वतःला उजवे म्हणवून घेणारे टिकत नाहीत हे स्वतंत्रांच्या दारुण पराभवाने सिद्ध केले आहे. जनसंघाने यापासून बोध घेतला पाहिजे.

भारतात जो पक्ष ४५ टक्के मते मिळवतो तोच सत्तारूढ होत असतो. भारतातील निवडणुकींचे शास्त्र फार चमत्कारिक आहे. अपक्ष प्रादेशिक पक्ष आणि सहा सात राष्ट्रीय पक्ष निवडणुका लढवितात. त्यानां ५६ टक्के मते जरी पडली, तरी मतांच्या विभागणीमुळे त्यांना २० ते २५ टक्केच जागा मिळतात. सर्व विरोधी पक्षांनी सरळ लढतीचे तंत्र स्वीकारले तर ५६ टक्के मते आपल्यालाच मिळतील असा भ्रम करून घेतला. पण 'बालेकिल्ल्या'प्रमाणे हाही एक भ्रम आहे. काँग्रेसविरोधात ५६ टक्के मते गेली असतील पण त्याविरोधी 'सरळ' लढतीत उतरलेल्या पक्षाचे स्वतःचे असे मतदान २५-३० टक्केच असते. उरलेल्या मतांना काँग्रेसविरोधी घाट देण्याचे काम विरोधी पक्षांना करायचे असते. १९६७ साली काँग्रेसविरोधाची भावना प्रबळ होती म्हणून सरळ लढतीत विरोधक निवडून आले. पण १९७२ साली इंदिरावेव्ह शक्तिशाली होती. मतदार मुकी मेंढरे नसतात. पण राजकीय पक्ष तसं समजतात. इतरांपेक्षा प्रचंड साधनसामर्थ्य, जास्त पैसा, मतदारांपुढे पोचण्याची प्रक्षाच्या संघटनेची ताकद आणि पक्षाने निर्माण केलेला 'टेम्पो' यावर इंदिरावाद्यांनी प. बंगालमधील सरळ लढती जिंकल्या !

बड्या आघाडीचा प्रचंड पराभव झाला. कारण इंदिरा गांधी व त्यांच्या कम्युनिस्ट साथीदारांनी तिच्यावर प्रचंड हल्ला केला. त्याला उत्तर देण्याची जबाबदारी एकाही विरोधी पक्षनेत्याने घेतली नाही. समाजवादी आघाडीत गेले, पण आपण एक पाप करीत आहो, असे समजून ! ही लवचिक व दिशा चुकलेली आघाडी फक्त २५ टक्के मतेच गोळा करू शकली ! १९६७ साली स्वतंत्र, संसोपा व जनसंघ यांनी इतकी मतें मिळविली होती !

१९७२ साली काँग्रेसचा विजय ही एक अपरिहार्यता होती कारण १९७१ साली पक्षानें प्रचंड विजय मिळविला होता. डिसेंबरच्या लढाईत पक्षाची व पक्षनेत्याची प्रतिमा उजळून निघाली. पाकिस्तानचा पराभव झाला. आणि त्या पार्श्वभूमीवर निवडणुका होऊन विरोधी पक्षांचे पानिपत झाले ! विरोधकांनी जोमाने निवडणुका लढविल्या. गोवा व मणीपूर येथे त्यांना यशपण मिळाले. पण राजस्थान, मध्यप्रदेश व प. बंगाल १९५२ पासून विरोधकाचे बालेलिल्ले होते ते उध्वस्त झाले. एवढा जबर पराभव होईल असे विरोधकांना – विशेषतः दिल्ली, मध्यप्रदेशातील जनसंघीयांना व प. बंगाल-त्रिपुरातील कम्युनिस्टांना—वाटले नव्हते. पण काँग्रेसला १९५२ पासूनच्या निवडणुकीत कधी मिळाल्या नाहीत इतक्या जागा आणि मते मिळाली. पाच सहा राज्यांत तर पक्षाने ५० पेक्षाही जास्त मते मिळवली आहेत.

एकपक्षीय राजवट हा लोकशाहीचा अपमान आहे. कारण तिचे जगणे-मरणे

त्या पक्षातील नेत्यांवर अवलंबून असते. विरोधी पक्षांना नेमकं काय करायचं ते न समजल्यामुळे हा घोटाळा झाला. त्यांनी फक्त भाषणे केली. पण केवळ भाषणांनी जनता भुलत नाही, हे डॉ. काळदाते यांच्या पराभवाने सिद्ध झाले आहे. विरोधी पक्ष जनतेपुढे फक्त निवडणुकीपुरते जातात. निवडणूक संपली, की हे पक्षही संपले. मोर्चे निघतात दिल्लीत आणि मुंबईत. बाकी सर्व आघाडीवर सामसूम ! विरोधी पक्षांची अवस्था पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्यांसारखी आहे !

## कठीण भविष्यकाळ

भारतात पर्यायी पक्ष निर्माण होऊ शकेल काय ? अजून १०–१५ वर्षे तरी ही शक्यता दिसत नाही. १९६७ नंतर जनसंघ काँग्रेसला पर्याय देऊ शकेल असे काही जणांना वाटत होते. पण हिंदी भाषी प्रदेश हेच जनसंघाच्या सामर्थ्याचे मर्म होते व मर्यादा होती. इंदिरा गांधी त्याच प्रदेशातील. इंदिरालाट सुरू झाली आणि जनसंघाचा दिल्लीतच धुव्वा उडाला ! संघटना काँग्रेसचे सामर्थ्य जनसंघापेक्षाही मोठे, कारण तीन प्रांतांत त्या पक्षाचे सरकार होते, पण नकारार्थी कार्यक्रमामुळें त्या पक्षाचे फार नुकसान झाले. पक्ष पराभूत ठरला. आता पक्ष म्हणूनसुद्धा जगू शकणार नाही, इतके त्या पक्षाचे जबर नुकसार झाले आहे. समाजवादी पुरते मोडीत निघाले आहेत. भांडणात ते पूर्णपणे नष्ट होतील. डावे कम्युनिस्ट तर प. बंगालच्या भयकर पराभवामुळे हतबुद्धच झाले आहेत. ते संसदीय मार्गाचाच त्याग करतील अशी शक्यता आहे.

जनतेने केलेला प्रयोग फसला. विरोधी पक्षांकडून जनतेने फार मोठ्या अपेक्षा केल्या, पण ते अयशस्वी ठरले. जुने ते सोने बरे, (हेही काँग्रेसवाल्यांसारखेच) असा विचार करून व इंदिराजींच्या धाडसी नेतृत्वावर विश्वास ठेवून जनतेने पुन्हा काँग्रेसला पाच वर्षांसाठी सत्तारूढ केले. अशी खात्री वाटते, की पुढील पाच वर्षांत जनतेचा काँग्रेसबद्दल भ्रमनिरास होईल व ती पुन्हा विरोधी पक्षांकडे येईल, म्हणून त्यांनी खचून न जाता काम केले पाहिजे.

काँग्रेसचा मुकाबला संयुक्तरीत्या विरोधी पक्षांना करावा लागेल. भारतात कांग्रेसला पर्यायी पक्ष उभा रहाण्याची शक्यता तोपर्यंत नाही जोपर्यंत इंदिरा गांधींच्या तोडीचा मास लीडर विरोधी पक्षात उभा रहात नाही. असा नेता जोपर्यंत उभा रहात नाहीत तोपर्यंत कांग्रेसच्या तोडीची सार्वदेशिक संघटना उभी रहाण्याची शक्यता नाही. विरोधी पक्षांचे नेते प्रादेशिक सामर्थ्याचे आहेत. जनतेसाठी लढणाऱ्या जनतेसाठी कष्ट उपसणाऱ्या, संघटनाकुशल अशा लोकप्रिय नेत्याची आज गरज आहे. पण हे अवघड आहे. म्हणून काँग्रेसला पर्याय निर्माण होत नाही. संघटना काँग्रेसच्या वृद्ध नेत्यांच्या मर्कटचेष्टांमुळे इंदिरा गांधींचे फावले. म्हणून तो पक्ष पर्याय बनू शकला नाही.

भारतात एकूण २५ प्रांत आहेत. त्यांची भाषा, संस्कृती वेगळी आहे. इंटरेस्ट

ग्रुप प्रमाणे ज्याप्रमाणे भारतात पक्ष बनत नाहीत, त्याप्रमाणे धर्म किंवा जातींवर-देखील पक्ष बनत नाहीत. बनले तरी त्यांची अवस्था भाक्रांद, विहपा यांसारखी होते. या सर्व २५ प्रांतांत काँग्रेसला पर्यायी अशी संघटना उभी करणे अवघड आहे. त्यासाठी राष्ट्रीय व आकर्षक नेतृत्वाची गरज आहे. अटलबिहारी वाजपेयींचा अपवाद वगळता सर्व विरोधी पक्षनेते प्रादेशिक आहेत. या देशातील जनता विविध सूत्रात बांधली गेलेली आहे. तिला एका सूत्राखाली एकत्र करता येत नाही. म्हणून डावे राजकारण आवश्यक आहे. दलितांचा महामंत्र बनलेल्या समाजवादाचा पुरस्कार करून जहाल कार्यक्रम ठरविणारा पक्ष व नेता अस्तित्वात आला तर कदाचित काँग्रेसकडून अपेक्षाभंग झालेली ही गरीब जनता एकत्रित येऊ शकेल. पण हा दलितांचा असंतोष एकत्रित करण्यासाठी, त्याला परिणामकारक घाट देण्यासाठी काँग्रेसला समवर्ती (पॅरलल) अशा प्रचंड संघटनेची गरज आहे.

स्वतःला उजवे म्हणविणारे हे काम करू शकत नाहीत. राष्ट्रवादाची भावना आता तेवढीशी परिणामकारक राहिलेली नाही. कारण इंदिरा गांधी जहाल राष्ट्रवादी आहेत, हे सिद्ध झाले आहे. सध्याच्या विरोधी पक्षांतून असे काही होईल असे वाटत आही. कारण झालेल्या घटनांपासून शहाणपण शिकण्याचे त्यांचे सामर्थ्य मर्यादित आहे.

काँग्रेसच्या भांडणात पडून लिमये, वाजपेयी व मसानी या जननेत्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. इंदिरा गांधी हुकुमशहा आहेत, त्यांना हुकुमशाही आणायची आहे वगैरे मूर्खपणाचा प्रचार बंद करावा व जनतेच्या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रित करावे तरच त्यांना व भारतातील लोकशाहीला भवितव्य आहे.

भारतात पर्यायी पक्ष निर्माण न होण्यातील दुसरी अडचण म्हणजे भारतात दरवेळी उद्भवत असणारे १०-१५ प्रादेशिक पक्ष. यामुळे काँग्रेसचे नुकसान न होता इतर राष्ट्रीय पक्ष खच्ची होतात. जनतेच्या प्रादेशिक भावना हे राष्ट्रीय पक्ष ओळखू शकत नाहीत. सत्ताधाऱ्यांविरूद्ध असंतोष व्यक्त करण्याचे साधन म्हणून या प्रादेशिक पक्षांची निर्मिती झाली. भाक्रांद, तेप्रस, विहपा, शिवसेना, बांगला काँग्रेस, उत्कल काँग्रेस, शेकाप, द्रमुक, लोकराजपार्टी यांच्या उदयाने व अस्ताने हेच सिद्ध केले आहे. जनतेच्या प्रादेशिक आकांक्षा जर राष्ट्रीय पक्ष जाणू शकले व हा असंतोष परिणामकारकदृष्ट्या संघटित करू शकले तर हे छोटेछोटे पक्ष उदय पावणार नाहीत. पण हे सर्व फार फार अवघड आहे. खंडप्राय देशाच्या सर्वच समस्या कमालीच्या गुंतागुंतीच्या असतात.

सशक्त विरोधी पक्ष असणे ही खऱ्या लोकशाहीची कसोटी आहे. एकपक्षीय लोकशाही ही भूषणास्पद गोष्ट नाही. दोन लागोपाठ पराभवांनी विरोधक भुईसपाट झाले आहेत. कोणत्याही पक्षाने दीर्घकाळ सत्तेवर राहू नये, त्याला धक्कातत्त्वाची गरज असते. जनता विरोधकांना पुन्हा संधी देईल. कारण १ मार्च

८ एप्रिल १९७२

ते ३ डिसेंबर (७१) दरम्यान झालेल्या सर्व निवडणुकांत कॉंग्रेस पराभूत ठरली होती. ओरिसातील सहासात पोटनिवडनुका, नागपूरची लोकसभा निवडणूक व दिल्ली-उत्तरप्रदेशातील म्युन्सिपल निवडणुका यात कॉंग्रेस पराभूत ठरली होती. म्हणून विरोधकांनी जनतेच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवावा यातच त्यांचे व भारतीय लोकशाहीचे हित आहे.

१९७२ ने अनेक प्रश्न उभे केले आहेत. भारतात विरोधी पक्ष रहाणार का हा सर्वांत महत्त्वाचा असा पहिला प्रश्न. कॉंग्रेस आपली आश्वासने पूर्ण करू शकेल का हा दुसरा महत्त्वाचा प्रश्न व एका पुरुषार्थावर विश्वास ठेवणाऱ्या पक्षाचे भवितव्य काय हा तिसरा प्रश्न. या प्रश्नांची उत्तरे पुढील पाच वर्षांत शोधावी लागणार आहेत. ग्रामपंचायतींपासून केंद्रापर्यंत सर्व ठिकाणी आपलीच सत्ता पाहिजे. या राक्षसी महत्त्वाकांक्षेने कॉंग्रेसवाले पछाडले आहेत. हे ओरिसा विधानसभेतील निर्लज्ज घटनांनी सिद्ध केले नाही काय? इंदिरा गांधी लोकशाहीवादी आहेत पण त्यांची भुतावळ भयंकर आहे. तिला सत्तेशिवाय कशातही रस नाही आणि सत्ते-साठी मिळेल तो वाममार्ग अंगिकारण्याची तिची तयारी आहे. अशावेळी विरोधी पक्षांची गरज आहे. कारण सत्तामत्तांची खोडकी जिरविण्यासाठी जबाबदार विरोधी पक्षांची गरज असते.

एकपक्षीय लोकशाहीला शक्य होईल तितक्या लौकर नष्ट करणे ही काळाची गरज आहे. कारण दीर्घकाळ एकाच ठिकाणी सत्ता रहाणे फार भयंकर असते. कारण त्यात प्रलोभनांचे, अनीतीचे व मोहाचे प्राधान्य असते.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.। सं. श्री. ग. माजगावकर




"आपल्या 'गरिबी हटाव' कार्यक्रमामुळं थोड्याच दिवसात प्रत्येकाच्या हाती पैसा खेळू लागणाराय्. अशा वेळी दारूबंदी उठवून त्यांच्या हातात सहजासहजी दारू मिळवून दिलीत तर काय परिणाम होईल याची दखल घेतलीय् ना आपण ?...."